रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

# कृषीवल

१९३७-२०२६ ९० वर्ष

रायगड मंगळवार । दि. ३० जून २०२६ । अंक २४ । पृष्ठे ८ । किंमत ४ ₹ । आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-28 । krushival.in




। पुणे । प्रतिनिधी ।

- पुणे सत्र न्यायालयाने ठोठावली शिक्षा
- १६ दिवसांत आरोपपत्र दाखल

महाराष्ट्रासह अवघ्या देशाला हादरवून सोडलेल्या नसरापूर बालिका बलात्कार आणि हत्याकांड प्रकरणातील ६५ वर्षीय भीमराव कांबळे या नराधमामला पुणे सत्र न्यायालयाने फाशीची शिक्षा ठोठावली आहे. या प्रकरणाचा सोमवारी (दि.२९) न्यायालयाने निकाल देताना, भीमराव कांबळेच्या कृत्याचा पाढा वाचताना, ''आता फासावर चढा'' अशा शब्दांत ठणकावले आहे. गेल्या काही दिवसांपासून या निकालाची चर्चा अवघ्या देशभरामध्ये झाली होती. पुणे पोलिसांनी अवघ्या १६व्या दिवशी आरोपपत्र दाखल केले. अवघ्या दोन महिन्यांमध्ये या प्रकरणाचा निकाल लावण्यात आला आहे.

दरम्यान, या प्रकरणामध्ये ज्या पद्धतीने पुणे पोलिसांनी तपास केला आणि पुरावे सादर केले, त्या संदर्भात पोलिसांचे कौतुकदेखील न्यायालयाने केले आहे. त्याचबरोबर या प्रकरणामध्ये सहभागी असणाऱ्या डॉक्टर, सायबर एक्सपर्ट, फॉरेन्सिक तज्ज्ञ यांचेसुद्धा कौतुक केले आणि एक प्रकारे या आरोपीला फासावर लटकवण्यामध्ये हे सर्व पुरावे निर्णायक ठरल्याचे स्पष्ट केले. पुढे बोलताना ते म्हणाले की, ''या आरोपीने ५३ वर्षांचा असतानाही एका कुटुंबातील एका मुलीवर अत्याचार प्रयत्न केला होता, तेव्हासुद्धा ती मुलगी अल्पवयीन होती. एका म्हातारीवरदेखील त्याने हल्ला केला, तसेच आणखी एका महिलेवर त्याने अत्याचार केला आहे. त्यामुळे या आरोपीला कुठल्याही प्रकारचा पश्चाताप नाही, त्यामुळे त्याने सुधारण्याची पातळी ओलांडली आहे,'' असे न्यायालयाने त्याला फाशीची शिक्षा ठोठावताना सांगितले आहे. अवघ्या १६ दिवसांमध्ये या प्रकरणामध्ये आरोपपत्र दाखल करण्यात आले होते. उन्हाळ्याच्या सुट्टीनंतर कोर्टामध्ये या प्रकरणाला पूर्ण वेळ देण्यात आला होता.

## वे|धा|क

### 'एचएसआरपी' नंबर प्लेटसाठी शेवटचा दिवस

**पनवेल** : राज्यातील १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या सर्व वाहनांवर उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक प्लेट बसविण्यासाठी दि.३० जून ही अंतिम मुदत आहे. त्यानंतर दि.१ जुलैपासून नियमांचे पालन न करणाऱ्या वाहनधारकांवर मोटार वाहन कायद्यानुसार कडक कारवाई करण्यात येणार आहे. तसेच, उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक प्लेट न बसविलेल्या वाहनांची आरटीओमधील अनेक महत्त्वाची कामेही रोखण्यात येणार आहेत. नंबर प्लेट न बसविणाऱ्या वाहनधारकांना वाहन हस्तांतरण, पत्ता बदल, कर्जबोजा चढविणे किंवा उतरविणे, वाहनाची पुनर्नोंदणी, वाहनातील बदल तसेच परवाना नूतनीकरण यांसारख्या आरटीओमधील पान २ वर

### महिलेकडून अल्पवयीन मुलीचा विनयभंग

**महाड** : महाड तालुक्यातील बिरवाडी येथील एका १३ वर्षीय अल्पवयीन मुलीशी अश्लील चाळे करून तिला धमकावल्याप्रकरणी एका २५ वर्षीय महिलेविरोधात महाड एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महाड एमआयडीसी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि.२४ जून रोजी दुपारी साडेतीन वाजताच्या सुमारास बिरवाडी येथील एका घरात ही घटना घडली. भाग्यश्री नितीन गोधावडे, रा. बापटनगर-बिरवाडी असे महिला आरोपीचे नाव असून, या महिलेने एका अल्पवयीन मुलीशी अश्लील वर्तन केल्याचा तसेच हा प्रकार कोणाला सांगितल्यास पीडित मुलीच्या आईला ठार मारून पान २ वर

### पहिली ते दहावीपर्यंत मराठी अनिवार्य

**मुंबई** : महाराष्ट्रातील सर्व माध्यमांच्या शाळांमध्ये पहिली ते दहावीपर्यंत मराठी भाषा शिकविणे अनिवार्य करण्यात येणार असल्याची महत्त्वपूर्ण घोषणा शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी सोमवारी विधानसभेत केली. मराठी विषय शिकविणे टाळणाऱ्या किंवा नियमाचे उल्लंघन करणाऱ्या शाळांवर शासनाकडून कठोर कारवाई करण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनात भाजप आमदार अतुल भातखळकर यांनी काही शाळांमध्ये मराठी विषय ऐच्छिक ठेवला जात असून, अनेक विद्यार्थ्यांना मराठी शिकविली जात नसल्याचा मुद्दा उपस्थित केला होता. त्यावर उत्तर देताना शिक्षणमंत्री यांनी राज्य सरकार मराठी भाषेच्या संवर्धनासाठी कटिबद्ध असल्याचे सांगितले.

# करोडोंचा मुलामा, सुरक्षेचा बोजवारा




। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

**अलिबागमधील जिल्हा सामान्य रुग्णालयात रविवारी (दि.२८) रात्री स्लॅब कोसळल्याची घटना घडली. या घटनेत सुदैवाने जीवितहानी टळली. या रुग्णालयातील दुरुस्तीसाठी करोडो रुपये खर्च करण्यात आले आहेत. परंतु, आजही रुग्णालयातील सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कारभाराबाबत रुग्णांच्या नातेवाईकांकडून तीव्र संताप व्यक्त करण्यात आला आहे.** पान २ वर






> जिल्हा रुग्णालयातील इमारतीमध्ये रविवारी रात्री स्लॅब कोसळला. रुग्णालयतील रुग्ण व त्यांचे नातेवाईक रात्री गाढ झोपेत असताना ही घटना घडली. सुदैवाने जीवीतहानी टळली असली तरी करोडो रुपये खर्च करून कामाचा दर्जा दिसून येत नाही. ही मोठी चिंताजनक बाब असून, सर्वसामान्यांच्या जीवाशी खेळ चालू आहे. त्यामुळे हे शेकाप कदापी सहन करणार नाही. रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने रुग्ण प्रशासनाने योग्य उपाययोजना करणे आवश्यक आहे. सत्ताधारी लोकप्रतिनिधी याकडे दुर्लक्ष करीत आहेत.
>
> – चित्रलेखा पाटील, शेकाप प्रवक्त्या

> जिल्हा रुग्णालयातील इमारतीमधील स्लॅब कोसळण्याच्या घटना सतत घडत आहेत. याबाबत वारंवार सार्वजनिक बांमधकाम विभागाला पत्र व्यवहार करण्यात आला आहे. मात्र, यावर ठोस कार्यवाही दिसून येत आहे.
>
> – डॉ. निशीकांत पाटील, जिल्हा शल्यचिकित्सक

## धाटाव पुन्हा प्रदूषणाच्या विळख्यात

। चणेरा । प्रतिनिधी ।

धाटाव औद्योगिक वसाहतीत पुन्हा एकदा गंभीर रासायनिक प्रदूषणाचा प्रकार समोर आल्याने परिसरातील नागरिक, शेतकरी आणि पर्यावरणप्रेमींमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. कंपनीसमोरील सांडपाण्याच्या चेंबरमधून डिझेलसदृश्य रसायनयुक्त दूषित पाणी मोठ्या प्रमाणात बाहेर पडत असल्याचे धक्कादायक दृश्य समोर आले आहे. मुसळधार पावसामुळे चेंबर तुडुंब भरून वाहात असून, हे विषारी पाणी थेट रस्त्यावर पसरत आहे. त्यामुळे या मार्गाने ये-जा करणारे कामगार, वाहनचालक आणि स्थानिक नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे.

स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, दरवर्षी पान २ वर




## पाल्हे पूल दुरुस्तीच्या नावाखाली दिखावा

- बांधकाम विभागावर चित्रलेखा पाटील यांचा हल्लाबोल
- शेकाप स्टाईलने आंदोलनाचा दिला इशारा

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

नागाव-पाल्हे पुलाच्या दुरुस्तीच्या नावाखाली केवळ दिखावा केल्याचा आरोप करत शेतकरी कामगार पक्षाने सार्वजनिक बांधकाम विभागाविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. रविवारी पुलाचा कठडा कोसळल्याने या पुलाच्या सुरक्षिततेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, तातडीने दुरुस्ती न झाल्यास सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयावर शेकाप स्टाईलने हल्लाबोल आंदोलन छेडण्याचा इशारा शेकापच्या प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांनी दिला आहे.

नागाव, रेवदंडा, अलिबाग, मुरूडसह अनेक गावांना जोडणारा नागाव-पाल्हे पूल अत्यंत जुना आणि अरुंद आहे. गेल्यावर्षी पुलाचा काही भाग खचल्याने दगडी बांधकाम ढासळले होते. पान २ वर



### अनेक गावांचा संपर्क तुटण्याची भीती

नागाव-पाल्हे पुलाचा काही भाग ढासळल्याने पुलाच्या संरक्षण भिंतीला मोठे भगदाड पडले आहे. पुलाची रचना कमकुवत झाल्याने तो कधीही कोसळू शकतो, अशी भीती व्यक्त होत आहे. हा पूल कोसळल्यास नागाव, रेवदंडा, काशीद, मुरुडसह अनेक गावांचा संपर्क तुटण्याची भीती आहे. तसेच पर्यटक, स्थानिक नागरिक, विद्यार्थी आणि रुग्णवाहिकांच्या वाहतुकीवरही गंभीर परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे तातडीने पुलाची तपासणी करून कायमस्वरूपी दुरुस्ती करण्याची मागणी नागरिकांतून जोर धरत आहे.

> नागरिकांच्या जीवाशी खेळ करणाऱ्या सार्वजनिक बांधकाम विभागाचा बेजबाबदार कारभार आता सहन केला जाणार नाही. वारंवार सूचना, निवेदने आणि पाठपुरावा करूनही प्रशासनाने पुलाच्या दुरुस्तीकडे दुर्लक्ष केले. आता पुलाचा कठडा कोसळल्यानंतरही प्रशासन जागे झाले नाही, तर शेतकरी कामगार पक्ष रस्त्यावर उतरून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयावर तीव्र हल्लाबोल आंदोलन छेडेल. कोणतीही जीवितहानी होण्यापूर्वी पुलाची तातडीने कायमस्वरूपी दुरुस्ती करावी, अन्यथा याची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची राहील.
>
> – चित्रलेखा पाटील, शेकाप प्रवक्त्या

## डिझेल तस्कर जाळ्यात

### दोन बोटींसह तिघेजण ताब्यात

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

बेकायदेशीररित्या डिझेलची तस्करी करणाऱ्या दोन बोटींवर मांडवा सागरी पोलिसांनी छापा टाकला. या कारवाईत दोन बोटींसह तिघांना पोलिसांनी ताब्यात घेतले असून, त्यांच्याकडून १४ लाख ५६ हजरी रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही घटना सोमवारी (दि.२९) सायंकाळी घडली असून, याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मांडवा बंदराजवळ दोन बोटींद्वारे डिझेलची तस्करी होत असल्याची माहिती पोलीस निरीक्षक सोमनाथ लांडे यांना मिळाली. या माहितीच्या आधारे सोमवारी (दि.२९) दुपारी पथकाने छापा टाकला. या छाप्यात सुमारे २० हजार लिटर डिझेलचा साठा आढळून आला. या गुन्ह्यातील गजानन कोळी, अनिल कोळी आणि योगेश पाटील या तिघांना ताब्यात घेण्यात आले असून, दोन बोटी जप्त करण्यात आल्या आहेत. जून पासून बोटींना समुद्रात बंदी आहे, तरीदेखील खुलेआमपणे बोटींद्वारे डिझेल तस्करी केली जात आहे. या घटनेने शासनाचे नियम धाब्यावर बसवून डिझेल तस्करीचा गोरखधंदा सक्रीय आहे. पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनी पदभार स्विकारल्यानंतर डिझेल तस्करी करणाऱ्यांना दणका देण्यात आला होता. मात्र, पुन्हा काही मंडळी हा धंदा छुप्या पद्धतीने सागरी मार्गाने करीत आहेत. हा गोरखधंदा चालविला जात असताना कोस्टल विभाग काय करतय? असा सवाल जनमानसातून उमटला जात आहे.

## तिसऱ्या मुंबईविरोधात रायगड पेटणार

- शेतकऱ्यांकडून आरपारच्या लढाईची घोषणा
- १ जुलैला कोकण आयुक्तालयावर करणार निदर्शने

। उरण । प्रतिनिधी ।

राज्य सरकारच्या प्रस्तावित तिसरी मुंबई (न्यू टाऊन) प्रकल्पाविरोधात रायगड जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी आता आरपारच्या लढाईची घोषणा केली आहे. ''तिसरी मुंबई नकोच, आमच्या जमिनी देणार नाही, शेतकरी एकता जिंदाबाद!'' अशा घोषणांनी सरकारला इशारा देत बुधवार दि.१ जुलै रोजी सकाळी ११ वाजता कोकण आयुक्तालयावर भव्य जाहीर निदर्शने करण्यात येणार असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले.

एमएमआरडीए तिसरी मुंबई विरोधी १२४ गाव शेतकरी संघर्ष समिती, ८८ गाव एमएमआरडीए विरोधी शेतकरी संघर्ष समिती (पेण) आणि एमएमआरडीए केएससी नवनगर (तिसरी मुंबई) विरोधी समिती रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने या आंदोलनाचे आयोजन करण्यात आले आहे. संघर्ष समितीने प्रसिद्ध केलेल्या पत्रकात राज्य सरकारच्या जमीन संपादन धोरणावर तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली आहे. विकासाच्या नावाखाली शेतकऱ्यांच्या सुपीक जमिनी, घरे आणि गावांवर बुलडोझर चालविण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा आरोप करण्यात आला असून, शेतकऱ्यांच्या संमतीशिवाय एक इंचही जमीन दिली जाणार नाही, असा ठाम इशारा देण्यात आला आहे.

समितीच्या म्हणण्यानुसार, उरण, पेण आणि पनवेल तालुक्यातील शेकडो गावे प्रस्तावित तिसऱ्या मुंबईच्या कक्षेत येत असून, हजारो शेतकरी, भूमीपुत्र आणि ग्रामस्थांच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे. विकासाच्या नावाखाली शेतकऱ्यांना त्यांच्या मातीतून उखडून टाकण्याचा प्रयत्न सहन केला जाणार नाही, अशी भूमिका संघर्ष समितीने स्पष्ट केली आहे.

## उरणमध्ये एका दिवसात तीन मृतदेह

। उरण । प्रतिनिधी ।

उरण तालुक्यात एका दिवसात वेगवेगळ्या ठिकाणी तब्बल तीन मृतदेह आढळून आल्याने संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे. दोन पुरुष आणि एका महिलेचा समावेश असलेल्या या घटनेमुळे उरणमध्ये नेमकं चाललंय तरी काय? असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जात असून, सलग घडलेल्या या घटनांमुळे भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

पहिली घटना न्हावा-शेवा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील नव्याने उभारण्यात येत असलेल्या जेडब्ल्यूआर कंपनीजवळ घडली. येथीलरस्त्यालगतच्याखारफुटीच्या झुडपांमध्ये एका व्यक्तीचा मृतदेह आढळून आला. त्याची ओळख मुरारी कुमार अशी पटली असून, तो ऑफकॉन कंपनीत कार्यरत होता. प्राथमिक माहितीनुसार, दारूच्या नशेत तो खाडीत पडल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. दुसरी घटना सारडे गावाजवळ घडली. प्रमोदिनी पाटील (७०) या मनोरुग्ण महिला घरातून लग्नाला जात असल्याचे सांगून बाहेर पडल्या होत्या. त्यानंतर त्या बेपत्ता झाल्या होत्या. अखेर त्यांचा मृतदेह डोंगर परिसरात रानभाज्या गोळा करण्यासाठी गेलेल्या आदिवासी दाम्पत्याला झाडाझुडपांमध्ये आढळून आला. पान २ वर

पाच दिवस राबवणार विशेष मोहीम | जिल्ह्यातील ३७ हजार बालकांना पाजणार डोस

## गृहभेटीतून होणार पोलिओ लसीकरण



। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेंतर्गत रविवारी (दि.२८) रायगड जिल्ह्यात लसीकरण मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेद्वारे जिल्ह्यातील ० ते ५ वर्षे वयोगटातील एकूण १ लाख ५९ हजार ८३२ बालकांना पोलिओ प्रतिबंधक लस देण्यात आली आहे. त्यानंतर पुढील पाच दिवस गृहभेटीतून मोहीम राबविली जाणार असून, २२ हजार २२ बालकांना लस पाजली जाणार आहे. दरम्यान, पोलिओमुक्त रायगड घडविण्यास सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले.

रायगड जिल्ह्यामध्ये १ लाख ८२ हजार ८५४ बालकांना लस देण्याचे नियोजन करण्यात आले. त्यापैकी १ लाख ५९ हजार ८३२ बालकांना लस देण्यात आले. त्यामध्ये जिल्हा परिषद आरोग्य विभागामार्फत अपेक्षित १ लाख ६१ हजार ४७१ पैकी १ लाख ४३ हजार ९२४ बालकांना डोस पाजला. तसेच, जिल्हा सामान्य रुग्णालयामार्फत अपेक्षित २१ हजार ३८३ पैकी १५ हजार ९०८ बालकांना डोस दिला आहे. या मोहिमेसाठी जिल्हाभरात २ हजार ३४१ लसीकरण बूथ उभारण्यात आले होते. ० ते ५ वर्षे वयोगटातील प्रत्येक बालकाला जवळच्या पल्स पोलिओ बूथवर डोस पाजण्यात आला. शहरी भागासह ग्रामीण भागात हा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमाला चांगला प्रतिसाद मिळाला. एक दिवसाच्या यशस्वी मोहिमेनंतर शिल्लक असलेल्या बालकांना पोलिओ डोस पाजण्यासाठी पाच दिवस विशेष मोहीम राबविली जाणार आहे. कोणताही बालक लसीकरणापासून वंचित राहू नये, यासाठी आशा स्वयंसेविका, आरोग्य कर्मचारी आणि अंगणवाडी सेविका घरभेटी देऊन लसीकरणापासून वंचित राहिलेल्या बालकांचा शोध घेऊन त्यांना लस देणार आहेत. पुढील टप्प्यात आशा स्वयंसेविका, आरोग्य कर्मचारी आणि अंगणवाडी सेविका घरभेटी देऊन लसीकरणापासून वंचित राहिलेल्या बालकांचा शोध घेऊन त्यांना लस देणार आहेत. स्थलांतरित कुटुंबे, बांधकाम कामगारांची वस्ती, वीटभट्ट्या, बसस्थानके, रेल्वे स्थानके तसेच दुर्गम भागांमध्ये विशेष पथकांद्वारे बालकांना पोलिओचे दोन थेंब दिले जाणार आहेत. २२ हजार २२ बालकांना डोस दिला जाणार आहे. पोलिओ प्रतिबंधक लसीचे दोन थेंब पाजावेत आणि पोलिओमुक्त रायगड घडविण्यास सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले.



(छायाचित्र : समीर मालोदे)

## पतीच्या दीर्घायुष्यासाठी सुवासिनींचे पूजन

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

रायगड जिल्ह्यात ठिकठिकाणी सोमवारी (दि.२९) वटपौर्णिमा साजरी करण्यात आली. यानिमित्ताने पतीच्या दीर्घायुष्यासाठी असंख्य सुवासिनींनी एकत्र येत वडाच्या झाडाचे पूजन केले. औक्षण करून, नैवेद्य दाखवून असंख्य महिलांनी वडाच्या झाडाला सूत बांधून, सात जन्माची गाठ मजबूत ठेवण्याचे साकडे घातले. यावेळी सकाळच्या सुमारास वडाच्या पान २ वर

# नागोठणे शहरावर वाहतूक कोंडीचे विघ्न

## एसटी स्थानकासमोर लांबच लांब रांग; ठोस उपाययोजनेची गरज



(छायाचित्र : महेश पवार)

। नागोठणे । प्रतिनिधी ।

नागोठण्यातील वाहतुक कोंडीचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. येथील छ. शिवाजी महाराज चौक परिसर, एस.टी. स्थानकासमोरील, मासळीबाजारकडे व प्राथमिक आरोग्य केंद्राकडे जाणारा, तसेच पोलीस ठाण्याकडे जाणाऱ्या रस्त्यावर वारंवार वाहतुक कोंडी होत आहे.

काही दुचाकी व चारचाकी वाहने बेशिस्तपणे रस्त्यावर उभ्या केल्याने, तसेच हातगाडी रस्त्याच्या कडेला खेटून उभ्या केलेल्याने ही वाहतूक कोंडी होत आहे. दरम्यान, सोमवारी (दि.२९) दुपारी १२.०० वाजण्याच्या सुमारास नागोठणे एस.टी. स्थानकासमोरील रस्त्यावर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी झाली होती. त्यामुळे नागोठण्यातील वाहतूक कोंडीचे विघ्न संपता संपत नसल्याचे चित्र निदर्शनास येत आहे. त्यामुळे ग्रामपंचायत प्रशासनाने आता बघ्याची भूमिका न घेता ठोस भूमिका घेण्याची नितांत गरज असल्याचे स्थानिकांमधून बोलेले जात आहे.

नागोठण्यातील छ. शिवाजी महाराज चौक परिसरात दोन्ही बाजुला असलेली किराणा, मिठाई व इतर दुकाने, हॉटेल्स, मेडिकल स्टोअर, हातगाड्या तसेच भाजीविक्रेते व इतर लहान मोठी दुकाने मोठ्या प्रमाणात आहेत. या सर्व दुकानांत येणारे ग्राहक आपली वाहने रहदारीच्या रस्त्यावरच उभी करतात. दुकानदारही आपला धंदा बुडू नये यासाठी याकडे दुर्लक्ष करीत आहेत. तसेच, येथील काही भाडेकरू धंदेवाल्यांनी समोरील मोकळ्या जागेतही अतिक्रमणे करून वेगवेगळी दुकाने थाटली आहेत. नागोठणे ग्रामपंचायत प्रशासन या विविध प्रकारच्या व्यावसायिक धंदेवाल्यांकडून १० रुपयांची पावती रोज फाडत असल्याने रस्त्याकडेची जागा आपल्याच मालकीची असल्याचा समज या धंदेवाल्यांचा झाल्याचे चित्र दिसून येत आहे. त्यामुळे आधीच अरूंद असलेल्या या रस्त्यावरून जाणारी दोन मोठी वाहने समोरासमोर आल्यास छ. शिवाजी महाराज चौक परिसरात व नुक्कड गल्लीमध्ये वारंवार वाहतुक कोंडी होत आहे. विशेष करुन सायंकाळच्या वेळेत हे वाहतुक कोंडीचे प्रमाण खुप मोठे आहे.

या वाहतुक कोंडीचा मोठा फटका एस.टी. बसचालकांना बसत आहे. एसटी बस शिवाजी चौक परिसरातुन स्थानकात नेतांना चालकांना तारेवरची कसरत करावी लागते. त्यामुळे कित्येकदा एस.टी. चालक, दुचाकीस्वार व रस्त्याच्या कडेला बसलेले व्यावसायिक धंदेवाले यांच्यात वादाचे प्रसंग निर्माण होत आहेत.

दरम्यान, सोमवारी या रस्त्यावर दोन्ही बाजूला वाहनांची लांबच लांब रांग लागल्यामुळे अनेक दुचाकी व रिक्षा चालकांना आपली वाहने मागे वळवून दुसऱ्या मार्गाने जावे लागले. नागोठण्यातील वाहतूक कोंडीचे विघ्न संपता संपत नसल्याने ग्रामपंचायत प्रशासनाने आता बघ्याची भूमिका घेणे सोडून, पोलीस प्रशासनाच्या सहकार्याने ॲक्शन मोडवर येण्याची नितांत गरज असल्याचे स्थानिकांमधून बोलले जात आहे.

### वाहतूक पोलीसही हतबल

छ. शिवाजी चौक परिसरासाठी एक ते दोन वाहतुक पोलीस व होमगार्ड कार्यरत असतात. मात्र, काही वेळेस त्यांना इतरत्र ड्युटी लागल्याने येथे कधी कधी एकही वाहतूक पोलीस नसतो. आणि असले तरी बेशीस्त वाहनचालकांच्या अडमुठेपणामुळे होणाऱ्या गर्दीच्या वेळी हे एक-दोन वाहतुक पोलीस व होमगार्ड कुठे कुठे लक्ष ठेवणार? त्यामुळे ते सुद्धा हतबळ झाल्याचे दिसुन येत आहेत. अशा बेशीस्त वाहनचालकांवर अनेकवेळा दंडात्मक कारवाई करूनही परिस्थिती जैसे थेच आहे.

### पार्किंग व्यवस्था सुरू करावी

काही वर्षांपूर्वी नागोठण्यातील छ. शिवाजी महाराज चौक परिसरात तत्कालीन पोलीस निरीक्षक देविदास सोनवणे यांनी सुरू केलेल्या सम-विषम तारखांनुसार पी १ व पी २ पार्कींग व्यवस्थेचा त्यांच्या बदली नंतर बोजवारा उडाला आहे. त्यानंतर नागोठणे पोलीस ठाण्यात आलेल्या सर्व प्रभारी अधिकाऱ्यांकडे वेळोवेळी याबाबतीत पत्रकारांनी व नागरिकांनी सांगूनही ही पार्कींग व्यवस्था सुरू झालेली नाही. त्यामुळे ती पद्धत पुन्हा सुरु करावी. नागोठणे पोलीस ठाण्याचा नव्याने पदभार स्वीकारलेले सपोनि रविंद्र पारखे नक्कीच याबाबतीत ठोस भूमिका घेऊन योग्य ती कार्यवाही करतील, अशी अपेक्षा आहे.




# विद्यार्थ्यांसाठी स्वच्छतागृहाची उभारणी

। चिरनेर । प्रतिनिधी ।

जेएनपीए परिसरातील कार्यरत असलेल्या भवानी शिपिंग सर्व्हिस कंपनी संचालित भवानी फाऊंडेशनच्यावतीने अंबरनाथ येथील कर्नाटक वैभव नमस्ते संस्थेच्या नीजलिंगाप्पा कन्नड पीआर विद्यालयाच्या विद्यार्थ्यांना स्वच्छतागृह बांधून देण्यात आले आहे. सामाजिक बांधिलकीतून उभारण्यात आलेल्या या स्वतंत्र स्वच्छतागृहांमुळे विद्यालयातील विद्यार्थ्यांची होणारी गैरसोय दूर करण्यात मोठी मदत झाली आहे. या स्वच्छतागृहाचा लोकार्पण सोहळा नुकताच भवानी फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष के.डी.शेट्टी, भवानी शिपिंगचे मॅनेजिंग डायरेक्टर जिक्सीत शेट्टी यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला. यावेळी भवानी फाऊंडेशनचे माजी अध्यक्ष आर.बी. हेबली, सचिव शिखा शेट्टी, अंबिका हॉटेलचे मालक प्रभाकर शेट्टी,कर्नाटक वैभव नमस्ते संस्थेचे अध्यक्ष टिळक चालवाडी, उपाध्यक्ष एच.एन. इंगनुर, सचिव बसवंत पुजारी यांच्यासह अन्य पदाधिकारी, मुख्याध्यापिका अनिता राजोली, शिक्षक वृंद व मान्यवर उपस्थित होते. तसेच, यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना वह्या, पुस्तके व शालेय साहित्याचेही वाटप करण्यात आले.

# अध्यक्षपदी प्रीतम पाटील यांची नियुक्ती

। आगरदांडा । प्रतिनिधी ।

गेल्या वर्षभराहून अधिक काळ रिक्त असलेल्या मुरुड तालुका काँग्रेसच्या अध्यक्षपदी मजगावच्या प्रीतम पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीने पाठवलेल्या एका पत्रातून त्यांची नियुक्ती केल्याचे त्यांना कळविण्यात आले आहे.



प्रीतम पाटील यांनी मुरुड तालुक्यातील मजगाव ग्रामपंचायतीचे उपसरपंच व तालुका काँग्रेस उपाध्यक्ष पदाची धुरा सांभाळली होती. त्यांचा राजकीय अनुभव दांडगा असल्याचा फायदा काँग्रेस पक्षाला होऊ शकतो. तसेच सामाजिक, शैक्षणिक व कृषी क्षेत्रातही त्यांची भरीव कामगिरी आहे. रायगड जिल्हा काँग्रेस दक्षिण विभाग अध्यक्ष राजाभाऊ ठाकूर यांच्या शिफारशीनुसार ही निवड करण्यात आली आहे. आगामी काळात होणाऱ्या माजगाव, उसरोली ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत त्यांची कामगिरी पक्षवाढीसाठी मोलाची ठरणार आहे. त्यांच्या निवडीचे काँग्रेस पक्ष कार्यकर्त्यांनी स्वागत करून त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत. यावेळी पक्ष संघटना बळकट करण्यासाठी एकजुटीने, एक दिलाने, एकविचाराने, ज्येष्ठ मंडळींच्या मार्गदर्शनाखाली व अनुभवानुसार काम करणार आहे, असे प्रीतम पाटील यांनी सांगितले.

# सागर मेहता यांचा प्रामाणिकपणा

। पाली । प्रतिनिधी ।

आजच्या धावपळीच्या आणि स्वार्थी जगात प्रामाणिकपणा व माणुसकीची जपणूक करणारी माणसे अजूनही समाजात आहेत, याची प्रचिती पालीतील व्यापारी सागर मेहता यांनी दिली. सुधागड तालुक्यातील भावशेत (सिद्धेश्वर) येथील आदिवासी महिला कमळी वारगुडे यांची हरवलेली पिशवी मेहतर यांनी कोणत्याही अपेक्षेशिवाय शोधून तिच्या मालकिणीपर्यंत सुखरूप पोहोचवून समाजासमोर आदर्श निर्माण केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, कमळी वारगुडे असे पिशवी हरवलेल्या महिलेचे नाव आहे. त्या पिशवीमध्ये सोन्याची नथ, दीड हजार रुपयांची रोख रक्कम, तसेच आधार कार्ड व इतर

# दिवाकर निपुरेला अटक कधी?

## विजय वडेट्टीवार यांचा सवाल

। मुंबई । प्रतिनिधी ।

सावकारी कर्ज रोशन कुळे प्रकरणातील मुख्य सूत्रधार म्हणून नाव समोर आलेल्या दिवाकर निकुरे याला अद्याप अटक करण्यात आलेली नाही. त्याबद्दल काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी सरकारवर गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. प्रश्नोत्तरे काळात विधानसभेत बोलताना वडेट्टीवार म्हणाले की, दिवाकर निकुरे या सावकाराने शेतकऱ्यांच्या जमिनी बळकावून सुमारे १३० चेक दिले, मात्र ते सर्व चेक बाऊन्स झाले. एवढ्या मोठ्या प्रमाणात फसवणूक करूनही तो अद्याप फरार असून त्याच्यावर कारवाई का होत नाही, याचे उत्तर सरकारने द्यावे. रोशन कुळे प्रकरणात इतर आरोपींना अटक करण्यात आली असताना मुख्य सूत्रधार मात्र अजूनही मोकाट आहे. दिवाकर निकुरेच्या खात्यात ८ लाख रुपयांचा व्यवहार झाल्याची माहिती समोर आली आहे. तरीदेखील त्याला अटक होत नसल्याने त्याला नेमके कोणाचे संरक्षण मिळत आहे, असा सवाल वडेट्टीवार यांनी उपस्थित केला.

ते पुढे म्हणाले की, दुसऱ्या पक्षातून सत्ताधारी पक्षात प्रवेश केल्यानंतर संबंधित व्यक्तीवर कारवाई होत नसल्याचा संशय जनतेच्या मनात निर्माण झाला आहे. १३० चेक बाऊन्स करून फसवणूक करणाऱ्या व्यक्तीला तात्काळ अटक करून संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करण्यात यावी, अशी मागणी वडेट्टीवार यांनी केली.




# किरण ठाकूर यांचा स्तुत्य उपक्रम

। रेवदंडा । प्रतिनिधी ।

किरण ठाकूर यांनी सलग आठव्या वर्षी मुरूड तालुक्यातील कोर्लई येथील रायगड जिल्हा परिषद शाळेतील इयत्ता पहिली ते सातवीच्या विद्यार्थ्यांना वह्या व कलर पेनचे वाटप केले. शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीलाच विद्यार्थ्यांना आवश्यक शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देत शिक्षणासाठी प्रोत्साहन देण्याचा हा उपक्रम परिसरात कौतुकास पात्र ठरत आहे. यावेळी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद झळकत होता. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना नियमित शाळेत उपस्थित राहून मनापासून अभ्यास करण्याचा सल्ला दिला तसेच अशा सामाजिक उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाविषयी सकारात्मक भावना निर्माण होत असल्याचे मत व्यक्त केले. यावेळी जयेश म्हात्रे, राजेंद्र म्हात्रे, प्रशांत भोय, उपेंद्र बळकवडे, प्रितेश रोटकर, शेखर महालकर यांच्यासह शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद व ग्रामस्थ उपस्थित होते.

पान १ वरून

## ‘एचएसआरपी’ नंबर प्लेटसाठी शेवटचा दिवस

सेवा उपलब्ध होणार नाहीत. मात्र, वाहनाच्या फिटनेस प्रमाणपत्राच्या नूतनीकरणासाठी ही अट लागू राहणार नाही. दरम्यान, दि.३० जूनपर्यंत बसविण्यासाठी अधिकृतपणे अपॉइंटमेंट घेतलेल्या वाहनधारकांना दि.१ जुलैपासून सुरू होणाऱ्या दंडात्मक कारवाईतून तात्पुरता दिलासा देण्यात आला आहे. तसेच, सर्व शासकीय आणि निमशासकीय कार्यालयांनीही त्यांच्या ताब्यातील वाहनांवर दि.३० जूनपूर्वी नंबर प्लेट बसवून घ्याव्यात, असे आवाहन परिवहन विभागाचे सह आयुक्त शैलेश कामत यांनी केले आहे.

## महिलेकडून अल्पवयीन मुलीचा विनयभंग

टाकण्याची धमकी दिल्याचा आरोप करण्यात आला आहे. याप्रकरणी पीडित मुलीच्या पालकांनी दिलेल्या तक्रारीवरून संबंधित महिलेविरोधात महाड एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास महाड एमआयडीसी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक आनंद रावडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक फाळके तपास करीत आहेत.

## पाल्हे पूल दुरुस्तीच्या नावाखाली दिखावा

त्यानंतर पुलावरून अवजड वाहनांच्या वाहतुकीस जिल्हाधिकाऱ्यांनी बंदी घातली होती. मात्र, या आदेशाची उघडपणे पायमल्ली होत असल्याचा आरोप चित्रलेखा पाटील यांनी केला आहे. जेएसडब्ल्यूसह अन्य कंपन्यांची अवजड वाहने आजही या मार्गावरून सर्रास धावत असल्याने पुलावरील ताण अधिक वाढल्याचे सांगितले जात आहे.

दरम्यान, पुलाच्या दुरुस्तीसाठी विविध सामाजिक संस्था आणि शेकापकडून वारंवार निवेदने देण्यात आली. मात्र, सार्वजनिक बांधकाम विभागाने केवळ तात्पुरत्या उपाययोजना करून दुरुस्तीचे सोंग घेतल्याचा आरोप होत आहे. प्रत्यक्षात पुलाची अवस्था दिवसेंदिवस अधिक बिकट होत असून, रविवारी पुलाचा कठडा कोसळल्याने संभाव्य दुर्घटनेची भीती अधिक गडद झाली आहे.

पर्यटन हंगामात या मार्गावर वाहनांची मोठी वर्दळ असताना सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष नागरिकांच्या जीवावर बेतू शकते, असा आरोप करत चित्रलेखा पाटील यांनी तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे.

## करोडोंचा मुलामा, सुरक्षेचा बोजवारा

अलिबाग जिल्हा सामान्य रुग्णालय कायमच चर्चेत आहे. रुग्णांना चांगली सेवा न मिळणे, डॉक्टरांनी लिहून दिलेली औषधे रुग्णालयात न मिळणे, डॉक्टरांची कमतरता, ठिकठिकाणी पार्किंगचा प्रश्न अशा अनेक समस्यांनी जिल्हा सामान्य रुग्णालय ग्रासलेले आहे. त्यामध्ये आता रविवारी रात्री आणखी एका समस्येची भर पडली आहे. अलिबागमधील जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या दुसऱ्या मजल्यावरील प्रसूतीपश्चात काळजी कक्ष आणि सर्जिकल वॉर्डदरम्यान असलेल्या समोरील गेटमधील स्लॅब रात्री सव्वाअकरा वाजण्याच्या सुमारास कोसळला. याच गेटजवळून रुग्णांचे नातेवाईक ये-जा करीत होते. यावेळी कोणीही याठिकाणी नसल्याने सुदैवाने जीवितहानी टळली. मात्र, भला मोठा स्लॅब कोसळल्याने रुग्णालयातील सुरक्षेचा प्रश्न गंभीर झाला आहे.

अलिबागमधील जिल्हा सामान्य रुग्णालय २५० खाटांचे आहे. या रुग्णालयात हजारो रुग्णांची तपासणी करून त्यांच्यावर उपचार केले जातात. ४० वर्षे जून्या असलेल्या अलिबागमधील जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या इमारतीचे मागील दोन वर्षांपुर्वी स्ट्रक्चरल ऑडीट करण्यात आले होते. त्यानंतर पुन्हा दुरुस्ती करण्यायोग्य रुग्णालय असल्याचे अहवलानुसार बांधकाम विभागाने सांगितले होते. त्यानंतर सुमारे ६ कोटीहून अधिक खर्च इमारतीच्या दुरुस्तीसाठी करण्यात आला. स्लॅब टाकण्यापासून खिडकी दुरुस्ती, प्लास्टर अशा अनेक प्रकारची कामे मागील वर्षभरात करण्यात आली. मात्र, पहिल्याच पावसात रुग्णालयाच्या इमारतीचा स्लॅब कोसळण्याच्या घटना घडली होती. यापूर्वी अपघात विभाग व डायलेसीस सेंटरलगत रहदारीच्या ठिकाणी देखील स्लॅब कोसळला होता. त्यानंतर पुन्हा रविवारीदेखील स्लॅब पडल्याची घटना घडली. त्यामुळे स्लॅब कोसळल्याच्या घटना दिवसेंदिवस घडत असून, त्यावर ठोस उपाय करण्यास सार्वजनिक बांधकाम विभाग उदासीन असल्याचे दिसून येत आहे. रुग्णालयाच्या दुरुस्तीच्या नावाखाली केलेला खर्च पाण्यात जात असल्याची भिती व्यक्त केली जात आहे. याबाबत बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंता धायतडक यांच्याशी संपर्क साधला, मात्र होऊ शकला नाही.

दरम्यान, जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या दुरुस्तीसाठी करोडो रुपये खर्च करण्यात आले आहेत. डागडुजी करून रुग्णालयाला चकाचक ठेवण्याचा प्रयत्नदेखील करण्यात आला. परंतु, निकृष्ट दर्जाच्या कामामुळे स्लॅब कोसळत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत या रुग्णालयाची दुरुस्ती करण्यात आली आहे. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांविरोधात कारवाई करण्यात यावी, अशी मागणी जोर धरत आहे.

## उरणमध्ये एका दिवसात तीन मृतदेह

तिसरी घटना उरण रेल्वे स्थानकाजवळ घडली. स्थानकालगतच्या खारफुटीच्या झुडपांमध्ये ३५ ते ४० वयोगटातील एका अनोळखी पुरुषाचा मृतदेह आढळून आला. त्याची ओळख पटविण्याचे काम सुरू असून, पोलिसांकडून तपास करण्यात येत आहे. हे तिन्ही मृतदेह शवविच्छेदनासाठी शासकीय इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालयात पाठविण्यात आले आहेत. दरम्यान, एका दिवसात सलग तीन मृतदेह सापडल्याने उरणकरांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. या घटनांचा परस्परांशी काही संबंध आहे का, की त्या स्वतंत्र घटना आहेत, याचा तपास पोलीस करीत असून, सत्य परिस्थिती लवकरात लवकर समोर यावी, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

## पतीच्या दीर्घायुष्यासाठी सुवासिनींचे पूजन

झाडाजवळ महिलांची अलोट गर्दी झाली होती.

वटपौर्णिमेनिमित्त सोमवारी सकाळपासूनच सुवासिनींमध्ये पूजेची लगबग सुरू झाली होती. साजशृंगार करून हातामध्ये पूजेचे ताट घेऊन महिलांनी वडाच्या झाडाला सात फेऱ्या मारून वडाच्या झाडाची मनोभावे पूजा केली. आंबे, केळी, फुले, हळद-कुंकू साहित्याने वडाची पूजा करत सुवासिनींनी जन्मोजन्मी हाच पती लाभो, अशी प्रार्थना केली. यावेळी महिलांनी एकमेकींना हळदी-कुंकू लावून आंब्याचे वाण दिले. काही महिलांनी परंपरेपरेनुसार वडाच्या झाडाचे पूजन केल्यानंतर वृक्षारोपणाचे महत्त्वही स्पष्ट केले. यावेळी अनेकांनी वृक्षारोपणातून ‘‘झाडे लावा झाडे जगवा’’ हा संदेश देण्याचा प्रयत्न केला.

आख्यायिकेनुसार, सत्यवान आणि सावित्री या दाम्पत्याच्या आयुष्यात आलेला एक दिवस म्हणून वटपौर्णिमा आधुनिक युगातही तितक्यात पारंपरिक पद्धतीने साजरी करण्यात आली. परंपरेप्रमाणे वटवृक्ष असलेल्या ठिकाणी वटवृक्षाची पूजा करण्यासाठी महिलांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली. विशेष म्हणजे, पावसानेही सकाळपासून हजेरी लावली होती. मात्र, त्याचा विचार न करता, आपल्या पतीच्या दीर्घायुष्यासाठी महिला वटवृक्षाच्या पूजनासाठी घराबाहेर पडल्या. ज्येष्ठ महिलांसह नव्या पिढीतील सुवासिनींसोबत नववविवाहितांनीदेखील वटपौर्णिमेचे व्रत मनोभावे केले. त्यामुळे पौर्णिमेनिमित्त जिल्ह्यात मंगलमय वातावरण निर्माण झाले होते.

वटपौर्णिमा या सणाच्या निमित्ताने सर्वाधिक ऑक्सिजन देणाऱ्या वडाच्या भव्य झाडाची सुरक्षा पूर्वापार चालत आली आहे. झाडाची ‘‘पूजा करा, झाडे तोडू नका’’ असा संदेशही व्रतातून दिला जातो. मात्र, अनेकांनी बाजारातून किंवा झाड असेल त्या ठिकाणाहून वडाच्या फांद्या आणून त्याला तुळशीत रोवून पूजा केली. काही ठिकाणी झाड लावून वटसावित्रीची पूजा अनोख्या पद्धतीने केली.

## धाटाव पुन्हा प्रदूषणाच्या विळख्यात

पावसाळ्याच्या सुरुवातीलाच अशा प्रकारच्या घटना घडतात. अनेक ठिकाणी रसायनमिश्रित पाणी रस्त्यावर, नाल्यांमध्ये आणि शेतांमध्ये वाहून जात असल्याचे वारंवार दिसून येते. त्यामुळे औद्योगिक सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी उभारण्यात आलेल्या सीईटीपी यंत्रणेच्या कार्यक्षमतेवर पुन्हा गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.नागरिकांचा आरोप आहे की, काही उद्योग पावसाचा आडोसा घेत रासायनिक सांडपाणी बाहेर सोडतात. त्यामुळे पहिल्या मुसळधार पावसाची काही बेजबाबदार उद्योग वाट पाहात असतात का? असा संतप्त सवाल परिसरातून उपस्थित केला जात आहे.

दरम्यान, ग्रामपंचायत महादेवखार (महाळुंगे) हद्दीतील खलाटी परिसरात रासायनिक प्रदूषणाचा मोठा फटका शेतकऱ्यांना बसला आहे. शेतकरी संदीप कांडणेकर, राज जोशी, चंद्रकांत कांबळे, संजय शिंदे आणि भालचंद्र कांबळे हे सकाळी पावसामुळे उगवलेल्या पिकांची पाहणी करण्यासाठी शेतात गेले असता, त्यांच्या शेतात पिवळसर रंगाचे रसायनयुक्त पाणी शिरल्याचे निदर्शनास आले. त्यांच्या म्हणण्यानुसार, या विषारी पाण्याच्या संपर्कामुळे नव्याने उगवलेली पिके अक्षरशः जळून गेली असून, मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. आधीच नैसर्गिक संकटांचा सामना करणाऱ्या शेतकऱ्यांवर आता औद्योगिक प्रदूषणाचे नवे संकट कोसळल्याने त्यांच्यासमोर उपजीविकेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. अवघ्या महिनाभरापूर्वी शेतकरी विलास म्हात्रे यांच्या शेततळ्यात रसायनयुक्त पाणी शिरल्याने जिताडा व इतर प्रजातींचे मासे मोठ्या प्रमाणात मृतावस्थेत आढळले होते. या घटनेमुळे त्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचा आरोप करण्यात आला होता. मात्र, त्यानंतरही प्रभावी उपाययोजना न झाल्याने प्रदूषणाचा प्रश्न कायम असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे.

स्थानिकांच्या माहितीनुसार, औद्योगिक प्रदूषणामुळे परिसरातील नाले, ओढे आणि जलस्रोत सातत्याने दूषित होत आहेत. अनेक वेळा जलचर मृतावस्थेत आढळल्याच्या घटनांमुळे पर्यावरणाचा समतोल बिघडत असल्याची चिंता व्यक्त होत आहे. दूषित पाण्याचा परिणाम भूजलावरही होण्याची शक्यता तज्ज्ञांकडून व्यक्त केली जात असून, भविष्यात पिण्याच्या पाण्याचाही प्रश्न गंभीर होऊ शकतो. प्रदूषण नियंत्रणासाठी स्थापन करण्यात आलेल्या यंत्रणा आणि संबंधित विभाग प्रत्यक्षात किती प्रभावीपणे काम करतात, हा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या कंपन्यांवर कठोर कारवाई होणार की नेहमीप्रमाणे केवळ नोटिसा देऊन प्रकरण दडपले जाणार, याकडे संपूर्ण परिसराचे लक्ष लागले आहे.

**दोषींवर कारवाईची मागणी**

स्थानिक नागरिक, शेतकरी आणि पर्यावरणप्रेमींनी सीईटीपी प्रशासन, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ तसेच संबंधित शासकीय यंत्रणांनी या संपूर्ण प्रकरणाची तातडीने सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी केली आहे. पर्यावरणाशी खेळ करणाऱ्या उद्योगांसह त्यांना पाठीशी घालणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांचीही जबाबदारी निश्चित करण्याची मागणी होत आहे. जर वेळेत कठोर कारवाई झाली नाही, तर पावसाचा प्रत्येक थेंब प्रदूषण लपविण्याचे साधन ठरेल आणि त्याची किंमत निसर्गासह सर्वसामान्य नागरिकांना चुकवावी लागेल, असा इशारा देण्यात आला आहे.

# अवैध मांस विक्रेत्यावर कारवाई

। उरण । प्रतिनिधी ।

नवी मुंबई विमानतळाच्या धावपट्टीपासून अवघ्या दोन ते तीन किलोमीटर अंतरावर नागरी विमान वाहतूक सुरक्षेच्या नियमांचे उल्लंघन करून अवैधरीत्या प्राण्यांची कत्तल व मांस विक्री सुरू असल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणाची दखल घेत उलवे पोलिसांनी अवैध मटण दुकानावर धाड टाकून दुकानदाराविरोधात गुन्हा दाखल केला असून, या कारवाईमुळे विमानतळ परिसरातील बेकायदेशीर मांस विक्रेत्यांमध्ये खळबळ उडाली आहे. नागरी विमान वाहतूक नियमांनुसार कोणत्याही विमानतळाच्या दहा किलोमीटर परिसरात उघड्यावर प्राण्यांची कत्तल अथवा मांस विक्री करण्यास सक्त मनाई आहे.


### जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशील श्री. संदिप नरेश वाघपंजे व श्री. दशरथ दत्तात्रेय पाटील यांनी खाली वर्णन केलेल्या मौजे म्हात्रोळी, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथे जमीन मिळकतीबाबत श्री. दिपक चिंतामण पाटकर यांचेसोबत साठेकरार केलेला आहे. त्यामुळे सदर जमीन मिळकतीमध्ये आमच्या अशीलांचा कायदेशीर हक्क, हितसंबंध व अधिकार आहे.

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| म्हात्रोळी | १३३/१ | एकूण १-२८-१० | २५-५५ |

तरी सदर जमीन मिळकतीच्या संदर्भात कोणीही कोणत्याही प्रकारे जमीन मालकाबरोबर खरेदी-विक्री व/किंवा हस्तांतरणाचा व्यवहार करू नये, याउपरही कोणीही आमच्या अशिलांच्या कायदेशीर मालकीहक्काला बाधा येईल अशाप्रकारे कोणताही व्यवहार केल्यास तो बेकायदेशीर व अवैध व्यवहार आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

अलिबाग,
दिनांक २९-०६-२०२६

(ॲड.अमर अशोक घरत)
मु.पो. थळ, ता.अलिबाग,
जिल्हा-रायगड.
मो - ८८०५०३७४७४.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. पंढरीनाथ म्हात्रे मोबा नं. ९९३०९५५६२१ खालील वर्णनाची मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक श्री. दिनेश वामन वेटा व रविंद्र कृष्णा वेटा, रा. कोपरखैरणे यांचेकडून कायम खरेदी करणार असून, तशी बोलणी आमचे अशिल व मिळकत मालक यांचेमध्ये सुरू आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे-नवघर, ता. सुधागड, जि. रायगड**

| गट नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू. पैसे) |
|---|---|---|
| १६९९ | १-२५-०० | ०.५३ |
| पैकी मिळकत मालकाचे ०-२०-०० हे.आर. मधील अविभक्त हिस्सा | | |

वरील मिळकत पूर्णपणे निर्वेध असल्याची खात्री मिळकतीचे मालक याने आमचे अशिलास दिली असून, मिळकत मालक आमचे अशिलाचे लाभांत खरेदीखत करून देणार आहे. तरी वरील मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही भाडेकरार, साठेकरार, फरोक्त, वारसा, गहाण, दान, बक्षीस, वहिवाट, पोटगी, मृत्यूपत्रान्वये अथवा अन्य हक्क असल्यास अशा व्यक्तींनी त्यांच्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ (चौदा) दिवसांचे आत कळवाव्यात. सदर मुदतीमध्ये कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पाली
दिनांक : ३०/०६/२०२६

सही/-
ॲड. समीर अनंत आंबोलकर
वरद कृपा निवास, बल्लाळेश्वर नगर
पाली, ता. सुधागड, जि. रायगड
मो.नं. ९२०९२९६७२५/९४०३३०५२५०

## पेज नदीवरील प्रभू श्रीरामांच्या पाऊलखुणा

# पाण्याखाली बुडून जाणार?

### टोरंट प्रकल्पावर स्थानिकांचा सवाल



**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील पेज नदीवरील साई डोंगर परिसरात टोरंट पॉवर एनर्जी स्टोरेज सोल्युशन प्रा.लि. या कंपनीकडून प्रस्तावित जलविद्युत प्रकल्पामुळे प्रभू श्रीराम आणि पांडवांशी संबंधित मानल्या जाणाऱ्या ऐतिहासिक व धार्मिक पाऊलखुणा पाण्याखाली जाण्याची भीती स्थानिकांनी व्यक्त केली आहे. या पार्श्वभूमीवर पर्यावरणप्रेमी पप्पू देशमुख यांनी सरकारला सवाल उपस्थित केला आहे की, जय श्रीरामच्या घोषणा देत सत्तेवर आलेले सरकार प्रभू श्रीरामांच्या पाऊलखुणाच नष्ट होऊ देणार का?

पाली तर्फे कोतवाल-खलाटी ग्रामपंचायत हद्दीतील साई डोंगर परिसरात हा जलविद्युत प्रकल्प प्रस्तावित असून, त्याला स्थानिक ग्रामस्थांकडून तीव्र विरोध होत आहे. स्थानिकांच्या मते, पेज नदी परिसराशी प्रभू श्रीराम आणि पांडवांच्या वास्तव्याची आख्यायिका जोडलेली आहे. वनवास काळात प्रभू श्रीराम या मार्गाने गेले होते, अशी स्थानिकांची श्रद्धा असून, नदीपात्रातील खडकांवर त्यांच्या पाऊलखुणा आजही असल्याचा दावा ग्रामस्थ करतात.

मोहमाळवाडीच्या मागील भागात नदीपात्रात रथ गेल्याचे चिन्ह म्हणून मोठा चर असल्याचेही सांगितले जाते. याशिवाय, पूर्वी खडकांवर प्रभू श्रीराम व पांडवांची नावे कोरलेली होती. कालांतराने ती अस्पष्ट झाली असली तरी पाऊलखुणा अद्याप अस्तित्वात असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे.

या पाऊलखुणांना आदिवासी समाजासह अनेक भाविकांचे श्रद्धास्थान मानले जाते. येथे नियमितपणे फुले, अबीर-गुलाल अर्पण करून पूजा केली जाते. मात्र, प्रस्तावित धरणामुळे हा संपूर्ण परिसर पाण्याखाली जाण्याची शक्यता असल्याने धार्मिक वारसा आणि पर्यावरण या दोन्हींचे नुकसान होईल, अशी भीती व्यक्त केली जात आहे.

> पेज नदी परिसरातील प्रभू श्रीराम आणि पांडवांच्या पाऊलखुणा अनेक दशकांपासून स्थानिकांच्या श्रद्धेचे केंद्र आहेत. विकासाच्या नावाखाली सरकारने हा धार्मिक आणि सांस्कृतिक वारसा नष्ट करू नये. आमच्या श्रद्धास्थानाला धोका निर्माण झाला, तर स्थानिक नागरिक शांत बसणार नाहीत आणि लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन उभारले जाईल.
>
> – पप्पू देशमुख (स्थानिक पर्यावरणप्रेमी)

पर्यावरणप्रेमींच्या मते, या प्रकल्पामुळे मोठ्या प्रमाणावर जंगल, जैवविविधता आणि स्थानिकांचा सांस्कृतिक वारसा धोक्यात येणार आहे. त्यामुळे सरकारने विकासासोबतच धार्मिक आणि ऐतिहासिक वारशाचे संरक्षण करण्यासाठी ठोस भूमिका घ्यावी, अशी मागणी करण्यात येत आहे.

दरम्यान, स्थानिक ग्रामस्थांनी प्रशासनाकडे या धार्मिक स्थळाचे जतन करण्यासाठी विशेष उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. विकास आणि श्रद्धा यांच्यात समतोल राखत निर्णय घेण्याची जबाबदारी सरकारवर असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे.

---

# सिम्पसन टँक पुनर्जीवित करा

### पाणीटंचाईवर मात करण्यासाठी सावंत यांची मागणी



**। नेरळ । प्रतिनिधी ।**

थंड हवेचे ठिकाणी असलेल्या माथेरान मध्ये उन्हाळ्यात सर्वाधिक पर्यटक पर्यटनासाठी येत असतात. दरवर्षी एप्रिल-मे महिन्याच्या ऐन पर्यटन हंगामात माथेरानला पाणीटंचाईला सामोरे जावे लागते. १७० वर्षे जुना शार्लोट लेक हा सध्या एकमेव पिण्याच्या पाण्याचा स्रोत असून, ब्रिटिशांनी तयार केलेल्या सिम्पसन टँक या धरणाचे पुनर्जीवन करावे आणि पाणीप्रश्न सोडावा, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते नितीन सावंत यांनी केली आहे.

ब्रिटिशांनी माथेरानचा शोध लावल्यावर माथेरान मध्ये राहणारे लोक यांच्यासाठी ८०० मीटर उंचीवरदेखील पिण्याच्या पाण्याची व्यवस्था असावी. या दृष्टीने शार्लोट लेकनंतर १८७६ मध्ये कॅप्टन सिम्पसन यांनी बांधून घेतला आणि दोन ठिकाणी धरणे बांधली. माथेरानमध्ये २२०-२५० इंच पाऊस पडूनही मे महिन्याच्या ऐन हंगामात पाण्याअभावी माथेरानचे पर्यटन धोक्यात येत आहे. कारण पाण्याचा तुटवडा भासत आहे असून, त्यास महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कारणीभूत आहे. प्राधिकरणकडून राबविण्यात येत असलेल्या योजनेमुळे शहरात व्यवस्थित पाणीपुरवठा होत नाही आणि सर्व भागाला प्राधिकरण पाणी पुरवू शकत नाही हे सिद्ध झाले आहे.

सध्या माथेरान मधील दुर्लक्षित असलेला सिम्पसन टँक तातडीने पुनरुज्जीवित करावा, अशी मागणी स्थानिकांकडून होत आहे. या तलावाची मूळ क्षमता ७६,००० क्यूबिक मीटर होती. १९०७ पासून मिनीट्रेनच्या वाफेच्या इंजिनासाठी याच तलावातून पाणी वापरले जात होते. सिम्पसन टँकमधील पाणी नगरपरिषद प्रशासनाने नळपाणी योजना तयार करून शहरात वितरित केल्याने आर्थिक लाभ पालिकेला होऊ शकतो. प्रथम घरगुती नळधारक, नंतर लॉज व्यावसायिकांना रास्त दरात पाणी मिळेल.

---

## निवडक



### सुमेध खैरेंच्या वाढदिवसानिमित्त शैक्षणिक साहित्य वाटप

**पाली/गोमाशी :** पाली नगरपंचायतीचे नगरसेवक सुमेध खैरे यांच्या वाढदिवसानिमित्त नांदगाव विद्यालयात विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. विद्यालयातील शिक्षिकांकडून श्री. खैरे यांचे वाढदिवसानिमित्त औक्षण करण्यात आले. विद्यार्थ्यांसोबत केक कापून वाढदिवस साजरा करण्यात आला. यावेळी विद्यार्थी आणि शिक्षक वृंदाच्या वतीने वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यात आल्या. सर्व विद्यार्थ्यांना चॉकलेट देऊन तोंड गोड करण्यात आले. याच कार्यक्रमात महाबँक सेवानिवृत्त परिवार, डोंबिवली यांच्यावतीनेही विद्यार्थ्यांना शालेय गणवेश भेट देण्यात आले. या गणवेशांचे वाटपही नगरसेवक सुमेध खैरे व शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष जगदीश सुतार यांच्या हस्ते करण्यात आले. महाबँक सेवानिवृत्त परिवाराच्या या सामाजिक कार्याचे नगरसेवक सुमेध खैरे यांनी कौतुक केले. याप्रसंगी नगरसेवक सुमेध खैरे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष जगदीश सुतार, प्राचार्य अशोक शिंदे, शिक्षकवृंद, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भूषण सुतार व आभार प्रदर्शन महेंद्र निकुंभ या शाळेच्या शिक्षकांनी केले.

### पोलीस निरीक्षकपदी नारायण एकशिंगे



**महाड :** महाड शहर पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षक पदावर अनुभवी अधिकारी नारायण एकशिंगे यांची नियुक्ती करण्यात आली असून, त्यांनी नुकताच आपल्या पदाचा कार्यभार स्वीकारला आहे. त्यांच्या नियुक्तीमुळे महाड शहरातील कायदा व सुव्यवस्था अधिक सक्षम होईल, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे. यापूर्वी महाड शहर पोलीस ठाण्यात कार्यरत असलेले पोलीस निरीक्षक संदीप भोसले यांच्या विनंतीनुसार त्यांची पेण येथे बदली करण्यात आली होती. त्यांच्या बदलीमुळे रिक्त झालेल्या पदावर नारायण एकशिंगे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मूळचे अहिल्यानगर जिल्ह्यातील पारनेर (पाथर्डी) तालुक्यातील रहिवासी असलेले नारायण एकशिंगे यांनी महाराष्ट्र पोलीस दलात तब्बल २२ वर्षांची उल्लेखनीय सेवा बजावली आहे. आपल्या सेवाकाळात त्यांनी बीड, सांगली तसेच नक्षलवादग्रस्त गडचिरोली जिल्ह्यात विविध जबाबदाऱ्या यशस्वीपणे सांभाळत उत्कृष्ट कामगिरी केली आहे. कर्तव्यदक्ष, शिस्तप्रिय आणि प्रभावी अधिकारी म्हणून ओळख असलेल्या एकशिंगे यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत त्यांना विविध पदके व सन्मानांनी गौरविण्यात आले आहे.

---

# सिडकोच्या अतिरिक्त मुख्य अभियंतापदी संतोष ओंभासे




**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

सिडको महामंडळ, नवी मुंबई येथे कार्यरत असलेले संतोष सुधाकर ओंभासे यांची अतिरिक्त मुख्य अभियंतापदावर पदोन्नतीने नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल विविध स्तरातून अभिनंदन व शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

संतोष ओंभासे यांनी सिडको महामंडळात तब्बल ३२ वर्षे ६ महिने प्रामाणिक व कर्तव्यदक्ष सेवा बजावली आहे. गेल्या पाच वर्षांपासून अधीक्षक अभियंता म्हणून त्यांनी विविध महत्त्वाच्या प्रकल्पांची जबाबदारी यशस्वीपणे सांभाळली. त्यांच्या प्रदीर्घ अनुभव, कार्यतत्परता आणि प्रशासकीय कौशल्याची दखल घेत त्यांची अतिरिक्त मुख्य अभियंता पदावर पदोन्नती करण्यात आली आहे.

त्यांच्या या यशाबद्दल बजरंग राजाराम भिंगारे, नरेंद्रकुमार बजरंग भिंगारे (करमाळा) तसेच देविदास बबन वाडेकर (पेण) यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या. त्यांच्या पदोन्नतीमुळे करमाळा व पेण परिसरातील नागरिकांनीही आनंद व्यक्त केला असून, त्यांच्या पुढील कारकीर्दीसाठी शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. संतोष ओंभासे यांनी नुकताच अतिरिक्त मुख्य अभियंतापदाचा पदभार स्वीकारला आहे.

---

## प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे

# रस्ता चिखलात



### जीवघेण्या प्रवासामुळे तीन वाड्यांमधील नागरिक त्रस्त

**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

दक्षिण काशी म्हणून प्रसिद्ध असलेल्या हरिहरेश्वर शेजारील मुख्य रस्त्याची सध्या कमालीची दुरवस्था झाली आहे. हरिहरेश्वर ते बाणगंगा गावाकडे जाणाऱ्या रस्त्याची अक्षरशः चाळण झाली असून, हा रस्ता बाणगंगा, सावरवाडी आणि साक्षभैरी या तीन महत्त्वाच्या वाड्यांना जोडणारा एकमेव मुख्य दुवा आहे. पाऊस सुरू होताच हा रस्ता कमालीचा निसरडा, चिखलमय आणि धोकादायक बनला असून, नागरिक आणि पर्यटकांना याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

प्रशासकीय निष्काळजीपणामुळे एखाद्या दुचाकीस्वाराचा जीव गेला किंवा एखादा गंभीर रुग्ण दगावला, तर त्याला जबाबदार कोण?'' असा संतप्त सवाल आता स्थानिक नागरिक आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते मंडळी विचारत आहेत.

धक्कादायक बाब म्हणजे, गेल्या तब्बल १५ वर्षांत या रस्त्याची साधी डागडुजीही करण्यात आलेली नाही. त्यामुळे रस्त्यावर सध्या केवळ चिखल आणि खड्ड्यांचे साम्राज्य पसरले असून, स्थानिक नागरिकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे.

सध्याची परिस्थिती इतकी भयंकर झाली आहे की, या रस्त्यावरून साधे वाहन चालवणे म्हणजे मृत्यूला आमंत्रण देण्यासारखे आहे. चिखलाच्या प्रचंड दलदलीमुळे दुचाकींचे टायर जागच्या जागी वेडेवाकडे घसरत आहेत तर दुसरीकडे, गावात ये-जा करणाऱ्या रिक्षा चिखलामुळे पुढे जाणे अशक्य झाले आहे. रिक्षा पुढे नेण्याचा प्रयत्न केला असता, ती चिखलावरून घसरत थेट पाठीमागे सरकत फरफडत जात असल्याचे अत्यंत धक्कादायक चित्र समोर आले आहे अशा अत्यंत धोकादायक स्थितीत रिक्षा पलटी होऊन मोठा अपघात होण्याची भीती निर्माण झाली आहे. या तीन वाड्यांमधील अनेक शाळकरी मुले, नोकरदार आणि वयोवृद्ध नागरिकांना याच चिखलातून रोज जीवघेणी कसरत करावी लागत आहे.

---

# शहर अभियंता पदावरून पनवेल मनपात वाद

### नियमांनुसार कर्डिले पात्र, चव्हाणांच्या पात्रतेवर प्रश्नचिन्ह



**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल महानगरपालिकेतील शहर अभियंता पदाच्या पदोन्नती प्रक्रियेवरून नव्या वादाला तोंड फुटले असून, या नियुक्ती प्रक्रियेत नियमांचे पालन होत आहे का, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. शहर अभियंता आणि नगररचनाकार या महत्त्वाच्या तांत्रिक पदांसाठी सुरू असलेल्या हालचालींमध्ये काही अधिकाऱ्यांच्या पात्रतेवर आक्षेप घेतले जात आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, सध्या पाणीपुरवठा विभागात कार्यरत असलेले शाखा अभियंता विलास चव्हाण हे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातून प्रतिनियुक्तीवर आलेले अधिकारी आहेत. त्यांच्या सेवेचे महानगरपालिका सेवेत अंतिम समावेशन झालेले नसताना त्यांना वरिष्ठ पदासाठी पुढे केले जात असल्याची चर्चा पालिका वर्तुळात सुरू आहे. त्यामुळे त्यांच्या पात्रतेबाबत प्रश्न उपस्थित करण्यात येत आहेत. दुसरीकडे, उपअभियंता राजेश देविदास कर्डिले यांचा दावा अधिक मजबूत असल्याचे सांगितले जात आहे. २००४ पासून नगररचना आणि बांधकाम विभागात कार्यरत असलेल्या कर्डिले यांच्याकडे बी.ई. (सिव्हिल) तसेच नागरी व्यवस्थापनातील उच्च शैक्षणिक पात्रता आहे. तसेच त्यांच्या पदोन्नतीसंदर्भातील प्रकरण मुंबई उच्च न्यायालयातही विचाराधीन असून, न्यायालयाने संबंधित मागण्यांवर नियमानुसार निर्णय घेण्याचे निर्देश दिल्याचे सांगितले जाते. शासनाच्या सेवाप्रवेश नियमांनुसार आणि उपलब्ध सेवाज्येष्ठता नोंदींच्या आधारे कर्डिले हे कार्यकारी अभियंता व त्यानंतर शहर अभियंता पदासाठी पात्र ठरत असल्याचा दावा केला आहे.

---

## अनोळखी इसमाचा मृत्यू

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका अनोळखी पुरुषाचा मृत्यू झाल्याची नोंद करण्यात आली असून त्याच्या नातेवाईकांचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी नागरिकांना आवाहन केले आहे. सदर व्यक्तीचा मृतदेह सीसीआय लॉजिस्टीक कंपनी पळस्पेच्या मागील बाजूस असलेल्या कंपाऊंडमध्ये आढळून आला असून, मृत व्यक्तीचे वय अंदाजे ६० वर्षे असून उंची सुमारे ५ फूट ७ इंच आहे. त्याचा रंग गोरा, चेहरा उभट, नाक सरळ असून केस काळे व पांढरे मिश्रित आहेत. उजव्या हाताच्या दंडावर इंग्रजी अक्षरातील टॅटू कोरलेला आहे.

---

## विद्यार्थ्यांना मोफत वह्या वाटप

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

स्वाभिमानी रिपब्लिकन पक्ष युथ रिपब्लिकनच्या वतीने शालेय विद्यार्थ्यांसाठी मोफत वह्या वाटपाचा कार्यक्रम बुधवार, दि. १ जुलै २०२६ रोजी आयोजित करण्यात आला आहे. हा उपक्रम पनवेल येथील गुरुलिंगेश्वर शाळा, पनवेल एम.टी. डेपो परिसर येथे पार पडणार आहे. जिल्हाध्यक्ष महेश साळुंखे यांच्या पुढाकारातून आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची मदत करण्यात येणार आहे. रिपब्लिकन चळवळीचे नेते नरेंद्र गायकवाड यांच्या वाढदिवसानिमित्त हा उपक्रम राबविण्यात येणार आहे.

---

# वहिवाट रस्ता बंद करण्याचा डाव हाणून पाडणार

### चौल-पाझर संघर्ष समितीचे तहसीलदारांना निवेदन



**। चौल । प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील चौल-पाझर येथील शेतकऱ्यांच्या पूर्वापार वापरात असलेला बैलगाडी मार्ग, पाऊलवाट आणि पावसाळी पाण्याचे नैसर्गिक मार्ग अबाधित ठेवावेत, अन्यथा आम्हा शेतकऱ्यांवर अन्याय होईल, अशी मागणी करत चौल-पाझर संघर्ष समितीने सोमवारी (दि. २९) अलिबाग तहसीलदार विक्रम पाटील यांना निवेदन दिले.

समितीच्या म्हणण्यानुसार, लिबेरा डेव्हलपर्स प्रा.लि.ने चौल-पाझर हद्दीतील अनेक शेतजमिनी खरेदी केल्या आहेत. मात्र, या जमिनींमधून स्थानिक शेतकऱ्यांचा अनेक दशकांपासून सुरू असलेला वहिवाट हक्क, पारंपरिक बैलगाडी रस्ता आणि पाऊलवाट अस्तित्वात असल्याची हरकत कंपनीला यापूर्वीच लेखी स्वरूपात देण्यात आली होती. तरीही या हरकतींचा विचार न करता कंपनीने खरेदी व्यवहार सुरूच ठेवल्याचा आरोप समितीने केला आहे. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, कंपनीने २०२४ मध्ये संबंधित जमिनींची हद्द कायम मोजणी करून घेतली असून, भविष्यात कुंपण उभारून शेतकऱ्यांचा पारंपरिक रस्ता बंद करण्याची शक्यता असल्याचे निदर्शनात आणून दिले आहे.

> शेतकऱ्यांचा पूर्वापार चालत आलेला वहिवाट हक्क कोणत्याही परिस्थितीत हिरावून घेऊ दिला जाणार नाही. प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून रस्ते आणि नैसर्गिक पाण्याचे मार्ग संरक्षित करावेत. अन्यथा शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी कायदेशीर तसेच लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडले जाईल.
>
> – चौल-पाझर संघर्ष समिती, चौल

यामुळे तहसीलदार विक्रम पाटील यांनी तातडीने हस्तक्षेप करून शेतकऱ्यांचा पारंपरिक वहिवाट हक्क, बैलगाडी रस्ता, पाऊलवाट तसेच पावसाळी पाण्याचे नैसर्गिक मार्ग कायम राखण्यासाठी संबंधित कंपनीला स्पष्ट सूचना द्याव्यात आणि भविष्यात कोणताही अडथळा निर्माण होणार नाही, याची खात्री करावी, अशी मागणी समितीचे सदस्य शेतकरी विनायक थळकर, केशव ठाकूर, शिवराम पडते, जीवन लोहार, शरद नाईक, पांडुरंग पडते, हेमंत पाटील, भरत घरत, अनिल घरत, प्रकाश पडते, सिद्धेश लोहार, शैलेश नाईक, आशिष म्हात्रे आदींसह उपस्थित शेतकऱ्यांनी केली आहे.

---

**शिक्षणालाच प्राधान्य द्या** | **सानेगाव आश्रमशाळेत जनजागृती**

# सायबर गुन्ह्यांपासून सावध राहा!




**। चणेरा । प्रतिनिधी ।**

डिजिटल युगात वाढत्या सायबर गुन्ह्यांच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी रोहा तालुक्यातील सानेगाव येथील शासकीय आश्रमशाळेत जनजागृती अभियान उत्साहात पार पडले. दरम्यान, सायबर गुन्ह्यांपासून सावध राहा, शिक्षणालाच प्राधान्य द्या, असे आवाहन पोलीस उपनिरीक्षक विनोद गायकवाड यांनी केले. या उपक्रमात विद्यार्थ्यांना सुरक्षित इंटरनेट वापर, ऑनलाइन फसवणुकीपासून बचाव, सोशल मीडियावरील धोके तसेच कायदेशीर मदतीची माहिती दिली.

कार्यक्रमात विद्यार्थीदशा ही आयुष्य घडविण्याचा सुवर्णकाळ असल्याचे सांगत शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. शालेय शिस्त, नियमांचे पालन आणि शिक्षणामुळे होणारी वैयक्तिक तसेच सामाजिक प्रगती याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. अनावश्यक गोष्टींपासून दूर राहून शिक्षणालाच सर्वोच्च प्राधान्य द्यावे, असे आवाहन करण्यात आले.

या कार्यक्रमाला मुख्याध्यापिका विजया पाटील, मेलजोल प्रकल्प समन्वयक प्रतीक कोळी, फॅसिलिटेटर महेश बांगारे, विभा भातिकर, शिक्षकवृंद आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहाय्यक शिक्षक मिलिंद पाटील यांनी केले.

> सायबर गुन्हे दिवसेंदिवस अधिक क्लिष्ट होत आहेत. विद्यार्थ्यांनी मोबाईल आणि इंटरनेटचा वापर जबाबदारीने करणे आवश्यक आहे. कोणत्याही संशयास्पद लिंक, कॉल किंवा संदेशांना प्रतिसाद देऊ नये. सायबर फसवणूक झाल्यास वेळ न दवडता १९३० या हेल्पलाइनवर संपर्क साधल्यास नुकसान टाळण्यास मोठी मदत होते.
>
> – विनोद गायकवाड, पोलीस उपनिरीक्षक

---

## चालत्या रिक्षावर झाड कोसळले

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

खारघर सेक्टर ७ मधील जीएसटी इमारत आणि साई मंदिर नाल्यालगतच्या रस्त्यावर महाकाय झाड चालत्या रिक्षेवर कोसळले. या अपघातात रिक्षाचे नुकसान झाले असून, प्रवासी थोडक्यात बचावले आहेत. रिक्षाचालक या घटनेत किरकोळ जखमी झाला आहे. झाडाच्या फांद्या आणि खोड रस्त्यावर पसरल्यामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण झाला. तसेच, झाड कोसळताना विद्युत खांबाला धडक लागल्याने काही काळ वाहतूक बंद ठेवण्यात आली होती.

---

# सराईत गुन्हेगार पनवेल शहर पोलिसांच्या ताब्यात

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल शहर परिसरात बंद दुकानाची कडी कोयंडे उचकटून आतमध्ये असलेली रोख रक्कम चोरणाऱ्या सराईत गुन्हेगारास पनवेल शहर पोलिसांनी रेल्वे स्टेशन परिसरातून तो गुजरात येथे पळून जात असताना ताब्यात घेतले आहे.

गेल्या काही दिवसामध्ये पनवेल शहरातील लकी स्पोर्ट्स, सखी कलेक्शन, बिकानेर स्वीटस्, श्रीकृपा स्टेशनरी, बुक शॉप या ठिकाणी अज्ञात चोरट्याने चोरी करून दुकानातील फक्त रोख रक्कम चोरुन नेल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली होती. सदर चोरट्याला शोधण्याचे पनवेल शहर पोलिसांसमोर मोठे आव्हान होते.

याबाबत वपोनि नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि दत्तात्रेय देवकाते, पो.हवा.संदेश म्हात्रे, मिथुन भोसले, अमोल पाटील, पो.शि.साई मोकळ, काकडे आदींच्या पथकाने सदर गुन्हेगाराचा तांत्रिक तपास व गुप्त बातमीदाराद्वारे शोध घेत असताना सराईत गुन्हेगार जगदीश फराड (४५, रा.चिंध्रण) याची माहिती मिळाली. त्यानुसार पनवेल रेल्वे स्टेशन परिसरात सापळा रचून सदर आरोपीला ताब्यात घेतले असता त्याने या चोऱ्यांची कबुली दिली.

# पंख, डंख आणि खंक

उद्धव ठाकरे म्हणतायत हे खासदारांचे बंड नव्हे. पंख कापायचा उद्योग चालू आहे. ठाकरे गटाचे सहा खासदार अलिकडेच फुटले. हे खासदार लोकसभेचे सभापती ओम बिर्लांना भेटले किंवा त्यांनी स्वतंत्र गट स्थापन करण्याचे पत्र दिले असा एकही पुरावा अजून जाहीर झालेला नाही. असा गट फुटल्याची आवई माध्यमांमध्ये उठवण्यात आली. मग ठाकरे गटाने व्हिप जारी करून एक बैठक बोलावली. पण नऊपैकी सहा खासदार गैरहजर राहिले. व्हिपचीही पर्वा त्यांनी केली नाही. त्यामुळे त्यांना पार्टीतून काढून टाकण्याची प्रक्रिया ठाकरे गटालाच करावी लागते आहे. म्हणजे आपली पार्टी स्वतःच्या हाताने खंक करण्याचे काम ठाकरे, राऊत आणि मंडळींना करावे लागत आहे. पण बंड म्हणजे ठाकरे गटाला खंक करणे कमी आणि देवेंद्र फडणवीस यांचे पंख कापण्याचा कट जास्त असा प्रकार आहे असे उद्धव यांचे म्हणणे आहे. उद्धव ठाकरे सध्या महाराष्ट्राच्या दौऱ्यावर आहेत. बंड केलेल्या खासदारांच्या मतदारसंघात म्हणजे यवतमाळ, वाशीम, धाराशिव, परभणी, हिंगोली अशा ठिकाणी सभा घेत फिरत आहेत. त्यामुळे नेहमीप्रमाणे गद्दारांना शिव्या घालून झाल्या की, ते भाजपच्या अंतर्गत राजकारणावर बोलतात. त्यांचे म्हणणे असे की, फडणवीसांचे महत्व वाढावे असे दिल्लीतील भाजप नेत्यांना वाटत नाही. एकनाथ शिंदे यांचे एनडीएमधील स्थान व महत्व वाढेल अशा कारवायांना परवानगी दिली जाते. म्हणूनच ठाकरे गट फोडून खासदार शिंदे गटात घेतले गेले. त्यासाठी भाजपमधून रसद पुरवली गेली. मुळात याची परवानगी घेण्यासाठी शिंदे यांना दिल्लीच्या चकरा माराव्या लागल्या. आता शिंदे गटाचे खासदार एकदम तेरा झाले आहेत. मधल्या काळात तृणमूल काँग्रेसचे वीस खासदार फुटले. त्यांनी हसत हसत मोदींच्या एनडीएला पाठिंबा देऊ केला. सात खासदारवाल्या शिंद्यांची किंमत एकदम कमी झाली. मग हा ठाकरे गट फोडण्याचा जुनाच कट पुन्हा शिजवला गेला. उद्धव यांचे म्हणणे असे की, यामध्ये मोदी सरकारचे बहुमत दोनतृतियांश करण्याचा डाव आहेच. पण ते करताना महाराष्ट्रात फडणवीस वरचढ होऊ नयेत असा आणखी एक उपडाव आहे.

## चिरेबंदीच्या आत बंडाळी

फडणवीस आणि अमित शाह यांचे फार सख्य नाही हे उघड आहे. मोदींच्या नंतर भाजपचे नेतृत्व शहांकडे जाईल अशी शक्यता बंगालच्या निवडणुकीनंतर बळावली आहे. तसे झाले तर संघवाल्यांना सूत्रे हलवण्याचा वाव कमी राहील. शाह यांची पार्टीच्या संघटनेवर पकड आहे. निवडणुका ही संघटनाच जिंकून देते. पार्टीच्या संघटनेमुळे संघाच्या संघटनेची गरज कमी होते. शाह यांचे पिट्टू असलेले जेपी नड्डा म्हणाले होतेच की, आता आम्हाला निवडणुका जिंकण्यासाठी संघाची गरज नाही. संघाला फडणवीस, गडकरी असे लोक अधिक सोईचे आहेत. त्यासाठी फडणवीसांना दिल्लीत पाठवून तिथल्या सत्तास्पर्धेत उतरवले जाईल असे अनेकांना वाटते. काँग्रेसच्या काळात हे असले अंतर्गत संघर्ष, शह-काटशह यांची मिडियात खुली चर्चा होत असे. काँग्रेसवालेच एकमेकांविरुध्द अशा बातम्या पत्रकारांना पुरवत असत. बारा वर्षांच्या मोदी राजवटीचे एक वैशिष्ट्य मानायलाच हवे. भारतीय जनता पार्टीमध्ये कोणी जाहीर असंतोष वा बंडाळी केलेली नाही. या पार्टीत फाटाफूट झालेली नाही. मोदी व शाह यांची सत्तेवर इतकी जबर पकड आहे की, कालपर्यंत मंत्री म्हणून मिरवणारे प्रकाश जावडेकर आज कोणत्या कोपऱ्यात आहेत याची कोणीही चौकशी देखील करीत नाही. हीच स्थिती स्मृती इराणींची. मात्र अलिकडे या पार्टीत आतमध्ये खळबळ चालू असल्याच्या चर्चा वाढत आहेत. मोदी मंत्रिमंडळात लवकरच फेरबदल होणार अशा अफवा बरेच दिवस दिल्लीत आहेत. धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी कॉकरोच जनता पार्टीचे आंदोलन चालू आहे. त्यामुळे प्रधान यांचा राजीनामा न घेता त्यांना कदाचित वेगळे मंत्रिपद दिले जाईल. निर्मला सीतारामन यांचे अर्थमंत्रिपद काढून घेतले जाईल आणि ते खाते फडणवीसांना दिले जाईल अशीही एक अफवा आहे. फडणवीस सध्या राज्यात भाजपवर मांड ठेवून आहेतच. पण विरोधी पार्टीवाल्यांना तेच खेळवतात असे अनेकांना वाटते. शरद पवार राष्ट्रवादीने नांगी टांगली आहे. ठाकरे गट लढायला उत्सुक दिसतो, पण त्याची ताकद खच्ची केली जाते. काँग्रेसमध्ये गटतटाचे राजकारण संपण्याचे नाव नाही.

## डंख उलटेल

पण विरोधक तर सोडाच, फडणवीसांनी शिंदे यांनाही जेरबंद करून ठेवले आहे. त्यांच्या संजय शिरसाट, संदिपान भुमरे अशांची प्रकरणे बाहेर काढून आवाज बंद करून टाकले. खुद्द ठाण्यामध्ये एकनाथ शिंदे यांच्या महापालिका कारभारावर तिथला भाजप सतत टीका करीत असतो. परिणामी खुद्द शिंदे यांचा आवाजही मध्यंतरी ऐकू येईनासा झाला होता. मग शिंदे यांनी पुन्हा अमित शाह यांच्या दरबारात जाऊन हजेरी लावली. त्यांना जे काय द्यायचे असेल ते देऊ केले. मग शाह यांनी शिंदे यांना आपला गट वाढवण्यास परवानगी दिली. यामुळे दोन गोष्टी साध्य झाल्या. तूर्तास शिंदे गटाची ताकद वाढल्यासारखी दिसली. फडणवीसांना एक संदेश मिळाला. शिवाय २०२९ मध्ये तर आपण एकट्याच्या जिवावर लढणार हे खुद्द अमित शहा यांनी सांगितले आहेच. म्हणजे ठाकरे गटातून येणाऱ्या या खासदारांना तिकिटे देण्याची वा निवडून आणण्याची जबाबदारी भाजप किंवा अमित शाह यांच्यावर नसेल. उलट हे लोक पराभूत कसे होतील हेच पाहिले जाईल. त्यामुळे उद्धव ठाकरे म्हणत आहेत त्याप्रमाणे आता तात्पुरते फडणवीसांचे पंख कापले जात असले तरी अंतिमतः हा भाजपचा डंख आपल्याच मित्र पक्षाला म्हणजे शिंदे सेनेला नामोहरम करणारा आहे. फडणवीस म्हणाले की मी माणूस आहे. मला पंख नाहीत. माझ्यामागे जनतेचे आणि पक्षश्रेष्ठींचे बळ आहे. त्यामुळे मला चिंता करण्याचे कारण नाही. थोडक्यात जनता आणि संघाची ताकद आपल्यामागे आहे हे त्यांनी बजावले आहे. शिंदे यांच्या पंखात कितीही हवा भरण्याचा प्रयत्न अमित शाह यांच्यासारखे लोक करीत असले तरी त्याला आपण किंमत देत नाही असे फडणवीस यांना म्हणायचे आहे. या सर्व कापाकापीत आणि डंखमारीमध्ये महाराष्ट्राचे राजकारण अधिकाधिक खालच्या पातळीवर चालले आहे. भाजपला असे वाटते आहे की या राजकारणात आपण मात्र शुध्द आणि आपली ताकद कायम वाढतच जाणार आहे. तर तो त्याचा भ्रम आहे. भाजपच्या पंखांमध्ये आज जे बळ आहे त्यातले दोनतृतियांश काँग्रेस व इतर पार्ट्यांमधून आलेल्या फुटिरांचे आहे. दुसरे म्हणजे शिंदे गटाला चाप लावण्याचे फडणवीसांचे प्रयत्न यशस्वी झाले तरी निवडणुकीमध्ये भाजपची मते फोडण्याचे काम ते करू शकतात. त्यामुळे एकाचे पंख कापून ठाकरे गटाला खंक करण्याचे हे राजकारण अंतिमतः भाजपलाच डंख मारू शकेल हे ध्यानात ठेवायला हवे.

**। विचार**

# विनाशकारी युद्धातून तूर्त दिलासा

*इराण-अमेरिका संघर्ष आणि तहातून भारताने घेण्याजोगे महत्त्वाचे धडे आहेत. भारताचे इराणशी ऊर्जा, व्यापार आणि सांस्कृतिक संबंध आहेत; तर अमेरिकेशी धोरणात्मक भागीदारी आहे. त्यामुळे अशा संघर्षात भारताला अत्यंत संतुलित भूमिका घ्यावी लागते. जागतिक तेलाच्या किमतीतील चढ-उतारांचा थेट परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेवर होत असल्यामुळे शांतता प्रस्थापित होणे भारतासाठी महत्त्वाचे आहे.*



आरिफ शेख

जगाच्या राजकारणात काही घटना अशा असतात ज्या केवळ दोन देशांपुरत्या मर्यादित राहत नाहीत, तर संपूर्ण आंतरराष्ट्रीय व्यवस्थेवर परिणाम करतात. अमेरिका आणि इराण यांच्यात झालेला अलीकडील करार ही अशीच एक घटना आहे. अनेक आठवड्यांच्या संघर्षानंतर हजारो जीवितहानी, अब्जावधी डॉलर्सचे आर्थिक नुकसान आणि जागतिक अर्थव्यवस्थेबाबत निर्माण झालेल्या अनिश्चिततेच्या पार्श्वभूमीवर दोन्ही देशांनी वाटाघाटींचा मार्ग स्वीकारला. युद्धाच्या रणांगणावर गोळ्या झाडणारे हात अखेर चर्चेच्या टेबलवर एकमेकांसमोर बसले. हा करार नेमका कोणाचा विजय आणि कोणाचा पराभव आहे, यापेक्षा महत्त्वाचा प्रश्न असा आहे की आजच्या जगात कोणतेही युद्ध शेवटी तडजोडीवरच का येऊन थांबते? अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी ताजा करार स्वतःच्या मुत्सद्देगिरीचे यश म्हणून मांडण्याचा प्रयत्न केला. दुसरीकडे, इराणनेही हा करार अमेरिकेला झुकावे लागल्याचा पुरावा असल्याचे सांगितले. दोन्ही बाजू स्वतःला विजयी घोषित करत आहेत; परंतु आंतरराष्ट्रीय संबंधांचा इतिहास सांगतो, की अशा करारांमध्ये पूर्ण विजय किंवा पूर्ण पराभव क्वचितच होतो. बहुतांश वेळा दोन्ही बाजूंना काही मिळते आणि काही गमवावे लागते. या संघर्षाची सुरुवात झाली, तेव्हा अमेरिकेची भूमिका अत्यंत आक्रमक होती. इराणचा अणुकार्यक्रम पूर्णपणे थांबवणे, त्याच्या क्षेपणास्त्र क्षमतेवर निर्बंध आणणे, आर्थिक दबाव वाढवणे आणि गरज पडल्यास इराणमधील सत्ताबदल घडवून आणणे, अशी उद्दिष्टे अमेरिकेने मांडली होती; मात्र प्रत्यक्षात झालेल्या करारात यांपैकी अनेक बाबी पूर्णपणे साध्य झालेल्या दिसत नाहीत. त्यामुळे काही विश्लेषकांच्या मते अमेरिकेला अपेक्षेपेक्षा अधिक तडजोड करावी लागली.

हा निष्कर्ष काढताना दुसरी बाजूही लक्षात घ्यावी लागते. अमेरिकेच्या दृष्टीने सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे इराणने अण्वस्त्रनिर्मितीच्या दिशेने पुढे जाऊ नये. या करारामुळे अणुशस्त्रनिर्मितीवर काही प्रमाणात नियंत्रण ठेवणे शक्य झाले, तर अमेरिकेसाठी तो एक महत्त्वाचा धोरणात्मक लाभ ठरू शकतो. आंतरराष्ट्रीय राजकारणात प्रत्येक उद्दिष्ट शंभर टक्के साध्य करणे शक्य नसते, तर अनेकदा मोठा धोका रोखण्यासाठी काही बाबतीत माघार घ्यावी लागते. युद्धाचा सर्वात मोठा बळी म्हणजे सामान्य नागरिक. रणांगणावर सैनिक लढत असले, तरी त्याची किंमत सर्वसामान्य जनतेला मोजावी लागते. महागाई वाढते, रोजगार कमी होतात, इंधनाचे दर वाढतात आणि विकासाची गती मंदावते. अमेरिका आणि इराणमधील संघर्षामुळे जागतिक तेलबाजार अस्थिर झाला. होर्मुज सामुद्रधुनीतील तणावामुळे जगभरातील ऊर्जा सुरक्षेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले. अशा परिस्थितीत कोणत्याही जबाबदार देशाला अखंड युद्ध परवडू शकत नाही. युद्ध केवळ शस्त्रास्त्रांनी जिंकले जात नाही, तर ते अर्थव्यवस्थेवरही लढले जाते. अ

मेरिकेसारख्या महासत्तेलाही दीर्घकाळ चालणारे युद्ध आर्थिकदृष्ट्या महागडे ठरते. लष्करी कारवायांवर होणारा प्रचंड खर्च, शस्त्रसाठ्याची भरपाई, बाजारातील अनिश्चितता आणि देशांतर्गत राजकीय दबाव या सर्वांचा विचार करावा लागतो. त्याचप्रमाणे इराणलाही आर्थिक निर्बंध, उद्योगधंद्यांवरील परिणाम आणि जनतेतील असंतोष यांचा सामना करावा लागत होता. त्यामुळे दोन्ही बाजूंना अखेरीस वाटाघाटी हा अधिक व्यवहार्य पर्याय वाटला.

ताज्या करारातील काही अटी इराणसाठी निश्चितच दिलासादायक मानल्या जात आहेत. आर्थिक निर्बंधांमध्ये सवलत, तेल निर्यातीसाठी वाढलेली संधी आणि काही आर्थिक मालमत्तांबाबत सकारात्मक भूमिका घेतल्यामुळे इराणला आर्थिक श्वास घेण्याची संधी मिळू शकते; परंतु याचा अर्थ इराणने सर्वच लढाया जिंकल्या, असा होत नाही. कारण अणुकार्यक्रमावरील आंतरराष्ट्रीय निरीक्षण, भविष्यातील वाटाघाटी आणि जागतिक समुदायाचा दबाव कायम राहणार आहे. राजकीय नेतृत्वाची एक वैशिष्ट्यपूर्ण प्रवृत्ती म्हणजे प्रत्येक करार स्वतःचा विजय म्हणून सादर करणे. अमेरिकेत ट्रम्प यांना देशांतर्गत राजकारणाचा विचार करावा लागतो, तर इराणच्या नेतृत्वालाही आपल्या जनतेसमोर मजबूत प्रतिमा राखणे आवश्यक असते. त्यामुळे दोन्ही बाजूंच्या अधिकृत विधानांमध्ये स्वतःच्या यशाचा सूर असणे स्वाभाविक आहे; परंतु स्वतंत्र निरीक्षकांसाठी महत्त्वाचे म्हणजे प्रत्यक्ष करारातील अटी आणि त्यांचे दीर्घकालीन परिणाम. माध्यमांची भूमिकाही येथे तितकीच महत्त्वाची ठरते. काही माध्यमांनी या कराराला 'ट्रम्प यांची शरणागती' म्हटले, तर काहींनी 'इराणला मोठा धक्का' असे वर्णन केले. प्रत्यक्षात अशा टोकाच्या मांडण्या वाचकांचे लक्ष वेधून घेतात; परंतु वास्तव अधिक गुंतागुंतीचे असते. या करारामुळे सर्व समस्या संपल्या आहेत, असे मानणे चुकीचे ठरेल. अनेक महत्त्वाचे प्रश्न अजूनही अनुत्तरित आहेत. अणुकार्यक्रमावरील अंतिम चौकट काय असेल? क्षेपणास्त्र कार्यक्रमाबाबत पुढे काय भूमिका घेतली जाईल? निर्बंध पूर्णपणे हटवले जातील का? भविष्यात पुन्हा तणाव वाढणार नाही, याची खात्री कोण देणार? या सर्व प्रश्नांची उत्तरे पुढील वाटाघाटींमध्येच मिळतील.

इतिहासाचा धडा स्पष्ट आहे. व्हिएतनाम, अफगाणिस्तान, इराक किंवा इतर अनेक संघर्ष पाहिले, तर अखेरीस युद्धाचा शेवट चर्चेनेच झाला. रणांगणावर मिळालेला विजय टिकवण्यासाठीही राजकीय तोडगा आवश्यक असतो. त्यामुळे युद्ध हा समस्येचा अंतिम उपाय नसून अनेकदा संवादाची सुरुवात असतो. म्हणूनच अमेरिका-इराण कराराकडे विजय-पराभवाच्या चष्म्यातून पाहण्याऐवजी आंतरराष्ट्रीय राजकारणातील वास्तववादी तडजोड म्हणून पाहणे अधिक योग्य ठरेल. महासत्तांनाही मर्यादा असतात, प्रादेशिक शक्तींनाही तडजोड करावी लागते आणि शेवटी सर्वांनाच आर्थिक, राजकीय आणि मानवी वास्तवाचा विचार करावा लागतो. या संपूर्ण घडामोडीतून एकच संदेश अधोरेखित होतो, तो म्हणजे युद्धाची भाषा कितीही आक्रमक असली, तरी शांततेचा मार्ग नेहमीच संवादातून जातो. शस्त्रांनी सीमारेषा जिंकता येतात; पण विश्वास जिंकण्यासाठी चर्चा, संयम आणि मुत्सद्देगिरी यांनाच पर्याय नसतो. त्यामुळे या कराराचे खरे महत्त्व कोण जिंकले किंवा कोण हरले यात नाही, तर जग आणखी एका दीर्घ आणि विनाशकारी युद्धापासून काही काळासाठी तरी वाचले, यात आहे. हेच या कराराचे सर्वात मोठे यश मानले पाहिजे. विशेषतः होर्मुज सामुद्रधुनीतून जगातील मोठा तेलपुरवठा या मार्गाने होतो. त्यामुळे या मार्गावरील कोणताही तणाव म्हणजे जागतिक तेलबाजारात अस्थिरता. अमेरिकेकडे लष्करी ताकद असली, तरी जगाच्या ऊर्जा सुरक्षेशी खेळण्याचा धोका ती अनंतकाळ पत्करू शकत नव्हती. परिणामी, युद्ध जितके लांबले तितका अमेरिकेवर आर्थिक आणि राजकीय दबाव वाढत गेला.

या संघर्षाचा सर्वात मोठा तोटा सामान्य नागरिकांनी सहन केला. इराणमध्ये पायाभूत सुविधा उद्ध्वस्त झाल्या. अमेरिकेने अब्जावधी डॉलरचा लष्करी खर्च केला. जागतिक तेलाच्या किमतीत चढ-उतार झाले, शेअर बाजार हादरले आणि महागाईची भीती पुन्हा डोके वर काढू लागली. युद्धे नेहमी रणांगणावर जिंकली जात नाहीत. ती अर्थव्यवस्थेत हरलीही जातात. हीच वस्तुस्थिती अमेरिकेलाही मान्य करावी लागली. या करारातून इराणला काय मिळाले? सर्वप्रथम, त्याने आपले राजकीय अस्तित्व टिकवले. अमेरिकेने उघडपणे मांडलेला सत्ताबदलाचा अजेंडा अपयशी ठरला. दुसरे म्हणजे, आर्थिक निर्बंधांमध्ये सवलतीची शक्यता निर्माण झाली. तिसरे म्हणजे, तेल निर्यात आणि आर्थिक व्यवहार पुन्हा सुरू होण्याचा मार्ग खुला झाला. चौथे म्हणजे, इराणला भविष्यातील वाटाघाटींसाठी वेळ मिळाला. म्हणजेच, युद्धातून बाहेर पडतानाही इराणने स्वतःची सामरिक ताकद जपली; मात्र इराणने सर्व काही जिंकले, असे म्हणणेही योग्य ठरणार नाही. त्या देशाची अर्थव्यवस्था अजूनही दबावाखाली आहे. अणुकार्यक्रमावर जागतिक लक्ष कायम राहणार आहे. भविष्यातील करारांमध्ये त्याला अनेक कठीण निर्णय घ्यावे लागू शकतात. त्यामुळे हा करार इराणसाठी दिलासादायक असला, तरी त्या देशा अंतिम विजय नाही.

**। चर्चा आजची**

# सर्वसामान्यांची लूट थांबवा




प्रमोद जाधव

एसटी महामंडळाने प्रवाशांसाठी एनसीएमसी (नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड) स्मार्ट कार्ड योजना सुरु केली आहे. हे कार्ड मिळविण्यासाठी महिलांसह ज्येष्ठ नागरिकांची लगबग सुरू झाली आहे. मात्र स्मार्ट कार्ड मिळविताना प्रवाशांची आर्थिक लुट होत असल्याचा प्रकार समोर आला आहे. शंभर रुपये रिचार्जमधून पाच रुपयांची लुट जीएसटीद्वारे होत असताना काही एजन्सींकडून रिचार्जच्या नावाने वीस ते ५० रुपये अधिक बळकावले जात असल्याचे बोलले जात आहे. या योजनेच्या माध्यमातून सर्वसामान्य प्रवासी विशेष करून महिलांची आर्थिक लुट होत असल्याचा प्रकार समोर येत आहे. सर्वसामान्यांची ही लुट थांबवा अशी मागणी होत आहे.

एसटी महामंडळाने कागदी ओळखपत्राऐवजी स्मार्ट कार्ड देण्याचा प्रयत्न केला. २०१६मध्ये ही योजना सुरु केली होती. ५० रुपयांमध्ये हे कार्ड मिळत होते. हे कार्ड हाताळणेदेखील सोपे झाले होते.त्यामुळे हजारो प्रवाशांसह विद्यार्थ्यांनी या कार्डची नोंदणी केली होती. परंतु सात वर्षातच ही योजना बंद पडली. परवडत नसल्याचे सांगून कंपनीने कार्ड देण्याचे काम बंद केले. त्यामुळे या जुन्या योजनेचे हजारो कार्ड एसटी बस स्थानकात आजही पडून आहेत. एसटी महामंडळाने कागदी ओळखपत्राच्या जागी २०१६ मध्ये सुरु केलेली स्मार्ट कार्ड योजना सात वर्षात बंद पडली. आता त्या जागी एनसीएमसी अर्थात (नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड) स्मार्ट कार्ड योजना सुरु केली आहे. प्रवासातील पारदर्शकता आणणे, डिजीटल व्यवहारांना चालना देणे, एसटीचा प्रवास कॅशलेस बनविण्यासाठी एसटी महामंडळाने पुन्हा स्मार्ट कार्ड योजना सुरु केली आहे. एसटी महामंडळाने या योजनेच्या माध्यमातून हायटेक होण्याचा प्रयत्न केला आहे.

रायगड जिल्ह्यामध्ये एप्रिल महिन्याच्या पहिल्या आठवड्यात या योजनेची अंमलबजावणी करण्यात आली. खासगी एजन्सीकडे हे काम देण्यात आले. जिल्ह्यात अलिबाग, पेण, कर्जत, उरण, पनवेल, महाड, श्रीवर्धन, मुरूड, रोहा, माणगाव मध्ये साधारणतः ३० हून अधिक एजन्सींकडे हे काम सुरु आहे. रायगड विभागाच्या अखत्यारित २४ ठिकाणी एजन्सी आहेत. त्यामध्ये आठ आगारातील ११ स्थानकात या एजन्सी कार्यरत आहेत. काही एजन्सीमध्ये सकाळी आठ ते अकरा तर काही एजन्सीमध्ये सकाळी नऊ ते सायंकाळी सहा या वेळेत या एजन्सींचे काम चालते.

एसटी महामंडळाकडून मिळणाऱ्या एनसीएमसी कार्डचा लाभ घेण्यासाठी महिला प्रवाशांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे. स्थानकांसह अन्य खासगी एजन्सीमध्ये नोंदणीसह कार्ड मिळविण्यासाठी गर्दी होत आहे. जिल्ह्यात आता पर्यंत ४० हजार महिलांनी या कार्डसाठी नोंदणी केली असून सुमारे २० हजार लाभार्थ्यांना कार्ड देण्यात आले असल्याची माहिती प्राप्त झाली आहे. मात्र हे कार्ड नोंदवण्यापासून मिळेपर्यंत प्रचंड त्रास होत असल्याच्या तक्रारी वाढत आहेत. हे कार्ड मिळविण्यासाठी १९९ रुपये आहेत. मात्र दोनशे रुपये, त्यानंतर कार्ड प्राप्त झाल्यावर शंभर रुपये रिचार्ज करण्यासाठी १२० ते १५० रुपये घेतले जात आहे. त्यात शंभर रुपयांमधून जीएसटीचे पाच रुपयेदेखील वजा केले जात आहेत. एक रुपयांपासून पाच रुपये त्यानंतर वीस ते ५० रुपये घेऊन लाखो लुट प्रवाशांकडून होत असल्याचे चित्र समोर येत आहे. त्यामुळे हा प्रकाराला अळा बसविण्यासाठी एसटी महामंडळाचे विभाग नियंत्रक सुनील चौरे यांनी लक्ष द्यावे अशी मागणी केली जात आहे.

एसटीचा प्रवास स्मार्ट होण्यासाठी एसटी महामंडळाने प्रयत्न केले आहेत. मात्र हे स्मार्ट कार्ड मिळविण्यासाठी स्मार्ट काम नसल्याचे दिसून येत आहे. तासनतास नोंदणीसाठी उभे राहवे लागत आहे. लाभार्थ्यांना बसण्यासाठी योग्य जागा नाही. त्यामुळे अनेक लाभार्थ्यांना ताटकळत उभे राहवे लागत आहे. तसेच ज्या एजन्सीकडे काम दिले आहे. त्या एजन्सीच्या कर्मचारी डेबलावर पाय देऊन काम करीत असल्याचे प्रकार घडत आहे. एसटी महामंडळाकडून स्मार्ट कार्ड देताना कामकाज ही स्मार्ट करण्यावर भर देणे गरजेचे आहे, अशी प्रतिक्रिया जनमानसातून उमटत आहे.

**लोकसंसद**

## रेल्वे प्रवासातील असुरक्षितता

रेल्वे लोकल सेवा प्रवाशांची धमणी म्हणून ओळखली जाते. दररोज तिन्ही मार्गावर सुमारे सत्तर लाखांहून अधिक प्रवासी प्रवास करतात. यांच्या सुरक्षेचे काय? रेल्वे प्रशासनाने मुंबईतील बॉम्बस्फोट, दहशतवादी कारवाया या निमित्ताने प्रत्येक रेल्वे स्थानकात मेटल डिटेक्टर, सुरक्षा रक्षक तैनात करण्यात आले होते. बॅग तपासणी यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली होती. त्यानंतर मात्र आवजाव घर तुम्हारा एवढी ढिसाळ सुरक्षा यंत्रणा कार्यान्वित झाली. रेल्वे प्रवासात धावपळ ठरलेली असते. कार्यालयात वेळेवर पोहचणे हे एकच धैय्य डोळ्यासमोर असते. त्यात लोकल उशिराने सुटली किंवा रद्द झाली तर कुत्रा हाल खात नाही. लोकल प्रवासातील गटबाजी इतर प्रवाशांच्या जीवावर बेतते. डब्यांत गर्दी तर असतेच त्यात गटबाजीला नवीन प्रवाशांना सामोरे जावे लागते. रेल्वे प्रवास दिवसेंदिवस जीव घेणा ठरत आहे. रेल्वे प्रवासात दरवाजा बंद करण्यावरून झालेल्या वादातून तरुणाचा खून झाला.याला जबाबदार कोण? रेल्वे प्रशासनाने याचे उत्तर देणे आवश्यक आहे. रेल्वेच्या हद्दीत प्रवाशाकडे शस्त्र आले कसे? सक्षम सुरक्षा यंत्रणा कार्यान्वित आहे तर तपासणीत शस्त्र कसे सापडले नाही. असे एक ना अनेक प्रश्न उपस्थित होतात. रेल्वे प्रवासात जेष्ठ महिला, पुरुष, आजारी रुग्ण, लहान मुले, मालाची ने-आण करणारे व्यापारी असतात यांच्या भवितव्याची चिंता कोणाला? त्यांच्या कुटुंबियांनी कोणावर विश्वास ठेवायचा नशीबावर की रेल्वे यंत्रणेवर?

**– महादेव गोळवसकर, मुंबई**

**। दिनविशेष**

# अंतराळातील रहस्याचा दिवस! जागतिक लघुग्रह दिन

आकाशगंगेत सूर्याच्या सर्व बाजूंनी फिरणाऱ्या खडकाच्या गोल गोळ्यांना लघुग्रह म्हणतात. अजूनही अंतराळात अनेक लघुग्रह आहेत ज्यांचा पृथ्वीशी टक्कर होण्याची शक्यता आहे. त्यामुळेच जागतिक लघुग्रह दिन दरवर्षी ३० जून रोजी साजरा केला जातो. या दिवसाचे उद्दिष्ट म्हणजे लघुग्रह पृथ्वीला धडकेल तर होणारी आपत्ती आणि त्यापासून बचाव कसा करायचा याबाबत जागरूकता निर्माण करणे.

सूर्यमालेच्या निर्मितीच्या वेळी निर्माण झालेले हे लघुग्रह अवकाशात विहार करत असतात. एखादा मोठा लघुग्रह पृथ्वीला धडकला तर मोठी आपत्ती ओढवू शकतो. पण हेच लघुग्रह आपल्या सूर्यमालेच्या इतर ग्रह आणि त्यांच्या निर्मितीबद्दल खूप काही माहिती देऊ शकतात. या दिवसाचा उगम तुंगुस्का घटनेच्या स्मरणार्थ झाला. ३० जून १९०८ रोजी सायबेरियातील तुंगुस्का नदी परिसरात एक महाकाय स्फोट झाला. अनेक शास्त्रज्ञांच्या मते, हा स्फोट एका लघुग्रहामुळे झाला होता. त्याने सुमारे २,१५० चौरस किमी क्षेत्रातील वनस्पती नष्ट केल्या. हा स्फोट हिरोशिमा अणुबॉम्बच्या १०० पट जास्त शक्तिशाली होता, अशी नोंद आहे. या घटनेच्या स्मरणार्थ आणि भविष्यात अशा धोक्यांपासून पृथ्वीचे संरक्षण करण्यासाठी संयुक्त राष्ट्रांच्या महासभेने डिसेंबर २०१६ मध्ये ३० जून हा ङआंतरराष्ट्रीय लघुग्रह दिनफ म्हणून जाहीर केला. जगभरात अनेक देशांमध्ये शालेय स्पर्धा, विज्ञान प्रबोधन कार्यक्रम, डॉक्युमेंटरी फिल्म्स, चर्चासत्रे, आणि खगोलशास्त्रावर आधारित कार्यशाळा घेण्यात येतात. या उपक्रमांमधून नागरिकांना लघुग्रह म्हणजे काय, त्यांचे धोके, आणि त्यावर उपाययोजना यांची माहिती दिली जाते. लघुग्रह दिनाचा अजून एक उद्देश म्हणजे भविष्यात या लघुग्रहांमधील खनिज संपत्तीचा वापर कसा करता येईल, यावर संशोधनास चालना देणे. अनेक शास्त्रज्ञांचा विश्वास आहे की, लघुग्रहांमध्ये मौल्यवान धातू, पाणी आणि इंधनाचे स्रोत सापडू शकतात.

३० जून १९०८ रोजी, सायबेरियातील तुंगुस्का नदीजवळच्या एका दुर्गम जंगलाच्या आकाशात एक प्रचंड स्फोट झाला. सुमारे ५० ते १०० मीटर रुंदीच्या एका महाकाय आगीच्या गोळ्याने सुमारे २,००० चौरस किलोमीटरचे जंगल उद्ध्वस्त केले आणि जवळपास ८ कोटी झाडे जमीनदोस्त केली. हा स्फोट इतका शक्तिशाली होता की ६० किलोमीटर दूर राहणारे लोकही जमिनीवर कोसळले.

आजही या स्फोटाचे नेमके कारण एक गूढच आहे. काही शास्त्रज्ञांच्या मते तो उल्का किंवा धूमकेतूमुळे झाला असावा, तर काहींच्या मते तो एखाद्या शक्तिशाली खगोलीय घटनेचा परिणाम असू शकतो. अनेकांना असेही वाटते की तो एक लघुग्रह असू शकतो.

कारण काहीही असो, या स्फोटातून बाहेर पडलेली ऊर्जा हिरोशिमावर टाकलेल्या अणुबॉम्बपेक्षा सुमारे १८५ पट अधिक शक्तिशाली होती.

अशा धोक्यांबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी, संयुक्त राष्ट्र दरवर्षी ३० जून हा मआंतरराष्ट्रीय लघुग्रह दिनफ म्हणून साजरा करते. गेल्या दशकात, काही लघुग्रह पृथ्वीच्या अगदी जवळ, फक्त काही लाख किलोमीटर अंतरावर आले होते. आंतरराष्ट्रीय लघुग्रह दिनाचा मुख्य उद्देश लघुग्रहाचा आघात किती धोकादायक असू शकतो, याबद्दल लोकांमध्ये जागरूकता निर्माण करणे हा आहे. बऱ्याच लोकांना लघुग्रहांबद्दल किंवा त्यांच्यामुळे निर्माण होणाऱ्या धोक्यांबद्दल फारशी माहिती नसल्यामुळे, विविध कार्यक्रम, मोहिमा आणि इतर उपक्रमांच्या माध्यमातून त्यांना शिक्षित करण्यासाठी या दिवसाचा उपयोग केला जातो.

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

३० जून
१) श्री. मिलन अनंत दिघे
कुरूळ, अलिबाग, ३०-६-१९५७

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.
**संपर्क-** ८०५५३२५६७८
**(बीपीन राठवा)**
९२२६०५५१५५
**(अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**

**अर्चना सचिन देशमुख**
**पिंपळभाट अलिबाग**

# मुठ्यांची खवय्यांसाठी पर्वणी

**● पावसाच्या सुरुवातीला पहिली पसंती ● स्थानिक आदिवासी बांधवांना हक्काचा रोजगार**

**। पाली । प्रतिनिधी ।**

जिल्ह्यात पावसाला काही दिवसांपूर्वीच दमदार सुरुवात झाली आहे. त्यामुळे पावसाच्या सुरुवातीला फक्त रायगडसह कोकणात मिळणाऱ्या 'मूठ्यांचे' (खेकड्याची एक वैशिष्ट्यपूर्ण जात) आगमन झाले आहे. निसर्गाचा हा रानमेवा खवय्यांसाठी पर्वणी ठरत आहे. आरोग्यवर्धक, चविष्ट व लज्जतदार मूठ्यांना खाण्यासाठी खवय्ये आतुर झाले असून, गावागावांत रात्रीच्या वेळी मुठे पकडण्याची अनोखी लगबग व मज्जा पाहायला मिळत आहे.



पहिल्या पावसाच्या सरींमुळे माळरान, शेत आणि डोंगरउतारावरील जमीन ओली झाली असून कोवळे गवत डोलू लागले आहे. याच कोवळ्या गवतावर गुजरान करणारे मूठे रात्रीच्या वेळी रिमझिम पावस-ात बिळातून बाहेर पडतात. हातात बॅटरी, गॅसबत्ती किंवा जळता टायर घेऊन आणि सोबत प्लास्टिकची बादली किंवा गोणपाट घेऊन ग्रामीण भागातील लोक रात्रीचे मुठे पकडण्यासाठी बाहेर पडतात. प्रकाशझोतात जागच्या जागी थांबणाऱ्या या मूठ्यांना दबक्या पावलांनी जाऊन पकडणे हा एक रंजक अनुभव असतो.

इतर खेकड्यांपेक्षा आकाराने लहान असलेल्या मूठ्यांचा रंग तजेलेदार काळा-पिवळा असतो. यांचा पाठीचा भाग गोलाकार आणि चकाकणारा असून, पाय पांढरे-पिवळे असतात. एक नांगडा मोठा तर एक लहान, अशी यांची वैशिष्ट्यपूर्ण ठेवण असते. मूठ्यांचे मांस अत्यंत चविष्ट व आरोग्यवर्धक मानले जाते. याचे कवच काढून त्यात मूग, तांदूळ किंवा चण्याच्या पिठाचे मिश्रण भरले जाते व पुन्हा धाग्याने बांधून रस्सा (कालवण) केला जातो. ही पारंपरिक पद्धत खवय्यांमध्ये प्रचंड लोकप्रिय आहे. मूठे विकून स्थानिक आदिवासी बांधवांना दोन पैसे मिळतात. अनेक जण मुंबई-पुण्यातील नातेवाईकांना ही हक्काची भेट म्हणून पाठवतात. तर काही जण मुंबई पुण्यावरून खास मुठे पकडण्यासाठी गावी येतात.

### धोक्याची घंटा

वाढते प्रदूषण, शहरीकरण आणि सिमेंटची बांधकामे यामुळे मूठ्यांचा नैसर्गिक अधिवास नष्ट होत आहे. पावसाच्या अनियमिततेमुळेही आता त्यांची संख्या दिवसेंदिवस घटत चालली आहे, ही चिंतेची बाब आहे. मात्र गाव खेड्यामध्ये अजूनही मोठ्या प्रमाणावर मुठे सापडतात.

## उतेखोल केंद्रात विद्यार्थ्यांना वह्या वाटप

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ नुकतेच सुरु झाले असून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी समाजातील विविध संस्था, संघटना शैक्षणिक साहित्यांचे मोफत वाटप करीत आहेत. या सेवाभावी संस्थांपैकीच एक ओळखली जाणारी माणगाव तालुक्यातील गांगवली-खरबाचीवाडी ही एक नामांकित संस्था आहे. त्यांनी बेटर सोसायटी फाऊंडेशनमार्फत माणगाव नगरपंचायत हद्दीतील उतेखोल केंद्रातील उतेखोल, उतेखोल आदिवासीवाडी, चव्हाणवाडी, खर्डी बुद्रुक आदिवासीवाडी, या चार शाळांतील सर्व विद्यार्थ्यांना मोफत वह्या वाटपाचा कार्यक्रम सोमवारी (दि.२९) जून रोजी घेतला होता.



माणगाव पंचायत समितीचे सभापती विलास शिंदे, उतेखोल केंद्राचे केंद्रप्रमुख शंकर शिंदे, बेटर सोसायटी फाऊंडेशनच्या संस्थापिका अध्यक्षा मंजुषा गोटकर, फाऊंडेशनचे कार्याध्यक्ष अनिल वनगुले यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले.

या कार्यक्रमास उतेखोल आदिवासीवाडी शाळेच्या मुख्याध्यापिका पूजा उभारे, उप मुख्याध्यापक अजित शिंदे, चव्हाणवाडी शाळेच्या मुख्याध्यापिका शशिकला वेव्हल, सहशिक्षिका संध्या जायभाय, खर्डी बुद्रुक आदिवासीवाडी शाळेचे मुख्याध्यापक रमेश उभारे, उतेखोल शाळेचे मुख्याध्यापिका सायली अंबुर्ले, सहशिक्षिका अस्मिता खडतर, उतेखोल आदिवासी शाळेचे शिक्षण तज्ञ् अनिता जाधव आदींसह उतेखोल केंद्रातील शिक्षक, शिक्षिका व विद्यार्थी उपस्थित होते. अत्यंत उत्साहात व आनंदाची वातावरणात हा कार्यक्रम संपन्न झाला.

## सुतारवाडीत पल्स पोलिओ लसीकरण

**। सुतारवाडी । प्रतिनिधी ।**

राष्ट्रीय अभियान अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र आंबेवाडी यांच्या वतीने सुतारवाडी येथील दत्त मंदिरामध्ये लहान बालकांना पल्स पोलिओ लसीकरण करण्यात आले. यावेळी पंचक्रोशीतील बालकांना पल्स पोलिओ लस देण्यात आली. तेजस्वी दळवी, गीता सावंत यांनी लहान बालकांना पोलिओ डोस दिला. प्राथमिक आरोग्य केंद्र आंबेवाडीच्या आरोग्य विभागाने पंचक्रोशीतील बालकांना पोलिओचा डोस घेण्याचे आवाहन केले. ग्रामीण तसेच शहरे भागातील सर्व नागरिकांनी आरोग्य विभागाला सहकार्य करावे असे हे आवाहन करण्यात आले.



## नागोठण्यात पल्स पोलिओला प्रतिसाद

**। नागोठणे । प्रतिनिधी ।**

नागोठणे प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत असलेल्या सहा उपकेंद्रातील एकूण ६१ बुथवर ० ते ५ वयोगटातील अपेक्षित ३ हजार २७८ लाभार्थ्यांपैकी सुमारे ३ हजार १०४ बालकांना पल्स पोलिओचा डोस देण्यात आल्याने उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. नागोठणे प्राथमिक आरोग्य केंद्रातील बुथवर आरोग्य अधिकारी डॉ. अस्मिता नाईक यांच्या हस्ते बालकांना पोलिओचा डोस देवून या मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला. याशिवाय नागोठणे एस.टी. स्थानक, नागोठणे रेल्वे स्थानक, नागोठणे प्राथमिक आरोग्य केंद्र अंतर्गत सर्व ५८ गावे व ४५ आदिवासी वाड्यांमधील प्राथमिक शाळा, अंगणवाडी तसेच शहरातील विविध भागांत पल्स पोलिओ लसीकरणासाठी बुथ उभारण्यात आले होते. पल्स पोलिओ मोहिमेत वैद्यकीय अधिकारी डॉ. अस्मिता नाईक, फुलावंती पवार, भारत मारकड, राजेंद्र पवार, सर्व आरोग्य सेविका, आरोग्य सेविका व गट प्रवर्तक, आंगणवाडी सेविका, मदतनीस यांच्यासह एकूण १२९ कर्मचारी सहभागी झाले होते.

## इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडिटचे निर्देश

**। रोहा । प्रतिनिधी ।**

अलीकडे महाड, मुंबई आदी ठिकाणी इमारती जमीनदोस्त होण्याच्या दुर्देवी घटना घडल्या आहेत. या घटनेत अनेक जणांना आपले प्राण गमवावे लागले होते. आपल्या भागात पाऊस खूप मोठ्या प्रमाणात पडत असल्याने खबरदारीचा उपाय म्हणून ३० किंवा त्यापेक्षा अधिक वर्ष जुनी असणारी सदनिका किंवा सोसायटिंच्या इमारतींचा अभियंतामार्फत स्ट्रक्चरल ऑडिट करून सदर अहवाल नगर पालिका कार्यालयात १५ जुलै पर्यंत सादर करावे असे आदेश नगराध्यक्षा वनश्री शेडगे यांनी दिले. तसेच १ जुलै पासून रोहे अष्टमी विभागात ओला कचरा आणि सुका कचरा वर्गीकरण नियम लागू करण्यात येणार आहे.

न. पा.च्यावतीने डॉ. सी. डी. देशमुख शहर सभागृहात चित्रफितद्वारे पर्यावरण संरक्षण, स्वच्छता, नागरिकांची सुरक्षितता, जल संवर्धन तसेच हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर उद्भवणाऱ्या संभाव्य आव्हानांना सामोरे जाणण्यासाठी आवश्यक उपाय योजनांचे नियोजन व जनजागृती करण्याच्या उद्देशाने सर्व सहकारी गृह निर्माण संस्था, हौसिंग सोसायटी, अपार्टमेंट व इमारत व्यवस्थापन समित्यांना माहिती देण्यात आली. या नियोजित संयुक्त बैठकित नगराध्यक्षा शेडगे, अहमद दर्जी, मुख्याधिकारी अजय कुमार एडके, सुखद राणे, महेंद्र गुजर, राजेंद्र जैन, मयुर दिवेकर, रविंद्र चाळके, महेश कोलटकर, नीता हजारे, गौरी बारटक्के, अजित मोरे, अरबाज मनेर, रोशन चाफेकर, पूर्वा मोहिते, प्रियंका धनावडे, स्नेह आंब्रे, सुप्रिया जाधव व शहरातील असंख्य सोसायटीचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

## गडब येथे महिलांचा सन्मान

**। गडब । वार्ताहर ।**

पेण तालुक्यातील गडब-काराव ग्रामपंचायतीमधे एकल महिला दिन साजरा करण्यात आला, याप्रसंगी सावित्रीबाई फुले आणि महात्मा ज्योतिबा फुले यांचे प्रतिमा पूजन करण्यात आले.तसेच वरिष्ठ एकल महिलांचा सत्कार करण्यात आला. तसेच त्यांच्या समस्या जाणून त्यावर तोडगा काढण्यात आला. त्यांचे प्रश्नमार्गी लावण्यात आले. काराव सरपंच मानसी पाटील यांनी जाहीर केली. या योजनेत ग्रुप ग्रामपंचायत काराव हद्दीतील समस्त निराधार महिलांना दरवर्षी पाच हजार रुपये देण्यात येतील असे जाहीर करण्यात आले. या कार्यक्रमाला सरपंच मानसी पाटील, संध्या म्हात्रे, दिनेश म्हात्रे आदीसह अंगणवाडी सेविका, महिला उपस्थित होत्या.

## छ. राजर्षी शाहू महाराज जयंती उत्साहात

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाच्या द. ग. तटकरे महाविद्यालय, माणगाव येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांची जयंती (दि.२७) जून रोजी समाजप्रबोधनाच्या वातावरणात साजरी करण्यात आली. सामाजिक न्याय, समता, शिक्षण आणि मानवतेचा संदेश देणाऱ्या राजर्षी शाहू महाराजांच्या विचारांना अभिवादन करत विद्यार्थ्यांना त्यांच्या कार्याचा प्रेरणादायी वारसा समजावून सांगण्यात आला.

या कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी डॉ. राजेंद्र आचार्य व प्रा. नेहा गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. यावेळी डॉ. संगीता उतेकर, प्रा. मंजिरी सावंत, प्रा. शाश्वती महाडिक, प्रा. सुष्मिता म्हामुणकर, प्रा. श्वेता सकपाळ, प्रा. प्रगती गोरेगावकर तसेच राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे स्वयंसेवक आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या कार्यक्रम अधिकारी प्रा. नेहा तुराई यांनी केले, तर प्रा. शाश्वती महाडिक यांनी उपस्थितांचे आभार मानले. समता, शिक्षण आणि सामाजिक न्यायाचा अखंड दीप प्रज्वलित करणारे छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांचे विचार आजही समाजाला प्रेरणा देणारे आहेत. त्यांच्या जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांनी त्यांच्या कार्याचा आदर्श घेऊन सामाजिक बांधिलकी जपत शिक्षणाच्या माध्यमातून राष्ट्रनिर्मितीत योगदान द्यावे, असा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला.

## राज्यस्तरीय कृषी पुरस्काराचे आयोजन

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

हरित क्रांतीचे प्रणेते आणि महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री स्व. वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त साजऱ्या होणाऱ्या कृषी दिनाचे औचित्य साधून महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागामार्फत दिनांक १ जुलै २०२६ रोजी डोम, सरदार वल्लभभाई पटेल स्टेडियम, वरळी, मुंबई-१८ येथे राज्यस्तरीय कृषी पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

सोहळ्यात सन २०२३ व २०२४ या वर्षांतील राज्यस्तरीय कृषी पुरस्कारांचे राज्यपाल जिष्णू देव वर्मा व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते वितरण करण्यात येणार असून कृषी, कृषी संलग्न क्षेत्र, फलोत्पादन, सेंद्रिय शेती, कृषी विस्तार व कृषी विकास क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या एकूण १८९ शेतकरी, संस्था व कृषी अधिकारी-कर्मचाऱ्यांचा गौरव करण्यात येणार असल्याची माहिती कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली आहे.

या पुरस्कार सोहळ्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, राधाकृष्ण विखे पाटील, भरत गोगावले, ॲड.आशिष जयस्वाल, इंद्रनील नाईक आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

## वाजेकर महाविद्यालयात प्रमाणपत्र वितरण

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

रयत शिक्षण संस्थेच्या, वीर वाजेकर कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, फुंडे आणि प्रथम फाऊंडेशनच्या संयुक्त विद्यमाने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये आयोजित करण्यात आलेल्या मल्टी फंक्शनल ऑफिस आणि नर्सिंग कोर्स यशस्वीपणे पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र वितरण समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आमोद ठक्कर होते. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना मल्टी फंक्शनल ऑफिस आणि जनरल अटेंडंट-नर्सिंग कोर्सचे आजच्या रोजगाराभिमुख शिक्षणामधील महत्त्व अधोरेखित केले. आरोग्य सेवा क्षेत्रात तसेच कार्यालयीन व्यवस्थापनाशी संबंधित विविध संधी उपलब्ध करून देणारा हे कोर्स विद्यार्थ्यांच्या कौशल्यविकासासाठी उपयुक्त ठरत असल्याचे त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांनी मिळालेल्या ज्ञानाचा व कौशल्यांचा उपयोग करून स्वतःच्या करिअरच्या संधी अधिक व्यापक कराव्यात, असे आवाहनही त्यांनी केले.



सदर कोर्सच्या प्रत्येकी दोन बॅच यशस्वी अंमलबजावणी आणि पूर्ततेसाठी पूजा ठाकूर, पुष्पा गायकवाड व जयवंती गोंधळी यांनी विशेष परिश्रम घेतले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी प्रशिक्षण पूर्ण करून आवश्यक कौशल्ये आत्मसात केली. यावेळी महाविद्यालयाचे प्राध्यापक प्रा. राम गोसावी व प्रा. देवेंद्र कांबळे उपस्थित होते. कार्यक्रमात कोर्स पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. प्रमाणपत्र स्वीकारताना विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन डॉ. सी. डी. धिंदळे यांनी केले.

**शेतकऱ्यांचे सक्षमीकरणाठी स्पर्धेचे आयोजन | कृषी तज्ज्ञांकडून मोफत मार्गदर्शन**

# पोलादपूर शेतकरी फार्मर कपसाठी सज्ज

**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

पोलादपूर तालुक्यातील ६७ शेतकऱ्यांचे गट सद्यस्थितीत फार्मर कप २०२६-२७ स्पर्धेसाठी सज्ज झाले आहेत. याखेरीज, ११ शेतकरी गटांनी अद्याप सुरुवात केली नसून ४ शेतकरी गटांची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती पोलादपूर तालुका कृषी अधिकारी यांच्या कार्यालयातील अधिकारी भरत कदम यांनी दिली.

'सत्यमेव जयते फार्मर कप' ही प्रामुख्याने पाणी फाऊंडेशन आणि महाराष्ट्र शासनाचा कृषी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केली जाणारी एक अनोखी स्पर्धा आहे. शेती क्षेत्रातील प्रगती आणि शेतकऱ्यांचे सक्षमीकरण करण्यासाठी या स्पर्धेचे आयोजन केले जाते. या स्पर्धेच्या आयोजनामागे शेतकऱ्यांनी वैयक्तिक शेती न करता एकत्र येऊन गट तयार करावेत आणि संघटित होऊन शेती करावी, हा या स्पर्धेचा मुख्य उद्देश आहे. याअंतर्गत सर्व शेतकऱ्यांनी एकत्र येऊन बियाणे, खते किंवा इतर निविष्ठांची घाऊक खरेदी केल्यामुळे आणि सामूहिक व्यवस्थापनामुळे शेतीचा एकूण उत्पादन खर्च कमी करणे शक्य होते. स्पर्धेत सहभागी शेतकऱ्यांना माती परीक्षण, योग्य बियाण्यांची निवड, बीजप्रक्रिया आणि एकात्मिक पीक व्यवस्थापन यांसारख्या आधुनिक व वैज्ञानिक पद्धतींचे कृषी तज्ज्ञांकडून मोफत मार्गदर्शन दिले जाते. परिणामी, योग्य तांत्रिक मार्गदर्शनाचा वापर करून पिकांचे उत्पन्न वाढवणे आणि त्याद्वारे शेतकऱ्यांचे आर्थिक जीवनमान उंचावून त्यांचे उत्पन्न दुप्पट करणे हा आहे.

पोलादपूर तालुक्यातील गोळेगणी, तुर्भे खुर्द, वाकण, आंग्रे कोंड, कालवली, कुडपण बुद्रुक, गांजवणे, देवळे, परसुले, वझरवाडी, आडावळे खुर्द, कणगुले, काटेतळी, कापडेखुर्द, कापडे बुद्रुक, किनेश्वर, कोतवाल खुर्द, कोतवाल बुद्रुक, गोलदरा, गोवेले, चरई, चांभारगणी खुर्द, चांभारगणी बुद्रुक, ढवळे, ताम्हाणे, तुर्भे कोंड, तुर्भे बुद्रुक, दाभिळ, धामणदिवी, धारवली, पळचिल, पार्ले, पैठण, बोरघर, बोलावले, भोगाव खुर्द, माटवण, मोरगिरी, मोरसडे, रानवडी बुद्रुक, लोहारे, सडवली, सवाद, साखर आणि हळदुले या गावातील पुरुष व महिला शेतकरी गटांनी भात पिकास प्राधान्य देऊन वझरवाडीतील वझरवाडी शेतकरी गटाने व मोरगिरी येथील रामर्पण गटाने नाचणी, चरई येथे कार्ले वझरवाडी येथे रवळनाथ शेतकरी गटाने भेंडी, दिविलच्या स्वामीनी महिला गटाने तूर पिकाची वैविध्यपूर्ण लागवड केली आहे.

### नैसर्गिक संसाधनांचा कार्यक्षम वापर

पाणी, जमीन आणि इतर नैसर्गिक संसाधनांचा योग्य व शाश्वत वापर करून पर्यावरणाचा समतोल राखणे. शक्य होते. या स्पर्धेत महिला शेतकरी गटांना विशेष प्रोत्साहन दिले जाते, ज्यामुळे ग्रामीण भागातील महिलांना शेती व्यवस्थापनात नेतृत्व करण्याची संधी मिळते. वेगवेगळ्या गावांमधील शेतकरी गट एकमेकांशी संवाद साधून आपले अनुभव आणि शेतीतील यशस्वी प्रयोग एकमेकांसोबत आदानप्रदान करतात, ज्यामुळे मशेतकरी ते शेतकरीफज्ञानाची एक साखळी तयार होते. पारंपारिक शेतीला आधुनिक, शाश्वत आणि फायदेशीर व्यवसायात बदलण्यासाठी आणि शेतकऱ्यांमध्ये एकीची भावना निर्माण करण्यासाठी या 'फार्मर कप' स्पर्धेचे आयोजन केले जाते.

## निवडक



### तटकरे महाविद्यालयात नशामुक्ती सप्ताह

**माणगाव :** युवकांमध्ये व्यसनमुक्तीची जाणीव निर्माण करून सुदृढ, निरोगी आणि सक्षम भारत घडविण्याच्या उद्देशाने माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाच्या द. ग. तटकरे महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने भारत सरकारच्या सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालयाच्या नशामुक्त भारत अभियान अंतर्गत दि. १७ ते २६ जून या कालावधीत नशा मुक्त भारत अभियान विकसित भारत की पहचान या संकल्पनेवर आधारित नशा मुक्तीसप्ताह विविध उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. सप्ताहाची सुरुवात नशामुक्तीची सामूहिक प्रतिज्ञा घेऊन झाली. स्वयंसेवक राज ओव्हाळ यांनी सर्व विद्यार्थी, स्वयंसेवक व प्राध्यापकांना व्यसनमुक्त भारत घडविण्याची प्रतिज्ञा दिली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या कार्यक्रम अधिकारी प्रा. नेहा तुराई यांचे विशेष सहकार्य लाभले. तसेच प्रा. शाश्वती महाडिक, प्रा. सुष्मिता मामुनकर, प्रा. नाजिया जुमल आणि राष्ट्रीय सेवा योजना विभागातील सर्व स्वयंसेवक यांनी सक्रिय सहभाग नोंदवून कार्यक्रम यशस्वी केला. व्यसनमुक्त युवक, सुदृढ समाज आणि विकसित भारत हा संदेश देणारा हा नशामुक्ती सप्ताह विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जबाबदारीची भावना जागृत करणारा आणि व्यसनमुक्त भारताच्या दिशेने प्रेरणादायी ठरला.



### कर्जतमध्ये पल्स पोलिओ मोहीम यशस्वी

**नेरळ :** देशभर रविवार (दि.२८) जून रोजी पल्स पोलिओ लसीकरण मोहीम राबविण्यात आली. तालुक्यात ३११ बुथवर लसीकरण मोहीमेत तब्बल १४७४९ बालकांना लसीकरण करून घेण्यात आल्याची माहिती तालुका आरोग्य अधिकारी डॉ नितीन गुरव यांनी दिली. त्यात रेल्वे स्टेशन, बस स्टँड आदी ठिकाणी देखील बूथ उभारण्यात आले होते.तालुक्यातील सहा प्राथमिक आरोग्य केंद्र तसेच ३८ उपकेंद्र येथे लसीकरण करून घेण्यासाठी गर्दी होते. त्याचवेळी अंगणवाडी केंद्रात देखील बूथ तयार करण्यात आले होते. ० ते ५ वयोगटातील अपेक्षित लाभार्थी संख्या १४७४९ एवढी होती. सर्व लाभार्थी बालकांना लसीकरण करण्यात यावे यासाठी ६४८ कर्मचारी तैनात होते. त्यात आरोग्य विभाग, अंगणवाडी सेविका मदतनीस यांच्याकडून लसीकरण करून घेण्यात आले. तर काही बालके घरी नसतील त्यांना पुढील चार दिवसात त्यांचे घरी जाऊन लसीकरण केले जाणार असल्याची माहिती तालुका आरोग्य अधिकारी डॉ नितीन गुरव यांनी दिली. त्याचवेळी शहरी भागात कर्जत उपजिल्हा रुग्णालय आणि माथेरान येथील बी जे हॉस्पिटल येथे लसीकरण करण्यात आले होते.

### खरिपाच्या भात पेरणीला वेग

**चिरनेर :** उरण तालुक्यात उरण पूर्व विभागातील चिरनेर, कळंबुसरे, मोठीजुई, सारडे, वशेणी या गावांसह नागाव, केगाव, साई, दिघाटी, खारपाडा या भागात व इतरत्र खरिपाच्या पेरणीला वेग आला आहे. सध्या पेरणी योग्य पाऊस बरसल्यामुळे, गेले दोन दिवस शेतकरी भात बियाणे पेरणीच्या कामात व्यस्त आहेत. या भागातील पारंपारिक बैलांचे नांगर आता नामशेष झाले असल्यामुळे शेतकरी पावर टिलरच्या साह्याने नांगरणी करत आहेत. सध्या शेतकरी शेतीच्या मशागतीच्या आणि पेरणीच्या कामात मग्न असल्याचे दिसून येत आहे. पावसाने उघडीप दिल्यामुळे शेतकऱ्यांची पेरणीची कामे युद्धपातळीवर सुरू आहेत. या भागात औद्योगिककरणामुळे गोदामांचे जाळे विणले आहे. त्याचबरोबर शेतकऱ्यांना वाढत्या महागाईमुळे बी- बियाणे, खते व शेतमजूर परवडत नसल्यामुळे तालुक्यातील शेत जमिनीचे लागवडीखालील क्षेत्र मोठ्या प्रमाणावर कमी झाले आहे. सध्या जया, मसूरी, रत्ना, सुवर्णा, रत्नागिरी, इंद्रायणी अशा विविध जातीच्या वाणांची शेतकऱ्यांनी भात पेरणी केली आहे.



### दगडी शाळेतील विद्यार्थ्यांना छत्र्या वाटप

**नवीन पनवेल :** शिवसेनेच्या ६० व्या वर्धापनदिनानिमित्त पनवेल शहर शिवसेनेतर्फे पनवेल म. न. पा. दगडी शाळा क्रं २ येथे वृक्षारोपण तसेच शालेय विद्यार्थ्यांना छत्री व वह्या वाटप करण्यात आले. यावेळी रमेश गुडेकर यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना वह्यांचे तर राहुल गोगटे यांच्या माध्यमातून छत्रीचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन राहुल गोगटे यांनी केले होते. यावेळी रमेश गुडेकर, प्रथमेश सोमण, प्रसाद सोनवणे, अभिजित साखरे, शैलेश जगनाडे, अर्जुन परदेशी, खंडेश धनावडे, गुलाब बागवान, विक्रम पाटणकर, सुजन मुसलोंडकर, राहुल गोगटे, शाळेचे मुख्याध्यापक सुजित म्हात्रे, वैभव पाटील, वैशाली सावळे, अर्चना माने, स्वाती पाटील आदींचे सहकार्य लाभले.

### म्हसळ्यात ५५० मिमी पावसाची नोंद

**म्हसळा :** दरवर्षी सरासरी साडेतीन ते चार हजार मिमीपेक्षा अधिक पावसाची नोंद होणाऱ्या म्हसळा तालुक्यात यंदा जून अखेरपर्यंत केवळ ५५० मिमी पावसाची नोंद झाली आहे. २९ जून रोजी तालुक्यात एकाच दिवशी २४० मिमी मुसळधार पाऊस झाल्याने संततधार पावसाला अखेर सुरुवात झाली आहे. मागील वर्षी याच दिवशी तालुक्यात १७११ मिमी पावसाची नोंद झाली होती.तुलनेत यंदा पावसाचे प्रमाण अत्यंत कमी असल्याचे चित्र दिसून येत आहे. सन २०२५ मध्ये ७ मे रोजी पावसाचे आगमन झाले होते. त्यानंतर ३ नोव्हेंबरपर्यंत जवळपास सात महिने पाऊस सुरू राहून तब्बल ५९५३ मिमी इतक्या विक्रमी पावसाची नोंद झाली होती. तर सन २०२४ मध्ये ३९६१ मिमी पावसाची नोंद झाली होती. येत्या काळात पावसाचा जोर कसा राहतो याकडे शेतकरी व नागरिकांचे लक्ष लागले असून यंदाचा पावसाळा नेमका कसा ठरणार हे पुढील काही आठवड्यांतील पावसावर अवलंबून राहणार आहे.

# जिल्ह्यात वटपौर्णिमा उत्साहात साजरी

जून महिन्यातील काही प्रमुख सणांमधील वटपौर्णिमेच्या सणाला विशेष महत्त्व आहे. हिंदू पंचांगानुसार ज्येष्ठ महिन्यातील पौर्णिमा तिथीला वटसावित्री पौर्णिमा साजरी करण्याची परंपरा आहे. पतीच्या दीर्घायुष्यासाठी हे व्रत केले जाते. यंदा वटपौर्णिमा सोमवारी (दि.२९) जून रोजी जिल्ह्यात सर्वत्र उत्साहात साजरी करण्यात आली. विवाहित, सुवासिनी महिलांनी त्या-त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. जन्मोजन्मी मला हाच पती मिळावा, त्याला दीर्घायुष्य लाभावे, असा हेतू त्यामागे असतो.

## वटपौर्णिमेनिमित्त महिलांनी अनुभवले कुटुंबप्रेम

**| पाली /बेणसे | प्रतिनिधी |**

जिल्ह्यात सर्वत्रच वटपौर्णिमेच्या सनानिमित्त धार्मिक व मंगलमय वातावरण पहावयास मिळतेय. पेण तालुक्यातील झोतीरपाडा परिसरात वटपौर्णिमा सण पारंपारिक पद्धतीने आणि भक्तीभावाने मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सकाळपासूनच परिसरातील सुवासिनींमध्ये पूजेची लगबग पाहायला मिळाली. साजशृंगार करून हातात पूजेचे ताट घेऊन महिलांनी वडाच्या झाडाजवळ मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.



वटपौर्णिमेनिमित्त विवाहित महिलांनी वडवृक्षाच्या झाडाला सुताचे फेरे घातले. पिढ्यानपिढ्या चालत आलेल्या या परंपरेचे जतन करत महिलांनी वडवृक्षाची पूजा केली. वडाचे झाड दीर्घायुषी असल्याने आपल्या पतीला दीर्घायुष्य लाभावे, कुटुंबात सुख-समृद्धी नांदावी आणि पती-पत्नीमधील प्रेमाचे नाते अधिक दृढ व्हावे, अशी प्रार्थना सुवासिनींनी केली.

यावेळी महिलांनी समाजातील वाईट प्रवृत्तींचा नाश होऊन चांगल्या विचारांचा विजय व्हावा तसेच सर्वांना उत्तम आरोग्य आणि दीर्घायुष्य लाभावे, अशीही सामूहिक प्रार्थना केली.

## सुतारवाडी पंचक्रोशीत वटपौर्णिमा उत्साहात

**| सुतारवाडी | प्रतिनिधी |**

सुतारवाडी हिंदू परंपरेनुसार धार्मिक पद्धतीने वटपौर्णिमा सण साजरा झाला. महिलांनी पारंपारिक पद्धतीने पोशाख करून, वडाच्या झाडाला फेऱ्या मारून पतीला दीर्घायुष्य मिळो अशी आपली इच्छा व्यक्त केली. दोन दिवस अगोदरच वटपौर्णिमेला लागणाऱ्या वस्तूंची खरेदी गृहिणींनी केली होती. फणसाचे गर, आंबे करवंदे जांभळं, करंडा फनी अशा विविध फळांची सजावट करून द्रोण भरून एकमेकींना देऊन वडाच्या झाडाला फेऱ्या मारून उत्साहामध्ये हा सण साजरा केला.





## सुवासिनींकडून वट वृक्षाची पूजा

**| आगरदांडा | प्रतिनिधी |**

वटपौर्णिमेच्या उत्सवा निमित्ताने आज शहरासह परिसरातील विविध ठिकाणी महिलांनी वडाच्या वृक्षाची पारंपरिक पद्धतीने पूजा करून पतीच्या दीर्घायुष्य, उत्तम आरोग्य आणि कुटुंबाच्या सुख-समृद्धीसाठी तसेच सात जन्मी हाच नवरा मिळावा अशी श्रद्धेने प्रार्थना केली.

सकाळपासूनच शहरातील नववधुंसह सुवासिनींनी पारंपरिक वेशभूषेत गुरव पाखाडी जवळील शिवमंदिरा जाऊन भगवान शिव शंकराची पुजा करुन मंदिरा जवळील ३०० वर्षा पूर्वी वडाच्या वृक्षाची पुजा-अर्चा करुन वृक्षाला दोरा गुंडाळत सात प्रदक्षिणा घालून विधिवत पुरोहिताकडून पुजा घालण्यात आली.

ज्येष्ठ महिलांनी नववधूंना वटपौर्णिमेचे धार्मिक व सांस्कृतिक महत्त्व सांगितले. पूजनानंतर महिलांनी एकमेकींना हळद-कुंकू लावून शुभेच्छा दिल्या. त्यामुळे परिसरात भक्तिमय झाले होते.



## सामाजिक संघटनांकडून वडाचे झाड भेट

उरण : उरणमध्ये उरण शहर, जेएनपीए, द्रोणागिरी नोड, महालन विभाग, जासई, चिरनेर परिसरातील सुवासिनींनी वटपौर्णिमा पारंपारिक पद्धतीने मोठ्या उत्साहात साजरी केली. परिसरात वडाच्या झाडाच्या ठिकाणी महिलांनी पूजेसाठी गर्दी केली होती.यावेळी प्रत्येक सुवासिनी महिलेने एकमेकांना हळदी कुंकू करत,आप आपल्या पतीला दिर्घायुष्य लाभू दे असे साकडे घा-तले. यावेळी महिलांच्या चेहऱ्यावर एक प्रकारचे आनंदाचे वातावरण पसरले होते. उरण तालुक्यातील काही सामाजिक संघटनांनी वट पौर्णिमेनिमित्ताने सर्व महिलांना वडाचे झाड देऊन त्या वडाच्या झाडाचे वृक्षारोपण करुन सांभाळ करण्याचे आवाहन संघटनांच्यावतीने करण्यात आले आहे.

## सुहासिनींच्या वटवृक्षाला फेऱ्या

**| कर्जत | प्रतिनिधी |**

यंदा वटपौर्णिमा उत्साहात साजरी करण्यात आली. आज सुट्टी नसल्याने चाकरमानी सकाळच्या सुमारास वटवृक्षाची पूजा करण्यासाठी बाहेर पडल्या. पाऊस लांबल्याने सुहासिनी अगदी संध्याकाळ पर्यंत मनोभावे वट वृक्षाची पूजा करीत होत्या. यंदा शाळा सुरु असल्याने मुलांना शाळेत सोडून येऊन काही सुहासिनींनी वट वृक्षाची पूजा केली तर काही सुहासिनींनी मुलांची शाळा दुपारी असल्याने सकाळीच पूजेचा मुहूर्त साधला.

यंदा अधिक महिन्यामुळे विवाह सोहळे अगदी काल - परवा पर्यंत पार पडत हो-ते. त्यामुळे वटपौर्णिमेसाठी नव वधुंची संख्या मोठी होती. पारंपरिक वेशभूषा करून सुहासिनी वटवृक्षाला फेऱ्या मारण्यासाठी तयार होत्या. चार - पाच वर्षांपूर्वी तालुक्यातील बहुतांश रस्त्यांचे रुंदिकरण व चौपदरीकरण झाल्याने रस्त्या लगतची अनेक जूने वटवक्ष तोडण्यात आल्याने सुहासिनींना वटवृक्षाची पूजा करण्यासाठी पायपीट करावी लागली. तर काही महिलांनी वटवृक्षाच्या फांद्या घरी आणून पूजा केली.



हल्लीच्या मोबाईलच्या जमान्यात काही सुहासिनींना सेल्फीचा मोह आवरता आला नाही. मसात जन्मी हाच नवरा मिळू देफअशी प्रार्थना पारंपारिक पद्धतीने करून वटपौर्णिमा उत्साहात साजरी करण्यात आली. कोंकण ज्ञानपीठ फार्मसी महाविद्यालयातील महिला प्राध्यापकांनी दोन वर्षांपूर्वी लावलेल्या वट वृक्षाची पूजा करून फेऱ्या मारून वटपौर्णिमा साजरी केली.



## वटपौर्णिमेनिमित्त महिलांची गर्दी

**खांदा कॉलनी** : वट पौर्णिमेनिमित्त पनवेल तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीतील विविध ठिकाणी असलेल्या वडाच्या झाडांजवळ सोमवारी सकाळपासून महिलांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. पारंपरिक पद्धतीने महिलांनी वडाच्या झाडाची पूजा करून दोरा गुंडाळत पतीच्या दीर्घायुष्याची प्रार्थना केली. पूजा-अर्चा करण्यासाठी अनेक ठिकाणी महिलांच्या रांगा लागल्या होत्या. पारंपरिक वेशभूषेत आलेल्या महिलांमुळे परिसराला धार्मिक आणि उत्सवी स्वरूप प्राप्त झाले होते. पूजा झाल्यानंतर अनेकांनी कुटुंबीय व मैत्रिणींसोबत छायाचित्रे आणि सेल्फी काढत फोटोसेशनचा आनंद लुटला. श्रद्धा, परंपरा आणि आधुनिकतेचा संगम यानिमित्ताने सर्वत्र पाहायला मिळाला. उत्सव शांततेत आणि भक्तिमय वातावरणात पार पडला.

## सुधागडात गावोगावी वटवृक्षाचे पूजन



**| पाली /बेणसे | प्रतिनिधी |**

पाली सह सुधागड तालुक्यात वटपौर्णिमा सण मोठ्या उत्साहात साजराकरण्यातआला.तालुक्यातील पालीसह विविध गावांमध्ये सुवासिनी महिलांनी पारंपरिक पद्धतीने वडवृक्षाचे पूजन करून आपल्या पतीच्या दीर्घायुष्यासाठी प्रार्थना केली. पहाटेपासूनच महिलांनी पारंपरिक वेशभूषेत सजून वडवृक्षाजवळ गर्दी केली होती. वडाच्या झाडाला प्रदक्षिणा घालत महिलांनी वटपौर्णिमेचे व्रत श्रद्धेने पूर्ण केले. यावेळी धार्मिक व सांस्कृतिक वातावरण निर्माण झाले होते.

पाली शहरासह परिसरातील गावांमध्ये महिलांचा उत्साह विशेष पाहायला मिळाला. सुवासिनींनी एकमेकींना वाण देत शुभेच्छांची देवाणघेवाण केली. पारंपरिक संस्कृती आणि कौटुंबिक मूल्ये जपणारा हा सण महिलांनी आनंदाने साजरा केला. वटपौर्णिमा हा सण केवळ धार्मिक परंपरा जपणारा नसून कुटुंबातील नातेसंबंध अधिक दृढ करणारा सण म्हणून ओळखला जातो. दरवर्षीप्रमाणे यंदाही सुधागड तालुक्यात हा सण मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला.

## खालापूर तालुक्यात वटपौर्णिमेचा उत्साह

**| खोपोली | प्रतिनिधी |**

हिंदू पंचांगातील ज्येष्ठ महिन्यात येणारी पौर्णिमा हा दिवस वटपौर्णिमा म्हणून साजरा केला जातो. या व्रतादरम्यान विवाहित स्त्रिया आपल्या पतीला उत्तम आरोग्य लाभावे, दीर्घायुष्य प्राप्त व्हावे, सात जन्मी हाच पती मिळावा म्हणून वडाच्या झाडाची पूजा श्रध्देने करतात. २९ जून रोजी खालापूर तालुक्यात सर्वच ठिकाणी सौभाग्यवती महिलांनी वट वृक्षाची पूजा-आर्चा करीत पतीराजाला दिर्घायुष्य लाभो आणि संसार सुखाचा होवो अशी प्रार्थना केल्याचे चित्र खालापूर तालुक्यात पाहायला मिळाले.



## रोहा प्रेस क्लबतर्फे वृक्षारोपण

**| धाटाव | प्रतिनिधी |**

रोहा अष्टमी नगरपरिषद हद्दीतील रोहिदास नगर येथे रस्ता दुतर्फा वृक्षारोपण कार्यक्रमाचे रोहा प्रेस क्लबने सोमवारी आयोजन केले होते. दरवर्षी वटपौर्णिमेचे औचित्य साधून वृक्षारोपण करण्याची परंपरा यावर्षीही रोहा प्रेस क्लबने कायम ठेवली. महिला कक्ष प्रमुख समिधा अष्टीवकर यांच्या पुढाकारातून वृक्षारोपणाचा कार्यक्रम आयोजित केला जातो. आयोजित वृक्षारोपण कार्यक्रम सुदर्शन कंपनीचे हेड विवेक गर्ग यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत दरवर्षी वटपौर्णिमेचे औचित्य साधून विविध ठिकाणी वृक्षारोपण करणाऱ्या रोहा प्रेस क्लबचे सर्वच उपक्रम लोकोपयोगी, त्यातही



पर्यावरण पूरक असतात, झाडे ऑक्सिजन देतात, प्रत्येकाने झाडे लावून आपल्या ऑक्सिजनची सोय करावी, जंगल टिकले, वाढली पाहिजेत, पर्यावरण जागृती व संवर्धनात पत्रकारांचे काम कौतुकास्पद आहे, आजचा वृक्षारोपण हे त्याचेच द्योतक आहे असे प्रतिपादन सुदर्शन कंपनीचे साईट हेड विवेक गर्ग यांनी केले.

यावेळी वनपाल प्रवीण शिंदे अध्यक्ष श्याम लोखंडे, बळीर-ाजा फाऊंडेशनचे अध्यक्ष विठ्ठल मोरे, रवी दिघे, अमर चंदने, कार्याध्यक्ष नाना खरीवले, राजेंद्र जाधव, जितेंद्र जाधव, सचिव रविंद्र कान्हेकर, महेंद्र मोरे, उद्धव आव्हाड, रुपेश रटाटे, विश्वजित लुमन, अंजुम शेटे, केशव म्हस्के व पत्रकार परिवार उपस्थित होता.



● जन्मोजन्मी हाच पती मिळावा यासाठी वडाचा झाडाला सात फेऱ्या मारून पारंपरीक वटपौर्णिमा सण साजरा करताना सुवासिनी. (छायाचित्र. उदय कळस )



● वटपौर्णिमेनिमित्त राजपुरी गावातील महिला समुद्रकिनारी वडाच्या झाडाचे पूजन करताना (छायाचित्र : सुधीर नाझरे)



● माणगावमध्ये महिलांनी वडाच्या झाडाची पूजा करत वटपौर्णिमा उत्साहात साजरी केली. (छायाचित्र : सलीम शेख, माणगाव)

**क्लासिफाईड**
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

● ऑफिस स्टाफ आवश्यक, Tanna Consultancy शॉप नं. १ शारदा CHS. महावीर चौक, बेल्जियन वॅफल समोर,अलिबाग, जि. रायगड ऑफिस स्टाफची आवश्यकता. संपर्क : ९९२३७५०५४९, ९१५०७१७०३८

● प्रशस्त ३००० चौरस फूट खुला हॉल ऑफिशिअल कामासाठी भाडेतत्त्वावर देणे आहे. गरजूनी संपर्क करावा. संपर्क – ९२२६३७९८४४ / ९८२३९२७२८८

● वॉन्टेड :– अलिबागमधील दवाखान्यामध्ये वृद्ध महिलेला काळजीवाहू सेविका भेटा किंवा पगाराचे अपेक्षासह लिहा. सुधाकर रानवडे, अन्नपूर्णावाडी, हरिष बेकरीजवळ चेंढरे.

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१



● खांदा कॉलनी वटपौर्णिमेनिमित्त पनवेल शहरातील विविध भागांतील महिलांनी पारंपरिक पद्धतीने पूजा-अर्चा करत पतीच्या दीर्घायुष्याची प्रार्थना केली. (छायाचित्रः राजेश डांगळे)





● वटपौर्णिमेनिमित्त ग्रामीण भागातील महिलांनी आपल्या घरी वडाचे झाड आणून पूजा केली. तसेच वडखळमधील इद्रंनगरमध्ये महिलांनी वटपौर्णिमा हा सण उत्साहात साजरा केला.

# रेल्वे प्रवाशांमध्ये जनजागृती अभियान

| पनवेल | प्रतिनिधी |

जागतिक अंमली पदार्थ विरोधी दिनानिमित्त पनवेल रेल्वे पोलीस ठाण्याच्या वतीने पनवेल रेल्वे स्थानक परिसरात प्रवाशांमध्ये जनजागृती करण्यासाठी विशेष अभियान राबविण्यात आले. या उपक्रमाद्वारे अंमली पदार्थांचे दुष्परिणाम, सायबर फसवणुकीपासून बचाव तसेच सुरक्षित रेल्वे प्रवासाबाबत नागरिकांना मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी हातात जनजागृती फलक घेऊन प्रवाशांशी संवाद साधला. कोणतेही अंमली पदार्थ शरीरासाठी घातक असून, त्याचा परिणाम केवळ व्यसनाधीन व्यक्तीवरच नव्हे तर, संपूर्ण कुटुंबावर होत असल्याचे सांगण्यात आले. तसेच भारतातील एनडीपीएस कायदा १९८५ अंतर्गत अंमली पदार्थांचे सेवन व बेकायदेशीर व्यवहार हा दंडनीय गुन्हा असल्याची माहिती देण्यात आली. रेल्वे प्रवासादरम्यान अनोळखी व्यक्तीकडून खाद्यपदार्थ किंवा पेय स्वीकारू नये. अंमली पदार्थांची वाहतूक किंवा सेवन आढळल्यास रेल्वे पोलीस हेल्पलाइन १५१२ तसेच अंमली पदार्थ हेल्पलाइन १९३३ वर तात्काळ माहिती द्यावी, असे आवाहन करण्यात आले.

यासोबतच सायबर गुन्ह्यांपासून बचावासाठी ओटीपी, यूपीआय पिन किंवा बँकेची गोपनीय माहिती कोणालाही देऊ नये, अज्ञात लिंक किंवा क्यूआर कोड स्कॅन करू नये, सार्वजनिक फ्री वाय-फाय वापरताना सतर्क राहावे तसेच संशयास्पद कॉल किंवा संदेशांवर विश्वास ठेवू नये, अशा महत्त्वपूर्ण सूचना देण्यात आल्या. वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय तायडे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या अभियानात गोपनीय शाखेचे अंमलदार जाकीर शेख, दोन पोलीस उपनिरीक्षक आणि २२ पोलीस अंमलदार सहभागी झाले. प्रवाशांनी या उपक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद दिला असून समाजघडणीसाठी अशा जनजागृती मोहिमा प्रभावी ठरत असल्याचे मत व्यक्त केले. सायबर फसवणूक झाल्यास राष्ट्रीय हेल्पलाइन १९३० तसेच महाराष्ट्र सायबर हेल्पलाइन १९४५ वर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले.

## कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)

सादर सेवा

### ई-निविदा आमंत्रण सूचना

मुख्य वाणिज्य व्यवस्थापक, कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड यांच्यामार्फत सक्षम व आर्थिकदृष्ट्या सुदृढ पक्षांकडून आयआरईपीएस पोर्टलवर ई-निविदेद्वारे दोन-पाकिट प्रणाली अंतर्गत "कोलाड व सुरथकल स्थानकांदरम्यान कोंकण रेल्वेवरील रोल-ऑन-रोल-ऑफ (रो-रो) सेवेचे विपणन व संचालन" यासाठी खुल्या निविदा आमंत्रित करण्यात येत आहेत. हा करार एका वर्षाच्या कालावधीसाठी असेल, जो पुढे आणखी एका वर्षासाठी वाढविता येऊ शकतो. **निविदा सूचना क्र. सीओ-16011-3-2023-सीओएमएम-2025, दिनांक 26.06.2026. ऑनलाईन प्रस्ताव सादर करण्याची बंद होण्याची तारीख व वेळ: 27.07.2026 रोजी 15:00 वा. पर्यंत.** मॅन्युअल प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत. सविस्तर माहिती / सहभागासाठी **www.ireps.gov.in** संकेतस्थळ पहा. जर कोणतेही शुद्धीपत्रक/ परिशिष्ट जारी करण्यात आले, तर ते केवळ याच संकेतस्थळावर उपलब्ध करून दिले जाईल.

## पनवेल महानगरपालिका
## जाहीर नोटीस सूचना

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन उक्त अधिनियम कलम ८(३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहीर करण्यात येते की,

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | बाधित झाडांची संख्या | झाडे तोडण्याचे कारण व ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | कार्यकारी अभियंता, पनवेल महानगरपालिका. | ०२ कडुलिंब, ०१ बदाम, १ जंगली व ०१ कदंब अशी एकूण ०५ झाडे तोडणे. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील, न्यू पंजाब हॉटेल व भारत पेट्रोलियम समोरील जागेत सुशोभीकरण करणे कामामध्ये ०५ झाडे बाधित होत आहेत. |
| २. | कार्यकारी अभियंता, पनवेल महानगरपालिका. | ०२ पाम, ०१ बदाम व ०१ जांभुळ अशी एकूण ०४ झाडे तोडणे. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती 'ड', येथील प्रभाग क्र. १९ प्रॉपर्टी क्र. १५६८ अ १५७२ पनवेल (आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह समोर) येथील भुखंडावर व्यावसायिक दुकाने, बहुमजली वाहनतळ बांधणे कामामध्ये ०४ झाडे बाधित होत आहेत. |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असल्यास ही सूचना प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात योग्य त्या कागदपत्रांसह पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण व उद्यान विभागामध्ये सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास सदरची झाडे तोडणेस वरील अधिनियमानुसार सशर्त परवानगी देणेबाबत पुढील कार्यवाही करण्यास येईल, याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**(स्वरूप खारगे)**
**उपायुक्त तथा वृक्ष अधिकारी पनवेल महानगरपालिका**

जा.क्र. PMC-PARK/300/2026-PTAD

## MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

## E–TENDER NOTICE

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification. **Tender fees Rs.500/- + GST**

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFx No.: 7000040154** **Tender No.: EE/EHV(O&M)/DN/PNL/e-Tender-24/ 2026-2027.** RFx e-tender for AMC for various regular preventative maintenance / emergency and breakdown works of various 220kV & 100kV Substations under EHV (O&M) Division Panvel... **3rd call.** **Tender amount Limited to Rs. 25,00,000/-, EMD amount Rs. 25,000/-** |
| 2 | Online Downloading the RFx | **29.06.2026, 18:00 Hrs. to 09.07.2026, 23:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 09.07.2026 up to 23:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **10.07.2026 at 11:00 hrs. (if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The Dy. Executive Engineer, (O): Mobile No. 9769894505.
**Note :** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**Executive Engineer**
**E.H.V. (O&M) Dn. Panvel**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल श्री. हरेश्वर गोविंद कांबरी यांनी खालील वर्णन केलेली जमीन मिळकत तिचे विद्यमान मालक मिर्झा नफीस अब्दुल कयुम बेग यांचे कडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन मौजे. देवपाडा, ता. कर्जत, जि. रायगड.**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र(हे.आर.) | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| १२७ | १०/ड | ०-२५-०० | ०-३० |

तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, खरेदीखत, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, लिज, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास हि जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही.

कळावे

दि. ३०/०६/२०२६.

**ॲड. शिवाजी किसन टोकरे**
पत्ता - शॉप नं. ९, समर्थ कृपा हौसिंग सोसायटी नेरळ, महेश टॉकीज जवळ, नेरळ ता, कर्जत, जि. रायगड पिनकोड नं. ४१०१०१
फोन नं. ७३५०१९४२००

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशीलांनी मौजे खवली ता. सुधागड जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**-: मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे खवली ता. सुधागड जि. रायगड**

| कब्जेदाराचे नांव | गट नं./स.नं. | क्षेत्र हे.आर | आकार रू.पैसे |
|---|---|---|---|
| श्री.जगन्नाथ मोरेश्वर पवार | १०२ | १-२७-६० | ८-८८ |

सदर वरील वर्णन केलेली एकूण सर्व मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे कब्जेदार यांचेकडून कायम खरेदीने विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदर होणारे खरेदी विक्री व्यवहारास कोणाचीही हरकत अथवा दावा असल्यास वा सदरहु मिळकतीचे खरेदी विक्री बाबत तसेच हक्क हितसंबंध, मालकी वहीवाट, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्यूपत्र, साठेकरार अथवा कोणाचेही काही हक्क हितसंबंध वहिवाट अथवा सदर मिळकतीचे ताबे कब्जा वहिवाट असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून संबंधीत तक्रारदार याने आपली हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासहीत १४ दिवसांचे कालावधीत खालील पत्त्यावर नोंदवावे. सदर कालावधीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे. असे समजून आमचे अशील सदरचा खरेदी विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेली हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

ठिकाण :- पाली - सुधागड
दिनांक २९/०६/२०२६

सही /-
**श्री. प्रभाकर कृष्णकांत भोईर**
ॲडव्होकेट
मु.पो.नवीन पनवेल ता.पनवेल जि.रायगड
मोबा.नं. ८१४९६५१५०८

## महाराष्ट्र शासन
**सहकार विभाग**
**सहायक निबंधक सहकारी संस्था अलिबाग कार्यालय**
**कॉंग्रेस भुवन ट्रस्ट इमारत, पहीला मजला, महर्षी कर्वे रोड, पो. ता. अलिबाग जि. रायगड. पिन कोड ४०२२०१.**
Email ID aresalibag@gmail.com

जा.क्र ४४३ सनिअ/वि.१/का.क. १०१/ दत्ता पाटील पत/सुनावणी नोटीस/२०२६ दिनांक :- २५/०६/२०२६

**सहायक निबंधक सहकारी संस्था अलिबाग जि.रायगड यांचे समोर**
**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये जाहीर नोटीस**

ज्या अर्थी दत्ता पाटील अर्बन को-ऑप क्रेडीट सोसा.लि. अलिबाग यांची दिनांक २५/०५/२०२६ रोजी तुमचे विरुद्ध महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये वसुली प्रमाणपत्र मिळवण्याबाबत रितसर अर्ज या प्राधिकरणसमोर केलेला आहे आणि महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम ८६ ब च्या तरतुदीस अनुसरुन अर्जाचा निर्णय करावा अशी विनंती केली आहे. आणि ज्या अर्थी अधिनियमाचे नियम ८६ ब नुसार सर्व प्रतिवादीना नोटिस दिनांक ११/०६/२०२६ रोजी नोंदणीकृत डाक देय पोहोच पद्धतीने नोटीस निर्गमित करणेत आली होती. प्रतिवादी क्रमांक १ ते ३ यांची नोटीस बजावल्याची पोहोच प्राप्त झाली आहे. जाब देणार प्रतिवादी कर्जदार व जामिनदार यांना नोटीस पोहोच होऊन देखील सुनावणीस हजर राहिले नसल्याने सदर कलम अन्वये व नियमाखाली जाहीर नोटीसद्वारे आपले म्हणणे दाखल करण्यासाठी संधी देण्यात येत आहे. तसेच अर्जदाराने जाहीर नोटीस देणेची विनंती केली आहे.

त्याअर्थी खालील यादीतील कर्जदार व जामिनदार यांना जाहीर नोटीस देणेत येते की, दिनांक ०९/०७/२०२६ रोजी दिवसाचे सकाळी ११.०० वाजता सहायक निबंधक, सहकारी संस्था, अलिबाग यांचे कार्यालय, कॉंग्रेस भवन ट्रस्ट इमारत, पहिला मजला, महर्षी कर्वे रोड, पो. ता. अलिबाग जि. रायगड. पिन कोड ४०२२०१ या कार्यालयात तुम्ही स्वत: हजर राहावे व अर्जदार संस्थेने केलेले मागणीबाबत बचाव करण्याची परवानगी घ्यावी किंवा तसा अर्ज शपथपत्र नोटीस जाहीर केलेचे दिवसापासुन ८ दिवसाच्या आत या प्राधिकरणासमोर सादर करावे. या कामी तुम्ही गैरहजर राहिलेस किंवा बचाव करणेचा अर्ज/शपथपत्र मुदतीत दाखल न केलेस अर्जदाराने अर्जात केलेली अभिकथने आपण स्विकारली आहेत असे गृहीत धरुन, अर्जाची चौकशी करुन, अर्ज नियम ८६ क अन्वये एकतर्फी निकालात काढणेत येईल यांची नोंद घ्यावी.

| अ. क्र | कर्जदाराचे नाव | अर्ज दाखल दिनांक | दावा क्रमांक | दावा रक्कम | जामिनदार क्र. १ | जामिनदार क्र. २ |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. रितेश रमेश बुरांडे | २५/०५/२०२६ | ०१/२०२६ | ४,००,२२०/- | श्री. विपुल विजय पाटील | श्री.अभिजित राजेंद्र पाटील |
| २ | श्री. रणजित नरेश टोपले | २५/०५/२०२६ | ०२/२०२६ | ५,२४,३५८ / | श्री.सुरज संजय वरसोलकर | श्री.योगेश पांडुरंग पाटील |
| ३ | श्री. नितीन रमेश म्हात्रे | २५/०५/२०२६ | ०३/२०२६ | १,१०,०४७/- | श्री. विनित दिलीप म्हात्रे | श्री. रोशन रमेश म्हात्रे |

स्थळ- अलिबाग
दि. २५/०६/२०२६

सही/-
**(अनिल पवार)**
**सहाय्यक निबंधक**
**सहकारी संस्था अलिबाग**

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

## जाहीर नोटीस

सर्व संबंधितांना याद्वारे जाहीर करण्यात येते की,

मौजे कुरुळ, ता. अलिबाग, जि. रायगड येथील भूमापन नं.१०२/३/ब बिनशेती क्षेत्र १५.१८.०० आर चौ.मी. आकारणी १५१.८० रू. पै. या वर्णनाच्या मिळकतीमधील श्री. सचिन अशोक पाथरे यांच्या अविभाजित हिश्याचे क्षेत्र ७.५९.०० आर चौ.मी. आकारणी ७५.९० रू.पै. हि मिळकत व त्यावरील अशोक चिंतामण पाथरे व जयश्री अशोक पाथरे यांच्या नावे मालक म्हणून नोंद असलेले कुरुळ ग्रामपंचायत मालमत्ता क्रमांक ६७४ क्षेत्रफळ ७२ चौ.मी. हे घर, अशी एकत्रीत मिळकत माझे अशिलांनी त्यांचेकडून खरेदी घेण्याबाबत चर्चा सुरू केली आहे.

त्यामुळे वरील वर्णनाच्या मिळकतींबाबत कोणत्याही व्यक्ती, संस्था, बँक किंवा प्राधिकरणाचा कोणत्याही प्रकारचा मालकी हक्क, वारसा हक्क, सहमालकी, ताबा, गहाण, तारण, बोजा, करार, खरेदीचा हक्क, न्यायालयीन वाद, स्थगिती आदेश, लियन, चार्ज अथवा इतर कोणताही दावा किंवा हरकत असल्यास त्यांनी या जाहीर नोटीसच्या प्रसिद्धीपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत त्यासंबंधीचे सर्व मूळ कागदपत्रांच्या प्रतींसह खाली सही करणार यांच्याकडे लेखी हरकत सादर करावी.

निर्धारित मुदतीत कोणतीही हरकत प्राप्त न झाल्यास, सदरच्या मिळकती सर्व प्रकारच्या दाव्यांपासून मुक्त आणि त्यांचे टायटल क्लीयर व मार्केटेबल आहे असे समजून विक्री व्यवहार पूर्ण करण्यात येईल. त्यानंतर प्राप्त होणाऱ्या कोणत्याही हरकती, दावे किंवा आक्षेपांची दखल घेतली जाणार नाही व त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित दावेदाराची राहील.

स्थळ : अलिबाग
दिनांक : ३०/०६/२०२६

सही /-
**(ॲड. राकेश पुंडलिक लाडे)**
श्रीकृपा, भाऊसाहेब लेले चौक,
जुन्या नगरपालिकेसमोर,
अलिबाग, जि. रायगड

## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय
**(तहसिलदार कार्यालय, अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड)**

ज.म.रअर्ज-०८/२०२६

**जाहीर नोटीस**

प्रति
श्री.अनिल एकनाथ पाटील
मेचको, आंबेली-डावाले मार्ग — अर्जदार
ता.अलिबाग जि.रायगड

विरूद्ध

ग्रुप ग्रामपंचायत नागाव,
ता.अलिबाग, जि.रायगड — सामनेवाला

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की,

१.अर्जदार श्री.अनिल एकनाथ पाटील हे मेचको, आंबेली-डावाले मार्ग, ता.अलिबाग, जि.रायगड येथील कायमचे रहिवाशी आहेत. अर्जदार यांचे आई. कै.विजया एकनाथ पाटील यांना मृत्यू दि.१८/१०/२०२६ रोजी मेचको, आंबेली-डावाले मार्ग येथील राहत्या घरी झाला होता.

मात्र त्यांच्या मृत्यूची नोंद ग्रामपंचायत नागाव येथे केलेली नसल्याने त्यांचा मृत्यू दाखला मिळण्यासाठी मृत्यू नोंदीचे आदेश जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी ग्रुप ग्रामपंचायत नागाव यांना करणेकरीता न्यायालयीन आदेशाची आवश्यकता असल्याचे अर्जदार यांना तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांच्याकडे अर्ज दाखल केला आहे.

तरी सदर आदेश देण्यास कोणीचीही हरकत/तक्रार असल्यास यांनी नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून दि.२३/०७/२०२६ रोजी पर्यंत मे.तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांचे न्यायालयात हजर राहून आपली हरकत/तक्रार नोंदवावी. मागाहून आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. व उपलब्ध असलेल्या कागदपत्रानुसार निकार/निर्णय देणेत येईल. यांची कृपया नोंद घ्यावी.

आज दि.२५/०६/२०२६ रोजी माझी सही न्यायालयाचे शिक्क्यासह दिली.

ठिकाण : अलिबाग
तारीख : २५/०६/२०२६

सही/-
**(विक्रम पाटील)**
**तहसिलदार अलिबाग**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत त्यांच्या मालकांकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**मौजे - पाथरज, तालुका - कर्जत, जि. - रायगड येथील जमिन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्वे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे. आर. पॉ. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|
| १.मे.आर्थ फार्म लि. डाय. प्रियंका वर्मा | ५६ | २/ब/१ | १-२१-०० पो.ख. ०-१४-०० एकूण १-३५-०० यापैकी खरेदी देणार यांच्या मालकीचे ०-४०-०० गुंठे क्षेत्र मिळकत | ०-३५ |

वर वर्णन केलेली जमिन मिळकतीच्या कोणत्याही व्यक्तींचा अगर संस्थाचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास आणि किंवा कोणत्याही व्यक्तींची अगर संस्थांची आमच्या अशिलांच्या वर वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत पुराव्यासोबत लेखी स्वरूपात हरकत कळवावी, वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील जमिन मिळकतीशी कोणत्याही व्यक्तींचा अगर संस्थांचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, तसेच कोणत्याही व्यक्तीची अगर संस्थांची आमचे अशिलांच्या वर वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत नाही किंवा असल्यास ती हरकत त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेली आहे असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मागाहून कोणीही हरकत घेतल्यास ती आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

दि. २९/०६/२०२६

अधिवक्ता
**शैलेश दत्तात्रेय पवार**
पत्ता. घर क्र ३, नेमीनाथ हाईट्स शेजारी,
मुद्रे बु.कर्जत, ता.कर्जत, जि.रायगड,
मो. ९५९५२११८६७

## जाहिर नोटीस

सर्व संबंधितांना या जाहिर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे:- गोंधळपाडा, तालुका :- अलिबाग, जिल्हा :- रायगड येथील खालीलप्रमाणे वर्णन केलेली जिरायत शेती मालमत्ता ही सध्या विद्यमान मालक श्री. काशिनाथ सदू पाटील व कै. मधुकर सदू पाटील यांचे कायदेशीर वारस राहणार :- मु. नेहुली, पो. खंडाळा, तालुका :- अलिबाग, जिल्हा :- रायगड यांच्या मालकीची असून त्यांच्या प्रत्यक्ष ताबेकब्जा - वहिवाटीत आहे.

सदरची मालमत्ता आमचे अशिल यांनी कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले असून त्यासंबंधी बोलणी सुरू आहेत.

**मालमत्तेचे संक्षिप्त वर्णन :**

| मौजे | सर्वे नं/भूमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| गोंधळपाडा | ९४/१/३ | ०-९३-४२ | १८.६२ |

वर नमूद केलेली मिळकत ही जिरायत स्वरूपाची असून, तिच्या एकूण क्षेत्रफळा पैकी उत्तरेकडील ०-२०-०० (हे.आर.चौ.मी.) क्षेत्रफळाची मिळकत ही प्रस्तुत खरेदी व्यवहाराचा विषय आहे.

वरील मालमत्ता निर्विवाद व बोजामुक्त असल्याची खात्री विद्यमान मालकांनी दिलेली आहे. तथापि, सदर मालमत्तेबाबत किंवा तिच्या कोणत्याही भागावर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, दावा, हिस्सा, करार, साठेकरार, फेरफार, ताबा, तारण, गहाण, लियन, दान, बक्षीस, पोटगी, चार्ज, मृत्युपत्र किंवा अन्य कोणताही दावा असल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत ॲड. प्रशांत सुरेश कुचेकर यांच्याकडे लेखी हरकत पुराव्यासह सादर करावी.

निर्धारित मुदतीत कोणतीही हरकत प्राप्त न झाल्यास, सदर मालमत्ता निर्विवाद व बोजामुक्त असल्याचे समजून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व नंतर कोणतीही हरकत ग्राह्य धरली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

अलिबाग
दि. ३०/०६/२०२६

सही/-
**ॲड. प्रशांत सुरेश कुचेकर**
मुंबई उच्च न्यायालय
पत्ता : मु. नेहुली, पो. खंडाळा,
ता. अलिबाग, जि. रायगड,
मो. नं. ७२७६३४४५८९

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी जमीनमालक (१) श्रीमती अलका चंद्रकांत जाधव, (२) कुमारी जागृती चंद्रकांत जाधव, (३) श्री.धनंजय चंद्रकांत जाधव, (४) श्री. रमाकांत सिताराम जाधव, (५) श्री. सुबोध चंद्रकांत जाधव, (६) श्री. सुर्यकांत सिताराम जाधव आणि (७) श्रीमती. सुलोचना सिताराम जाधव यांच्या सामाईक मालकी हक्कातील, ताबे कब्जा व वहीवाटीतील गाव आंबिवली तर्फे वनखळ, ता. खालापुर, जिल्हा रायगड बिनशेती वर्णनाची जमिन मिळकत कायमस्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरची खरेदी करण्यात येणाऱ्या जमिन मिळकतीचे सविस्तर वर्णन खालीलप्रमाणे:

**मिळकतीचे वर्णन**

गाव आंबिवली तर्फे वनखळ (५५३८१७), ता. खालापुर, जि. रायगड

| भूमापन क्र. | क्षेत्रफळ चौ. मी. मध्ये: बिनशेती योग्य (हे.आर.प्रति) | पोटखराबा | एकूण (हे.आर.प्रति) | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|---|
| ८/७ | ०-३९-२० | | ०-३९-२० (३९२०चौ.मी.) संपूर्ण क्षेत्रफळापैकी विक्री योग्य क्षेत्र ०-२०-०० (२०००चौ.मी.) | ५८८.०० |

तरी या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, वरील मिळकती संदर्भातील समझौताज्ञापन/साठेकरार/खरेदीखत/विक्री करारनामा हे आमचे अशिल आणि सदरचे जमिन मालक यांच्यामध्ये करण्यापूर्वी, सदरची मिळकत ही निर्वेध, बिनकर्जी, बोजारहित व निजोखमी असणे आवश्यक आहे, त्याकरिता जर वरील नमुद केलेल्या भुखंड मिळकतीवर अन्यथा कोणाचाही कोणत्याही प्रकाराचा हक्क, हितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून दहा (१०) दिवसांचे आत खालील पत्त्यावर लेखी पुराव्यानिशी कळवावे. जर वरील मुदतीत कोणांकडूनही, कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत आली नाही, तर आमचे अशिल सदर मिळकतीसंदर्भातील व्यवहार पूर्ण करतील याची नोंद घ्यावी,

कळावे.

सही : अजीत सिंह ॲण्ड असोसिएटस्
(वकील व कायदेशीर सल्लागार)
पत्ता: ११६/११७, १ मजला, साई चेंबर,
प्लॉट नं. ४४, सेक्टर-११, सी.बी.डी.
बेलापूर, नवी मुंबई, ता.आणि जि.ठाणे
फोन नं. ०२२-४००२६१४२/९८२०७२३०७७
E-Mail ID - ajeet_advocate@yahoo.co.in


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


## जाहिर नोटिस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील नमुद केलेली जमीन मिळकत कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. तशा आशयाची बोलणी विद्यमान मालक अनवर आयुब नाईक यांचेसोबत चालु आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व बोजाविरहित असल्याचा भरवंसा आमचे अशिलांस विद्यमान मालक यांनी दिला असून सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे,

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| सुरई ता.मुरूड | ७/१ | ०-२७-५० पो.ख.०-०१-३० एकूण ०-२८-८० | ४.८७ |

वर नमुद केलेली मिळकत क्षेत्र ०-२८-८० हे.आर. ही मिळकत जाहिर नोटिशीचा विषय आहे.

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या १४ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार याजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरचे मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधन कारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

अलिबाग,
दिनांक :२९/०६/२०२६

सही/-
**ॲड. राकेश नारायण पाटील**
रा. आगरी पॅलेस, मु.पो. चिंचोटी ता. अलिबाग,
जि. रायगड मो.नं. ९२७२६२०००५

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल मेसर्स ओराकुरा सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेड यांनी मौजे माडप, तालुका खालापूर, जिल्हा रायगड येथील सर्व्हे नं. ३६/२/अ, एकूण क्षेत्रफळ ०.९५.४० हे. आर. (९५४० चौ.मी.) ही अकृषिक (औद्योगिक) जमीन मिळकत ज्याचे विद्यमान मालक मेसर्स इन्ट्रो रिक्वायरो प्रायव्हेट लिमिटेड यांचेकडून कायमस्वरूपी खरेदीखताने विकत घेणेचे ठरविले आहे व त्या मिळकतीचे व्यवहाराबाबत विद्यमान मालकांबरोबर बोलणेही झालेले आहे.

सबब, सदरहू जमीन मिळकतीबाबत कोणाही व्यक्तीचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, दान, गहाण, बोजा, लीज, फरोक्तखत असल्यास तसेच त्यांची आमचे अशिलांच्या मूळ मालकांबरोबरच्या व्यवहारास हरकत असल्यास संबंधीत इसमांनी अगर संस्थांनी लेखी हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत लेखी स्वरूपात व पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे त्यांचे नमूद पत्त्यावर कळवावी. वरिल मुदतीत कसल्याही प्रकारची हरकत खालील सही करणार यांचेकडे लेखी स्वरूपात न आल्यास वरिल नमुद जमीन मिळकत ही निर्वेध आहे असे गृहित धरून आमचे अशिल वरील वर्णनाच्या मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व व्यवहारानंतर कोणी कुठल्याही प्रकारची हरकत घेतल्यास ती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाही याची नोंद घेण्यात यावी.

कळावे,

दि. २९/०६/२०२६

ॲड. सिद्धार्थ घरत
००४, शितल सी. एच. एस..
नविन कोर्ट समोर, पनवेल, ४१०२०६.
मो.नं. ९७७३२३०४०५

## निवडक

### अंजली वेताळने पटकावले कांस्यपदक

**औंध :** थायलंड येथे झालेल्या १५ वर्षांखालील आशियाई अजिंक्यपद कुस्ती स्पर्धेत सुर्लीची वाघीण अंजली संतोष वेताळ हिने जिगरबाज कामगिरीचे प्रदर्शन करीत कांस्यपदक मिळवून आंतरराष्ट्रीय पातळीवर सुर्लीचा झेंडा फडकावला. लेकीच्या दमदार कामगिरीमुळे ग्रामस्थांनी जल्लोष केला. ६२ किलो वजनगटात कांस्यपदकासाठी भारताची अंजली




वेताळ आणि मंगोलियाच्या खोन्झोरुल ओचीर यांच्यात अटीतटीची लढत झाली. अंजलीने बलाढ्य प्रतिस्पर्धी खोन्झोरुलला सुरवातीपासून डोईजड होऊ दिले नाही. सलामीपासून आक्रमक खेळ करीत तीने गुणफलक हलता ठेवून मोठी आघाडी घेतली होती. चुरशीची लढत १५ विरूद्ध २ गुण मिळवून तांत्रिक गुणाधिक्याने जिंकली.आंतरराष्ट्रीय स्तरावर पदक मिळवून तीने सातासमुद्रापार झेंडा फडकला. आंतरराष्ट्रीय स्तरावरील तीची पहिलीच स्पर्धा होती. त्यामुळे तीच्या कामगिरीकडे सर्वांचे लक्ष लागले होते.अंजली हिंदकेसरी संतोषआबा वेताळ यांची कन्या आहे.दोन वर्षे दुखापतीमुळे ती कुस्ती पासून दूर होती. जिद्द, मेहनतीने दुखापतीवर मात करताना तीने राष्ट्रीय निवड चाचणी स्पर्धेत बाजी मारली होती. आज आंतरराष्ट्रीय पातळीवर देखील पदक मिळवून अंजलीने यशस्वी पुनरागमन केले आहे. ग्रामीण भागातून पुढे आलेल्या अंजलीने आशियाई स्पर्धेत पदक जिंकत सुर्ली गावासह जिल्ह्याचे नाव उज्ज्वल केले आहे.

### महाराष्ट्राच्या सर्वेश कुशारेने रचला इतिहास

**भुवनेश्वर :** भुवनेश्वर येथील कलिंगा स्टेडियममध्ये सुरू असलेल्या राष्ट्रीय आंतरराज्यीय ॲथलेटिक्स चॅम्पियनशिपमध्ये सर्वेश कुशारेने पुरुषांच्या उंच उडी स्पर्धेत नवीन राष्ट्रीय विक्रम प्रस्थापित केला. कुशारेने २.३१ मीटर उंची पार करून सुवर्णपदकावर आपले नाव कोरले. महाराष्ट्राच्या सर्वेश कुशारेने तेजस्विन शंकरचा ८ वर्षे जुना २.२९ मीटरचा विक्रम मोडला. यासोबतच, सर्वेश कुशारेने जपानमध्ये होणाऱ्या २०२६ च्या आशियाई खेळांमधील आपले स्थानही निश्चित केले आहे.महाराष्ट्राच्या ३१ वर्षीय सर्वेश कुशारेने



२७ जून रोजी कलिंगा स्टेडियमवर झालेल्या उंच उडी स्पर्धेत आपल्या दमदार कामगिरीने सर्वांना प्रभावित केले. सर्वेशने उंच उडीमध्ये आपल्या तिसऱ्या प्रयत्नात २.३१ मीटरची उडी मारून इतिहास रचला. त्याने एप्रिल २०१८ मध्ये तेजस्विन शंकरने प्रस्थापित केलेला २.२९ मीटरचा विक्रम मोडला. कुशारेने तिसऱ्या प्रयत्नानंतर २.३५ मीटरची उडी मारण्याचा प्रयत्न केला, पण तो अयशस्वी ठरला. २.३१ मीटरच्या नव्या राष्ट्रीय विक्रमासह, सर्वेश कुशारेने भारतीय ॲथलेटिक्स महासंघाचा पात्रता निकषही सहजपणे पार केला, ज्यामुळे २०२६ च्या आशियाई खेळांमधील त्याच्या सहभागाचा मार्ग मोकळा झाला आहे.

### कॅनडा नॉकआऊटमध्ये विजयी

**लॉस एंजेलिस :** कॅनडा फुटबॉल वर्ल्ड कप २०२६ च्या प्री-क्वार्टर फायनलमध्ये पोहोचणारा पहिला संघ बनला आहे. त्याने सोमवारी दक्षिण आफ्रिकेला १-० ने हरवले. कॅनडाने या स्पर्धेतील कोणताही नॉकआउट सामना पहिल्यांदाच जिंकला आहे. आता त्याचा सामना ४ जुलै रोजी नेदरलँड्स आणि मोरोक्कोच्या विजेत्याशी होईल. लॉस एंजेलिस स्टेडियममध्ये सोमवारी खेळल्या गेलेल्या सामन्याच्या ९० मिनिटांपर्यंत कोणताही गोल झाला नाही. इतकेच काय, दोन्ही संघ ०-० च्या बरोबरीत होते. यानंतर, ॲलिस्टर जॉनस्टनने इंजरी



टाइमच्या दुसऱ्या मिनिटात डी च्या बाहेरून गोल करून कॅनडाला विजय मिळवून दिला. त्याला सुपीरियर प्लेयर ऑफ द मॅच म्हणून निवडण्यात आले. ७४ वर्षे आणि ७९ दिवसांचे ह्यूगो ब्रूस फिफा विश्वचषकाच्या नॉकआउट स्टेजमध्ये सामना कोचिंग करणारे सर्वात वयस्कर प्रशिक्षक बनले. त्यांनी ऑस्कर तबारेजचा विक्रम मोडला. तबारेजने २०१८ विश्वचषकाच्या उपांत्यपूर्व फेरीत ७१ वर्षांच्या वयात उरुग्वेला प्रशिक्षण दिले होते. सामन्यानंतर कॅनडाचे मुख्य प्रशिक्षक जेसी मार्श भावूक झाले. त्यांनी मैदानावर खेळाडूंना राष्ट्रीय नायक म्हटले. ते म्हणाले की, ते देशाच्या भविष्यासाठी प्रेरणा बनले आहेत. आता कॅनडामध्ये फुटबॉलचे भविष्य अधिक उज्ज्वल होईल. स्टार डिफेंडर अल्फोन्सो डेव्हिसने ७५व्या मिनिटाला दुखापतीतून पुनरागमन केले.

### केप वर्डेच्या कर्णधारावर आरोप

**नवी दिल्ली :** केप वर्डे फुटबॉल संघाचा कर्णधार रेयान मेंडेसवर बलात्काराचा आरोप आहे. ब्राझिलियन मीडिया ग्लोबोच्या वृत्तानुसार, न्यूझीलंडमध्ये मार्च २०२६ च्या फिफा मालिकेदरम्यान संघासोबत दुभाषी म्हणून काम करणाऱ्या एका महिलेने त्याच्यावर लैंगिक शोषणाचा आरोप केला आहे.तथापि, त्याच्याविरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल होईल की नाही हे अद्याप निश्चित झालेले नाही. प्रकरणाचा तपास सुरू आहे. अद्याप कोणत्याही न्यायालयाने त्याला दोषी ठरवलेले नाही. हे प्रकरण अशा वेळी समोर आले आहे, जेव्हा केप वर्डे प्रथमच फुटबॉल विश्वचषकाच्या नॉकआउट फरीत पोहोचला आहे. तो राउंड ऑफ ३२ मध्ये पोहोचणारा जगातील सर्वात लहान देश बनला आहे. संघाला ४ जुलै रोजी अर्जेंटिनाविरुद्ध सामना खेळायचा आहे. मेंडेसने ग्रुप स्टेजचे तिन्ही सामने खेळले आहेत. तथापि, त्याच्या नावावर एकही गोल नोंदवलेला नाही. ग्लोबोच्या



अहवालानुसार, तक्रार करणारी महिला ब्राझीलची नागरिक आहे. महिलेचा आरोप आहे की ऑकलंडमधील एका हॉटेलमध्ये रेयान मेंडेस तिच्या खोलीत आला आणि त्याने लैंगिक हल्ला केला. यानंतर पीडितेने स्थानिक पोलिसांना घटनेची माहिती दिली आणि वैद्यकीय तपासणी करून घेतली. अहवालात दावा करण्यात आला आहे की वैद्यकीय तपासणीत महिलेच्या शरीरावर अनेक जखमांच्या खुणा आढळल्या. अहवालानुसार, महिलेने या जखमांचे फोटो पोलिसांना आणि नंतर ग्लोबोलाही उपलब्ध करून दिले.

# लॉर्ड्सवर टीम इंडियाचा स्वप्नभंग!

## ऑस्ट्रेलियाने ६ विकेट्सने हरवले; भारतीय महिला संघ वर्ल्ड कपमधून बाहेर

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

आयसीसी महिला टी-२० विश्वचषकातील ३० वा सामना भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात ऐतिहासिक लॉर्ड्स क्रिकेट मैदानावर खेळला गेला. या सामन्यात भारतीय संघाला सहा गडी राखून पराभवाचा सामना करावा लागला आणि त्यामुळे स्पर्धेतील त्यांचे आव्हान संपुष्टात आले. आता गट अ मधून ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आफ्रिकेने उपांत्य फेरीतील आपले स्थान निश्चित केले आहे. महिला टी-२० विश्वचषकाच्या साखळी फेरीत (गट टप्प्यात) भारतीय संघ बाहेर पडण्याची ही सलग दुसरी वेळ आहे.

भारतीय कर्णधार हरमनप्रीत कौरने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आणि संघाला २० षटकांत ४ बाद १७० धावांपर्यंत मजल मारून दिली. हरमनप्रीत कौरने कर्णधाराला साजेसा खेळ करत २७ चेंडूंत ५६ धावांची खेळी केली. ऑस्ट्रेलियाने १९ षटकांत चार गडी गमावून हे लक्ष्य गाठले. ॲशले गार्डनर आणि एलिस पेरी यांनी ऑस्ट्रेलियासाठी अर्धशतके झळकावत संघाच्या विजयात महत्त्वाची भूमिका बजावली.



महिला टी-२० विश्वचषक स्पर्धा सर्वप्रथम २००९ मध्ये आयोजित करण्यात आली होती. १७ वर्षे आणि १० स्पर्धा होऊनही, भारताला अद्याप विश्वविजेतेपद मिळवता आलेले नाही. भारतीय संघ केवळ एकदाच अंतिम सामन्यापर्यंत पोहोचला आहे;२०२० च्या विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात ऑस्ट्रेलियाने भारताचा ८५ धावांनी पराभव केला होता. दरम्यान, ऑस्ट्रेलियन संघ आपले सातवे विजेतेपद जिंकण्याच्या दिशेने आणखी एक पाऊल पुढे सरकला आहे. ऑस्ट्रेलियाने उपांत्य फेरी गाठण्याची आपली १०० टक्के कामगिरी कायम राखली आहे. २००९ पासून, टी-२० विश्वचषकाच्या प्रत्येक आवृत्तीत ऑस्ट्रेलियाने किमान उपांत्य फेरीपर्यंत मजल मारली आहे. त्यांनी सात वेळा अंतिम सामना खेळला असून सहा वेळा विजेतेपद पटकावले आहे.

दरम्यान, प्रथम फलंदाजी करताना स्मृती मानधना आणि शफाली वर्मा यांनी भारताच्या डावाची सुरुवात केली. या जोडीने पहिल्या विकेटसाठी ९.१ षटकांत ६६ धावांची भागीदारी केली ही भागीदारी टी-२० च्या मानकांनुसार तुलनेने संथ होती. शफाली ही बाद होणारी पहिली फलंदाज ठरली; तिने २६ चेंडूंत ३४ धावा केल्या, ज्यामध्ये दोन षटकार आणि तीन चौकारांचा समावेश होता. शफाली बाद झाल्यानंतर, संघाची धावसंख्या ८३ असताना मानधनाही दुसरी विकेट म्हणून बाद झाली. तिने ३७ चेंडूंत ३८ धावा केल्या. त्यानंतर जेमिमाह रॉड्रिग्स आणि हरमनप्रीत कौर यांनी भारतीय डावाला सावरले. जेमिमाहने २८ चेंडूंत ३४ धावा केल्या आणि त्यानंतर दुखापतीमुळे तिला मैदान सोडावे लागले.

हरमनप्रीत कौरने कर्णधाराला साजेसा खेळ केला. या आक्रमक उजव्या हाताच्या फलंदाजाने संघाची धावसंख्या ४ बाद १७० पर्यंत नेण्यात महत्त्वाची भूमिका बजावली; तिने शेवटच्या षटकात तीन षटकार ठोकले. शेवटच्या षटकातील पाचव्या चेंडूवर बाद होण्यापूर्वी तिने २७ चेंडूंत ५६ धावा केल्या, ज्यात तीन षटकार आणि सहा चौकारांचा समावेश होता. दीप्ती शर्मा (१ चेंडूत ४ धावा) आणि रिचा घोष (१ चेंडूत १ धाव) नाबाद राहिल्या. मोठ्या लक्षाचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलियाला सुरुवातीलाच धक्का बसला; रेणुकाविरुद्धच्या पहिल्याच षटकात जॉर्जिया व्होल (४ धावा) बाद झाली. २५ चेंडूंत २४ धावा केल्यानंतर फीबी लिचफील्डला श्री चरणीने बाद केले. बेथ मुनीने २० चेंडूंत २२ धावा केल्या. एलिस पेरीने ३८ चेंडूंत ५६ धावांची खेळी केली, तर ॲशली गार्डनर २९ चेंडूंत ५३ धावांवर नाबाद राहिली.

## रायगडच्या खेळाडूंची दमदार कामगिरी

**। रायगड । प्रतिनिधी ।**

जीएमसी स्टेडियम, हैदराबाद येथे आयोजित सब-ज्युनिअर व ज्युनिअर इक्विप्ड राष्ट्रीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत रायगड जिल्ह्यातील खेळाडूंनी उल्लेखनीय यश संपादन केले. कर्जतच्या आय एन डी क्लबची गायत्री बडेकर हिने ४७ किलो सब-ज्युनिअर वजनी गटात उत्कृष्ट कामगिरी करत १५५.५ किलो स्क्वॅट, ७२.५ किलो बेंच प्रेस आणि १५०.५ किलो डेडलिफ्ट (राष्ट्रीय विक्रमासह) अशी एकूण ३७८.५ किलो वजन उचलून सुवर्णपदक पटकावले. तसेच तिला स्ट्राँग वुमन ऑफ इंडिया सब ज्युनिअर हा मानाचा किताबही प्राप्त झाला.

जिज्ञासा सुगंधा महेश बडेकर हिने ६९ किलो सब-ज्युनिअर वजनी गटात १४२.५ किलो स्क्वॅट, ५० किलो बेंच प्रेस आणि १२० किलो डेडलिफ्ट अशी एकूण ३१२.५ किलो वजन उचलून



राष्ट्रीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धा

कांस्यपदक मिळवले. कुमारी गायत्री बडेकर आणि जिज्ञासा बडेकर या भगिनींना आयएनडी क्लबचे राष्ट्रीय खेळाडू हनुमंत खरात यांचे प्रशिक्षण लाभले आहे.

पनवेल जवळील दापोली पारगावच्या सुप्रसिद्ध चेतन जिमकोच्या रौनक ज्योत्स्ना रोशन जितेकर याने १०५ किलो सब-ज्युनिअर वजनी गटात २८८ किलो स्क्वॅट (राष्ट्रीय विक्रम), १५० किलो बेंच प्रेस आणि २६५.५ किलो डेडलिफ्ट (राष्ट्रीय विक्रम) अशी एकूण ७०३.५ किलो वजन उचलून सुवर्णपदक पटकावले. रौनक जितेकर याला राष्ट्रीय खेळाडू विशाल मुळ्ये (भांडुप, मुंबई) यांचे विशेष प्रशिक्षण आहे.यामुळे या राष्ट्रीय स्पर्धेत गायत्री बडेकर आणि रौनक जितेकर यांच्या नावे नवीन राष्ट्रीय विक्रमाची नोंद झाली. या स्पर्धेसाठी रायगडचे अंजली येवले, राज कडू, प्रथमेश भालेकर, मोरेश कारळे, आणि आणि विशाल मुळ्ये यांची मोलाची मदत या खेळाडूंना झाली. राष्ट्रीय स्तरावर उत्कृष्ट कामगिरी करून महाराष्ट्र राज्य आणि रायगड जिल्ह्याचे नाव गौरवाने उंचावले. याबद्दल पॉवरलिफ्टिंग स्पोर्ट्स असोसिएशन रायगडचे अध्यक्ष गिरीश वेदक, सचिव अरुण पाटकर, सहसचिव सचिन भालेराव, कार्याध्यक्ष यशवंत मोकल, सदस्य सुभाष टेंबे, संदीप पाटकर, मानस कुंटे, माधव पंडित, खजिनदार राहुल गजरमल, संघटना सहाय्यक रामचंद्र गावडे, आणि शिवछत्रपती पुरस्कार सन्मानित संजय सरदेसाई या सर्व पदाधिकाऱ्यांनी पदक प्राप्त खेळाडूंचे आणि त्यांचे प्रशिक्षक यांचे अभिनंदन केले आहे.

## बेन स्टोक्सची आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

इंग्लंडचा कर्णधार बेन स्टोक्सने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली आहे. न्यूझीलंडविरुद्ध सुरू असलेला तिसरा कसोटी सामना त्याचा शेवटचा सामना असेल. त्याच्या निवृत्तीची घोषणा झाली, तेव्हा तो गोलंदाजी करत होता.

बातमी आल्यानंतर पुढच्याच चेंडूवर त्याने जॅक फॉक्सची विकेट घेतली.१५ वर्षांच्या कारकिर्दीत बेन स्टोक्सने इंग्लंडसाठी अनेक अविस्मरणीय खेळी केल्या. मग तो २०१९ चा विश्वचषक अंतिम सामना असो, किंवा २०१९ ची ऐतिहासिक ॲशेस कसोटी. त्याचे नाव दोन नाईट क्लब वादांशी जोडले गेले. यामुळे आधी त्याच्याकडून उपकर्णधारपद गेले, नंतर त्याला संघातून बाहेर काढण्यात आले. आता त्याने निवृत्तीची घोषणा केली आहे. डरहमसाठी खेळणाऱ्या स्टोक्सचे एकदिवसीय पदार्पण २०११ मध्ये झाले होते. तर कसोटी पदार्पण २०१३-१४ च्या ॲशेस मालिकेत झाले. ते एप्रिल २०२२ पासून इंग्लंडचे कसोटी कर्णधार आहेत.

स्टोक्सने इंग्लंडसाठी एकूण १२२ कसोटी सामने खेळले. यापैकी ४४ सामन्यांमध्ये त्यांनी कर्णधारपद भूषवले. त्यांनी कसोटी कारकिर्दीत १४ शतके आणि ३७ अर्धशतकांच्या मदतीने ७ हजारांहून अधिक धावा केल्या. याव्यतिरिक्त त्यांनी २५२ बळीही घेतले.

त्याने ११४ एकदिवसीय आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये ५ शतके आणि २४ अर्धशतकांच्या मदतीने ३४६३ धावा केल्या. त्याने ७४ बळीही घेतले. स्टोक्सने ४३ टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्येही भाग घेतला. त्याने ५८५ धावा केल्या आणि २६ बळी घेतले.

## अलिबागमध्ये ‘फार्मर कप २०२६’चा शुभारंभ

### शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**। चौल । प्रतिनिधी।**

अलिबाग पंचायत समिती येथे सोमवारी (दि. २९ जून) ‘फार्मर कप २०२६’ स्पर्धेचा डिजिटल शुभारंभ उत्साहात पार पडला. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झालेल्या राज्यस्तरीय उद्घाटन सोहळ्याचे थेट प्रक्षेपण अलिबाग पंचायत समितीत दाखविण्यात आले. या कार्यक्रमाला तालुक्यातील शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून स्पर्धेत सहभागी होण्याचा निर्धार व्यक्त केला.

कार्यक्रमात शेतकरी गटांच्या माध्यमातून शेतीतील नवकल्पना, उत्पादकता वाढ, शाश्वत शेती पद्धती आणि सामूहिक सहभागाचे महत्त्व याविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. स्पर्धेची उद्दिष्टे, नोंदणी प्रक्रिया आणि सहभागाचे निकष याबाबतही उपस्थितांना माहिती देण्यात आली.



या कार्यक्रमाला उपविभागीय कृषी अधिकारी तथा कृषी उपसंचालक प्रवीण थिंगळे, तालुका कृषी अधिकारी तन्मय भगत, कृषी अधिकारी राजेश घरत, मंडळ कृषी अधिकारी हिंदुराव मोरे (पोयनाड), मंडळ कृषी अधिकारी मोहन सूर्यवंशी (नागाव), तालुका पाणी फाऊंडेशन मेंटॉर तथा कृषी सेवक स्मिता कबाडी, तालुका अभियान व्यवस्थापक माधुरी संकेत जाधव, उमेद मेंटर रिया रुपेश पाटील, रोशनी शैलेंद्र पिंगळे तसेच कृषी विभागातील अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

यावेळी अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांना एकत्रितपणे स्पर्धेत सहभागी होऊन आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा स्वीकार करण्याचे आवाहन केले.‘एकत्रित प्रयत्न, सक्षम शेतकरी फार्मर कप २०२६ यशस्वी करूया!’ असा संदेश देत कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.

## ॲन्सी सोजनची विक्रमी लांब उडी

**। भुवनेश्वर । वृत्तसंस्था ।**

भुवनेश्वर येथील कलिंगा स्टेडियमवर झालेल्या राष्ट्रीय आंतरराज्यीय ॲथलेटिक्स चॅम्पियनशिप २०२६ मध्ये केरळच्या २५ वर्षीय महिला ॲथलीट ॲन्सी सोजनने लांब उडी स्पर्धेत इतिहास रचला. ॲन्सी सोजनने राष्ट्रीय आंतरराज्यीय वरिष्ठ ॲथलेटिक्स चॅम्पियनशिपमध्ये लांब उडी स्पर्धेत ६.८८ मीटर उडी मारून एक नवीन राष्ट्रीय विक्रम प्रस्थापित केला.

रांची येथे झालेल्या फेडरेशन कपमध्ये ६.७६ मीटर उडी मारून ॲन्सी सोजनने २०२६ च्या आशियाई खेळांमध्ये सहभागी होण्याचे तिकीट आधीच मिळवले होते. आता ॲन्सी सोजनने भारतीय महिला ॲथलीट अंजू बॉबी जॉर्ज यांचा २२ वर्षे जुना ६.८३ मीटरचा लांब उडीचा राष्ट्रीय विक्रम मोडला.



ॲन्सी सोजन गेल्या काही वर्षांपासून सातत्याने चांगली कामगिरी करत आहे. राष्ट्रीय आंतर-राज्य वरिष्ठ ॲथलेटिक्स चॅम्पियनशिपमध्ये, सोजनने तिच्या पाचव्या प्रयत्नात ६.८३ मीटर उडी मारून एक नवीन राष्ट्रीय विक्रम प्रस्थापित केला. गेल्या २० वर्षांत लांब उडीमध्ये ६.८५ मीटरपेक्षा जास्त लांब उडी मारणारी ॲन्सी सोजन ही केवळ दुसरी आशियाई खेळाडू आहे. या कामगिरीमुळे, ॲन्सी सोजन आशियातील ८ वी सर्वोत्तम महिला लांब उडीपटू बनली आहे.

यापूर्वी हा विक्रम भारतीय ॲथलेटिक्समधील दिग्गज अंजू बॉबी जॉर्ज यांच्या नावावर होता. त्यांनी २००४ च्या अथेन्स समर ऑलिम्पिकमध्ये ६.८३ मीटर उडी मारून हा राष्ट्रीय विक्रम प्रस्थापित केला होता. ॲन्सी सोजनने ६.८८ मीटर उडी मारून केवळ सुवर्णपदकच जिंकले नाही, तर भारतीय ॲथलेटिक्समध्ये एक नवीन इतिहासही रचला.

ॲन्सी सोजनने २०२३ च्या आशियाई क्रीडा स्पर्धेत ६.६३ मीटर उडी मारून रौप्य पदक जिंकले. २०२५ च्या आशियाई ॲथलेटिक्स चॅम्पियनशिपमध्ये रौप्य पदक पटकावले. आता जपानमध्ये होणाऱ्या आगामी आशियाई क्रीडा स्पर्धेत अँसी सोजनच्या कामगिरीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे, जिथे ती सुवर्णपदक जिंकेल अशी अपेक्षा आहे. आगामी जागतिक ॲथलेटिक्स चॅम्पियनशिपमध्येही तिच्याकडून मोठ्या अपेक्षा आहेत, जिथे ती पदकाची प्रबळ दावेदार मानली जात आहे.

### इंग्लंडच्या टीमला शूटआऊटमध्ये हरवले | बचावपटू संजय ठरला सामनावीर

## भारतीय हॉकी टीमचा बोलबाला

**। लंडन । वृत्तसंस्था ।**

रविवारी लंडन येथील ली व्हॅली हॉकी आणि टेनिस सेंटरमध्ये झालेल्या हॉकी प्रो लीगच्या दुसऱ्या सामन्यात भारतीय पुरुष हॉकी संघाने भक्कम बचावाचे प्रदर्शन केले. इंग्लंडविरुद्धच्या अटीतटीच्या सामन्यात, निर्धारित वेळेत स्कोअर ०-० राहिल्यानंतर भारताने पेनल्टी शूट-आऊटमध्ये ३-२ ने विजय मिळवला. भारतासाठी अभिषेक, शिलानंद लाक्रा आणि हार्दिक सिंग यांनी शूट-आऊटमधील आपले प्रयत्न यशस्वीरीत्या पूर्ण केले, तर बचावपटू संजयला त्याच्या कामगिरीबद्दल सामनावीर म्हणून गौरविण्यात आले.

सामन्याच्या सुरुवातीलाच इंग्लंडने आक्रमक पवित्रा घेतला



आणि सॅम वॉर्डने यशदीप सिंगविरुद्ध सुरुवातीलाच एक पेनल्टी कॉर्नर मिळवला. भारतीय गोलरक्षक मोहितकुमारने उत्कृष्ट प्रतिक्रिया देत दुहेरी बचाव केला आणि त्यानंतर वॉर्ड व सॅनफोर्ड यांचे प्रयत्न रोखून भारतावरील सुरुवातीचा दबाव कमी केला. पहिल्या क्वार्टरच्या शेवटी अभिषेकने भारतासाठी सर्वोत्तम संधी निर्माण केली, परंतु मोहितच्या चपळाईने आणि भारताच्या शिस्तबद्ध बचावात्मक रचनेमुळे तो क्वार्टर गोलरहित राहिला.

यजमान इंग्लंडने दुसऱ्या क्वार्टरमध्ये दबाव कायम ठेवला आणि बंदुरकाच्या माध्यमातून गोल करण्याच्या अगदी जवळ पोहोचले. भारताने जरमनप्रीत सिंगच्या माध्यमातून प्रतिहल्ला केला, ज्याचा प्रयत्न इंग्लंडच्या गोलरक्षकाने उत्कृष्टरित्या वाचवला. इंग्लंडच्या सततच्या आक्रमणांना न जुमानता, भारताचा खंबीर बचाव टिकून राहिला आणि मध्यंतरापर्यंत दोन्ही संघ ०-० अशा बरोबरीत राहिले.

मध्यंतरानंतर, भारत नव्या आक्रमक इराद्याने मैदानात परतला. हार्दिक सिंगने मिडफिल्डमधून एक उत्कृष्ट धाव घेतली, ज्यामुळे मनदीप सिंगसाठी संधी निर्माण झाली, परंतु इंग्लंडच्या गोलरक्षकाने पुन्हा एकदा महत्त्वपूर्ण बचाव केला. सामन्यातील सर्वात मोठा टर्निंग पॉइंट तिसऱ्या क्वार्टरच्या शेवटी आला, जेव्हा इंग्लंडला पेनल्टी स्ट्रोक देण्यात आला. भारताने तात्काळ व्हिडिओ रेफरल घेतला आणि रिप्लेमध्ये चॅलेंज योग्य असल्याचे स्पष्ट झाल्यावर, तो निर्णय बदलण्यात आला. या घटनेसाठी इंग्लंडच्या निकोलस पार्कला ग्रीन कार्ड दाखवण्यात आले.

सामना शूट-आऊटमध्ये चौथ्या क्वार्टरमध्ये इंग्लंडने पुन्हा भारतावर दबाव आणला, परंतु गोलरक्षक संजय करकेराने महत्त्वपूर्ण बचाव करून स्कोअर बरोबरीत ठेवला. सुखजीत सिंगने उत्कृष्ट खेळ करत भारतासाठी एकापाठोपाठ एक पेनल्टी कॉर्नरचे गोलमध्ये रूपांतर केले, परंतु इंग्लंडचा बचाव अभेद्य राहिला. सामना संपण्याच्या अवघ्या दोन सेकंदांपूर्वी इंग्लंडला आणखी एक पेनल्टी कॉर्नर मिळाला, जो भारताने यशस्वी रिव्ह्यूद्वारे रद्द केला. त्यानंतर सामना पेनल्टी शूट-आऊटमध्ये गेला, जिथे भारताने संयम राखत विजय आणि बोनस गुण मिळवले.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)